अग्निस्नान

अ. पं. देशमुख

आपली शेजारी राष्ट्रे... १.

पा कि स्ता न

(१९६६ अखेर)

लेखक

ज. पां. देशमुख

सुबोध प्रकाशन, पुणे २.

प्रकाशक :
सौ. सुलोचना पारगांवकर
१४४ शुक्रवार पेठ, पुणे २.

प्रथमावृत्ती १ मे, १९६७

मूल्य पाच रुपये

मुद्रक :
ग. वा. बेहेरे
रविराज मुद्रणालय
६३४ बुधवार पेठ, पुणे २.

अर्पणपत्रिका

पाकिस्तानच्या जन्माचे वेळी ज्या निरपराधी अल्पसंख्यांक कुटुंबियांच्या आहुति पडल्या व पाकिस्तानी राज्य-कर्त्यांचे आक्रमक हल्ले परतविताना ज्या हिंदी सैनिकांनी प्राण खर्ची घातले, त्या हुतात्म्यांना ही पुष्पांजलि सादर समर्पण.

—लेखक

माहितीसाठी काही

(पाकिस्तानसंबंधीची माहिती

1) *Patterns in Aggression*
By Radha Kamal Ghose.

2) *Let Pakistan Speak For Herself*
By Publication Division, New Delhi.

3) *Pakistan's Wanton Attack in Kutch*
By Publication Division, New Delhi.

4) *A History of Pakistan*
Y. V. Gankovsky and L. R. Gordon–Polonskaya.

5) *British Dominion in India and after*
V. B. Kulkarni.

6) *Pakistan*
By K. Callard, London.

7) *Democracy in Pakistan*
By C. W. Choudhary.

आधारभूत पुस्तके

देणारी काही पुस्तके)

8) *The Crisis in Perspective*
Publication Division, New Delhi.

9) *Constitution Problem in Pakistan.*
By Sir Ivor Jennings.

10) *India and Pakistan*
By O. H. K. Spate, London.

11) *Pakistan*
By I. Stephans, New York.

12) *State of Pakistan*
By L. F. R. Williams, London.

13) *The Pakistan or Partition of India*
By Dr. B. R. Ambedkar.

14) *Meaning of Pakistan*
By F. K. Khan Derani, Lahore.



धर्माधिष्ठित पाकिस्तानचा निर्माता बॅ. जीना

नि वे द न

स्वतंत्र भारताच्या इतिहासात पाकिस्तानच्या निर्मितीला एक विशिष्ट स्थान आहे. याचा इतिहास आपण नव्या पिढीसाठी लिहून काढावा असे विचार माझ्या मनात कित्येक दिवस घोळत होते व त्या दृष्टीने वाचन सुरू होते. त्याचे मूर्त स्वरूप आज पाकिस्तान या पुस्तकाचे रूपाने दिसत आहे.

माझ्या वृत्तपत्रीय जीवनात होणाऱ्या नियमित वाचनात पाकिस्तानातील घडामोडी नेहमीच मनाला विशेष धक्का देत. पश्चिम पाकिस्तानात मोडणारा प्रदेश मी स्वतः हिंडून पाहिलेला आहे. तेथील दिलदार पठाणांचा सरहद्द प्रांत, शिखांचा पंजाब व जागतिक व्यापारी वृत्तीला आव्हान देणाऱ्या सिंध प्रांतीयांचा व्यापारी प्रदेश, यांचे एक वैशिष्टय आगळेच आहे. तो प्रदेश आमचे हातून गेला व त्या जागी धार्मिक भावनेने आधारलेले राष्ट्र निर्माण झाले. ही घटना हिंदवी स्वातंत्र्याचे मोलात आम्ही विकत घेतली, ही गोष्ट चांगली का वाईट हे ठरविण्याचा अधिकार थोरांचा आहे. पण या घटनेची पार्श्वभूमी नव्या पिढीपुढे काटेतोल व निःपक्षपाती दृष्टीने मांडण्याचे काम आम्हा विद्यमान पत्रकारांचे आहे. या कर्तव्यांची जाणीव ठेवून मी हे पुस्तक लिहिले आहे.

माझे मागे घाई लावून हे कार्य करून घेण्याचे महत्त्वाचे काम 'अस्मिता प्रकाशन' चे श्री. ग. वा. बेहेरे यांनी केले, म्हणूनच हे पुस्तक लवकर पुरे होऊ शकले. याशिवाय विद्यापीठाच्या जयकर लायब्ररीचे प्रमुख श्री. के. एस्. हिंगवे व त्यांचे सहकारी यांनी केलेली पुस्तकांची मदत व सकाळ कचेरीतील कात्रणांचा उपयोग करण्याची संधी मिळाली नसती, तर माझे काम अपुरेच राहिले असते. माझे प्रत्येक पुस्तकात सकाळचे संपादक डॉ. ना. भि. परुळेकर यांचा आधार मोठा असतो. त्यांचा सल्ला मार्गदर्शक असतो. तेव्हा त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

१ मे, १९६७

--ज. पां. देशमुख

अनुक्रमणिका

9 : धर्माचे पायावर नवे राष्ट्र

जगाचे इतिहासात भौगोलिक, आर्थिक अगर राजकीय तत्त्वप्रणालीसाठी निर्माण झालेली अनेक राष्ट्रे आढळतात, पण सर्वस्वी धार्मिक पायावर विशिष्ट जमातीने निर्माण केलेले स्वतंत्र राष्ट्र म्हणून फक्त पाकिस्तानचाच उल्लेख करावा लागेल. ब्रिटिशांनी सत्ता सोडताना हिंदुस्थानची विभागणी करून मुसलमानी राज्यसत्तेच्या हाती दिलेले व मुस्लिम हक्कांच्या हितसंबंधांसाठी निर्माण झालेले एक स्वतंत्र राष्ट्र म्हणूनच 'पाकिस्तानचा' उल्लेख सर्व आंतरराष्ट्रीय इतिहासकार करीत आहेत. अखंड हिंदुस्थानातील अल्पसंख्य जमातीचा बहुसंख्य वस्तीचा प्रदेश स्वतंत्र काढून त्याला स्वातंत्र्य देण्याचे ब्रिटिश नीतीचे योजनेमागे ब्रिटिश राजवटीतील एक राजकीय तत्त्वज्ञानाचा वारसा दडलेला आहे, आणि तो म्हणजे जेवढी माजविता येईल तेवढी दुफळी माजवून तिचे बळावर राज्यकारभार करणे (*Divide and rule*) व आपले हितसंबंधांचे रक्षण करणे हा होय. ब्रिटिश राजनीतीच्या विजयाचे प्रतीक म्हणूनच पाकिस्तानचा उल्लेख इतिहासकारांना नेहमी करणे भाग पडेल.

हिंदुस्थानातील या धार्मिक तत्त्वज्ञानावर आधारलेल्या या मुस्लिम चळवळीचा उगम शोधून काढावयास निदान शंभर वर्षे तरी मागे

जाणे भाग आहे. रशियन इतिहासकार वाय्. व्ही. गान्कोव्हस्की व एल्. आर्. गॉर्डन पाळोस्काया यांच्या मते हिंदमधील या मुस्लिम चळवळीचा जन्म १८५७ च्या क्रांतियुद्धानंतर झाला. ज्याचा उल्लेख शिपायांचे बंड म्हणून ब्रिटिश लोक अजूनही करतात, त्याचा बीमोड १८५९ साली पूर्णपणे केल्यानंतर ब्रिटनने आपली म्हणून जी प्रमुख जमात अनेक आमिषे दाखवून जवळ केली त्यात मुसलमानांचा भरणा विशेष होता आणि त्यांचेच करवी अनेक मुस्लिमांच्या स्वतंत्र चळवळी फोफावू लागल्या. मुस्लिमांचे स्वतंत्र अस्तित्त्व भासमान होण्याइतकी परिस्थिती निर्माण झाली. बंगालच्या राष्ट्रीय चळवळीच्या आगरातच काही मुसलमान जमीनदारांना हाताशी धरून या चळवळीची मुहूर्तमेढ रोवण्यात आली, व स्वातंत्र्यलढ्याचा बीमोड झाल्यानंतर अवघ्या एका वर्षात १८६० साली 'दी नॅशनल मुस्लिम असोसिएशन व महॉमेडन लिटररी सोसायटी' या दोन स्वतंत्र मुस्लिम जमातीच्या संस्था प्रथम स्थापन झाल्या. या संस्था स्थापन करणारात नुसते काझी अगर उल्लेमा नव्हते तर सर्वसाधारण मुसलमान समाजावर संपूर्ण वजन असलेले पश्चिम बंगालमधील बडे मुसलमान जमीनदार होते, या धनिकांचे स्वातंत्र्ययुद्धात कोणते नुकसान झाले होते नकळे, पण हिंदुजमातीचा द्वेष करावयास भाग पाडणाऱ्या या चळवळीचे बीजारोपण या वर्गाला हाताशी धरून इंग्रजांनी प्रथम केले.

या स्वतंत्र चळवळीचे त्यावेळचे कलकत्ता येथील नेते अब्दुल लतीफ हे एक बंगाली मधील प्रमुख लेखक होते. कलकत्त्याच्या एका वकिलाचे हे चिरंजीव. कलकत्ता विद्यापीठात शिक्षण झाल्यानंतर कलकत्ता कार्पोरेशनचे व बंगाल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे ते सभासद होते. इनकम्‌टॅक्स कमिशनवरही त्यांची नेमणूक झाली. १८८० साली त्यांनी केलेल्या कामगिरीबद्दल त्यांना नवाब ही पदवी देण्यात आली व १८८७ साली ते नवाबबहादूर झाले. बंगालमधील या मुस्लिम चळवळीचा फायदा काही हुशार तरुण बरेच पुढे येण्यात झाला. पुढे मुस्लिमांची स्वतंत्र चळवळ हाती घेणारे सय्यद अहमदखान यांचेसारखे ब्रिटिश सिव्हिल सर्व्हिसमध्ये शिरणारे मुसलमान कार्य-

कर्तेही या संघटनेतून पुढे आले. यावेळच्या शिक्षितांनी केलेले साहित्यविषयक कार्यही फार मोठे आहे. कुराणाचा खरा अर्थ लावणारे वलिलशा यांच्यासारख्या मुसलमान लेखकाचे ग्रंथ याच काळात जन्मास आले, व अल्पसंख्यांकावर होणारा अन्याय व त्यांचे सामर्थ्याची जाणीव देणारा व सामाजिक समतेची मागणी करणारे ग्रंथ मुस्लिम लेखकांनी लिहिले. बुद्धिवादी मुस्लिमांचे जागृतीचे हे प्रत्यक्ष प्रतीक समजले पाहिजे. अशा तऱ्हेने जन्मास आलेल्या या शिक्षणविषयक चळवळीतून १८७७ साली अलिगड कॉलेज या स्वतंत्र मुस्लिम शिक्षण संस्थेचा जन्म झाला व त्याला भरपूर मदत त्यावेळचे ब्रिटिश राज्यकर्त्यांनी केली, यावरून मुस्लिम जमातीला आपले स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव देऊन तिचेमध्ये एक वेगळा सुभा निर्माण करण्याची प्रवृत्ती मुद्दाम कशी उत्पन्न करण्यात आली याची कल्पना येते.

अलिगड विद्यापीठाचे प्रिन्सिपॉल एक इंग्रज गृहस्थ त्यावेळी होते व कॉलेजच्या विश्वस्तात काही हिंदी राजेरजवाडे व मुस्लिम जमीनदार होते. मुसलमान जमातीचे शिक्षणाची स्वतंत्र सोय इंग्रजाचे पुरस्काराने अशा तऱ्हेने सुरू झाली. या कॉलेजात शिकणाऱ्या विद्यार्थ्यात आपले जमातीचे स्वतंत्र अस्तित्व प्रस्थापित करण्याचे सारखे प्रयत्न झाले. याच वेळी उदयास येणाऱ्या कॉंग्रेससारख्या महान् राजकीय पक्षात सामील होण्याऐवजी आपले काहीतरी स्वतंत्र राजकीय अस्तित्व असावे अशी विचारसरणी पुढे येऊ लागली. तीच वाढीस लावण्याचे कार्य अलिगडसारखे स्वतंत्र कॉलेज काढून त्याला इंग्रजांनी पाठिंबा दिला. या कॉलेजमधील मुस्लिम तरुणासाठी व सर्वसाधारण शिक्षित मुस्लिम जमातीसाठी 'तझीब अल् अखलाख' (समाजसुधारक) नावाचे उर्दू मासिकही निघत असे. या मासिकाचे संपादकत्व सय्यद अहमदखान नावाचे एका शिक्षित मुस्लिम गृहस्थाकडे होते. १८८५ साली हिंदी कॉंग्रेसचा जन्म होईपर्यंत या मासिकात हिंदी मुस्लिम ऐक्याचा पुरस्कार केला गेला. सुरुवातीला हिंदु, मुसलमान, खिश्चन हिंदमध्ये राहणारी कोणतीतीही व्यक्ति जरी असली तरी तिने एकत्रित एकत्रित येऊन देशाचे उद्धाराचा प्रयत्न केला पाहिजे

अशी भाषा वापरणारे या मासिकाचे संपादक सय्यद अहमद खान इंग्रजांना विरोध करण्यासाठी राष्ट्रीय काँग्रेसचा जन्म होताच आपले स्वतंत्र धार्मिक मुस्लिम संघटनेची भाषा बोलू लागले आणि ब्रिटिशांशी राजनिष्ठ राहून मुसलमानानी पुढे येणे कसे आवश्यक आहे, याचे विवेचन करू लागले. ब्रिटिशांचे वसाहती राज्य म्हणजे हिंदी उन्नतीसाठी हाती आलेली मोठी देणगी आहे, अशीही राजनिष्ठेची भाषा ते वापरू लागले. त्यामुळे त्यांच्या या प्रचारामागे मुसलमानांनी शिक्षित समाज काँग्रेसपासून वेगळा काढण्याचा हेतू असावा व ब्रिटिश राज्यकर्त्यांचे हात यामागे असावे अशी शंका उघडपणे घेतली जाऊ लागली.

सय्यद अहमदखान यांचे हे बदलते प्रचारकी धोरण त्यावेळीही सर्वसाधारण शिक्षित मुसलमान तरुणांचे गळी उतरेना, त्यामुळे तरुण पिढी ऐवजी धनिक जमीनदार व राजेरजवाडे अहमदखानांचे पाठीराखे अधिक बनू लागले. विशेषतः ब्रिटिश राज्यकर्त्यांचे गुणगान ते सारखे करू लागल्यामुळे हिंदी संस्थानिकांचे गटात त्यांचे नाव विशेष गाजू लागले. या स्थानिक चळवळीचा फायदा इंग्रज राज्यकर्त्यांनी पुरेपूर घेतला, मुसलमानंचे शैक्षणिक चळवळीचे निमित्ताने त्यांना बाजूला काढण्याच्या योजनेला बंगालप्रमाणे मुंबईतही प्रयत्न होऊ लागले. काँग्रेस हळूहळू पुढे पाऊल टाकीत असताना मुसलमान जमात जवळ करून काँग्रेसचे राष्ट्रीय धोरण हाणून पाडण्याच्या इंग्रज कारवाया सुरू झाल्या. मुंबईत काही काळ काँग्रेसमध्ये कै. दादाभाई नवरोजी यांचे पुढारीपणामुळे एकत्रित आलेली निरनिराळ्या जमातीतील मुसलमान मंडळी हळूहळू फुटून या चळवळीला मिळू लागल्याचे दिसू लागले. अल्पसंख्य या नावाखाली मुस्लिम जमातीबरोबर काही पारशी मंडळींना ओढण्याचे प्रयत्न जरी या काळात मुंबईत झाले असले, तरी दादाभाई नवरोजींच्या असामान्य व्यक्तित्त्वामुळे त्यात यावे तसे यश इंग्रजांना आले नाही. इ. स. १८८५ साली हिंदी राष्ट्रीय काँग्रेसचे पहिले अधिवेशन झाले, त्या वेळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड फेड्रिक टेंपल डफरीन हे सरहद्द प्रांतात काँग्रेस विरोधी मुस्लिमांची चळवळ कितपत उभारणे शक्य आहे, याचा विचार करीत होते, यासाठी अलन हचूम

नावाचे एका ब्रिटिश कारस्थानी राज्यकर्त्याला त्यांनी सरहद्द प्रांतात पाठविल्याचा पुरावाही मिळू शकतो. या वेळी इंग्रजांचे या भेद-नीतीला खरा तडाखा जर कोणी दिला असेल, तर तो काँग्रेसच्या संस्थेने होय. काँग्रेस ही एक हिंदमधील सर्व जमातींची राष्ट्रीय संघटना आहे. ही गोष्ट त्या वेळचे पुढाऱ्यांनी मांडली व काँग्रेस ही एक हिंदची चळवळ आहे हा ब्रिटिश हस्तकांनी सुरू केलेला खोटा प्रचार संपूर्णपणे हाणून पाडला. काँग्रेसमध्ये सर्व हिंदी जमातींची एक-वाक्यता जी दिसून आली त्यामुळे मुस्लिम प्रचारकांचा सुरू झालेला कांगावा काही काळ लुळा पडला. परंतु धार्मिक प्रचाराने हिंदु-मुसल-मानात फूट पाडण्याचे कारस्थान ब्रिटिशधार्जिणे शिक्षित मुसलमान आपले प्रचारात काँग्रेसविरोधी टीका करून अव्याहत करीतच होते.

याचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. सर्वसाधारण हिंदु व मुसलमान नागरिकांचे मनात एकमेकाविषयीचे कधीही निर्माण न झालेले किल्मिष या वेळी निर्माण झाले. याच वेळी गोहत्त्याबंदीची चळवळ उत्तर हिंदुस्थानात सुरू झाली आणि पहिली हिंदु-मुसलमान दंगल झाली. या वेळी हिंदु पवित्र समजत असलेल्या गोमातेची हत्त्या करणारे मुसलमान व अँग्लो इंडियन जमात एक बाजूला पडली व इंग्रजांनी ही दुहीची ठिणगी पेटवून मुसलमान व त्यांचे बाजूचे काही नागरिक स्वसंरक्षणाचे ध्येय पुढे करून एकत्रित आणले. आपल्या भेदनीतीची एक नवी पायरी गाठली. यासाठी नागरिकात आपली एक प्रचार आघाडी ब्रिटिश राज्यकर्त्यांनी उघडली.

मुसलमान पुढारी सय्यद अहमदखान यांनी या सुमारास लखनौमध्ये एक महत्त्वाचे भाषण करून इंग्रजाशिवाय मुसलमान जमातीचे चालण्यासारखे नाही या आपल्या घोषणेचा पुरस्कार केला. ते म्हणाले, " उद्या काँग्रेसच्या मागणीप्रमाणे हिंदुस्थानला स्वराज्य देऊन इंग्रज येथून निघून गेले, तर आपले राज्यकर्ते कोण होणार याचा विचार करा ? या राजसिंहासनावर समान हक्क प्रस्थापित करण्यासाठी हिंदु-मुसलमान एकत्रित बसतील का ? खात्रीने हे शक्य नाही. यासाठी त्यापैकी एकाने दुसऱ्याला जिंकले पाहिजे आणि खाली

पाडले पाहिजे. काँग्रेस म्हणते त्याप्रमाणे दोन्ही धर्मियांना समान हक्क एकाच राज्यात लाभणे कधीही शक्य नाही. " लखनौ येथे १८८७ चे डिसेंबरात एका जबाबदार मुसलमान पुढाऱ्याने केलेले हे भाषण आहे. या घोषणा पाकिस्तानचे जन्मापूर्वी महमदअली जिना करीत असलेल्या घोषणेपेक्षा फारशा निराळ्या नाहीत, ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. या भाषणात मुसलमान जमातीने इंग्रजाशी राज्यनिस्ट राहून आपले राजकारण चालू ठेवावे असाही उपदेश या वक्त्यांनी केला होता.

या प्रचाराचा परिणाम बहुसंख्य शिक्षित मुसलमान जमातीवर एवढा झाला, की प्रत्येक प्रांतांत शिक्षणाचे कार्यासाठी स्थापन झालेल्या अनेक मुस्लिम संस्थांनी काँग्रेसच्या राजकीय चळवळीला विरोध करणारे ठराव पास केले व ब्रिटिशांविषयीची आपली राजनिष्ठा प्रगट केली. बंगालचे नॅशनल मुस्लिम असोसिएशन मॉहमेडन लिटररी सोसायटी, कलकत्ता, अंजुमाने इस्लाम मद्रास या संस्था या निषेधकांत प्रमुख होत्या. फक्त मुंबईची मुस्लिम एज्युकेशन सोसायटी या निषेधापासून अलिप्त राहिली. याशिवाय लखनौ, अलाहाबाद, लाहोर, कलकत्ता या शहरातून मुस्लिमांच्या जाहीर सभा घेऊन काँग्रेसच्या धोरणाचा उघडपणे निषेध केला गेला. याशिवाय मुस्लिम धोरणाचा प्रचार करण्यासाठी उर्दू व इंग्रजी पत्रे जोराने प्रचार करू लागली. राज्यकर्त्यांचा भरपूर पाठिंबा मिळाल्यामुळे सय्यद अहमदखान यांनी तर काँग्रेसविरोधासाठी युनायटेड फ्रेंडस् ऑफ इंडिया सोसायटी नावाची एक स्वतंत्र संस्था काढली. या संस्थेचे ध्येयाविषयी त्यांचे इंग्लंडमधील एक मित्र मि. ग्रॅहॅम यांना लिहिलेल्या एका पत्रात ते लिहितात, ' काँग्रेसच्या राजकीय ध्येयवादाशी सामना देणे हेच माझे या नव्या संस्थेचे मुख्य कार्य रहाणार आहे. याच वेळी ब्रिटिश राज्यकर्त्यांना पाठिंबा देण्यासाठी युनायटेड इंडिया पॅट्रिऑटिक असोसिएशन नावाची आणखी एक संस्था स्थापन झाली. यात मात्र हिंदी राजेरजवाडे, मुसलमान जमीनदार काँग्रेसविरोधी अनेक

गट एकत्रित झाले होते. या चळवळी दक्षिणेकडे फारशा पसरल्या नाहीत व त्यांची प्रमुख केंद्र उत्तरेकडेच होती.

एकीकडे काँग्रेस व एकीकडे मुसलमान हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी निर्माण करण्यात येणाऱ्या या संस्थांचे जाळे उत्तर हिंदुस्थानात सारखे पसरत असताना या मुस्लिम संघटनांना मदत करण्याचे कार्य ब्रिटिश राज्यकर्ते कसे अहमहमिकेने करीत होते यांचीही काही उदाहरणे पुराव्यानिशी दाखविता येण्यासारखी आहेत. यावेळी काही ब्रिटिश अधिकाऱ्यांचे पुरस्काराने ॲंग्लो-ओरिएन्टल डिफेन्स असोसिएशन ऑफ अपर इंडिया नावाची संस्था प्रस्थापित झाली. ही हिंदी काँग्रेसला मुद्दाम विरोध करण्यासाठी प्रस्थापित झाली होती व त्यात हिंदु नागरिक घेऊ नका अशी सूचना स्पष्टपणे देण्यात आली होती. या संस्थेची रीतसर स्थापना १८९३ साली झाली.

संघटनेत कोणत्या विचाराचे ब्रिटिश कार्यकर्ते होते याची कल्पना अलिगड इन्स्टिटयूट गॅझेटमध्ये अलिगड कॉलेजचे त्या वेळचे ब्रिटिश प्रिन्सिपॉल मि. थिएडोर ब्लेक यांनी एक लेख लिहून केली व त्यात एकही हिंदू संस्थेचा सभासद असू नये अशी सूचना केली होती. ते लिहितात 'या हिंदूंनी जी गोहत्त्या विरोधाची चळवळ सुरू केली आहे तीच प्राय: मुसलमानांचे हितसंबंधाला घातक आहे. यावेळी मुसलमान व ब्रिटिश राजकर्त्यांनी एकत्रित येऊन काँग्रेसच्या चळवळीला विरोध केला पाहिजे. काँग्रेस चळवळीचा गोहत्त्या बंदिशी काहीही संबंध नव्हता हेही या विद्वान प्राचार्यांना ठाऊक नसावे कारण या वेळी काँग्रेसने लोकशाहीचे नावाखाली गोवधबंदीचे चळवळीस विरोधच केला पाहिजे. कारण ही चळवळ हिंदच्या आजच्या प्रगतीला फलदायी होणार नाही, असे स्पष्ट म्हटले होते. याच ब्लेक साहेबांनी आपल्या लेखाचे मूळ कल्पनेवर एक पत्रक तयार करून त्यात हिंदमधील ठिकठिकाणच्या पन्नास हजार नागरिकांच्या सह्या गोळा केल्या व ती प्रत पार्लमेंटकडे पाठवून काँग्रेसच्या चळवळीला मुसलमान अँग्लो इंडियन व इतर नागरिकांचा कसा विरोध आहे ते स्पष्ट केले होते. काँग्रेसची चळवळ ब्रिटिश हितसंबंधाला कशी विघातक

आहे, हे दाखवून मुसलमानांना त्यांचे मधून फोडण्यासाठी त्या वेळी कितीतरी लेख प्रिन्सिपॉल ब्लेक यांनी लिहिले. त्यांचे कॉलेजातून तयार झालेले काही विद्यार्थी आपल्या प्राचार्यांनी घालून दिलेले धडे यापुढे सारखे गिरवू लागले व एकोणिसावे शतक संपण्यापूर्वी काँग्रेसला विरोध करण्यासाठी सुशिक्षित मुसलमानांचा एक मोठा गट उत्तर प्रदेश व पूर्व हिंदुस्थानात ब्रिटिशांनी तयार केला.

हा प्रचार येथेच थांबला नाही तर त्याचीं पाळेमुळे पंजाब व वायव्य सरहद्द प्रांतातील बहुसंख्य मुस्लिमांचे प्रदेशात ब्रिटिश राज्यकर्त्यांनी कशी कौशल्याने पसरविली याचाही इतिहास पाहण्यासारखा आहे. १८५७ चे स्वातंत्र्ययुद्धात बंगाल व उत्तर हिंदमधील इतर प्रांताइतका सरहद्द प्रांतही स्वातंत्र्य भावनेने जागृत झालेला होता. तेथील काही मौलवी व उलेमाही या स्वातंत्र्ययुद्धाची बीजे नागरिकांत पेरीत होते. वलिल उल्ला शहा नांवाचे गृहस्थानी यावेळी ब्रिटिश विरोधी अशी नया महाझ नांवाची संघटना स्थापन केली होती. पण इतरत्र स्वातंत्र्ययुद्धाचा बीमोड झाल्यानंतर, या चळवळीतून शिल्लक राहिलेल्या मंडळींनी आपली संघटना शिक्षण कार्यासाठी राबविण्यास सुरुवात केली. पण हे कार्य येवढे मर्यादित स्वरूपात राहू शकले नाही. त्यात या उत्तरेकडील विभागातील जमीनदार व धनिक वर्गाचे प्राबल्य अधिक झाले. त्यानी आपले धोरण एकदम बदलले. ते ब्रिटिशांचे बाजूला वळले. राष्ट्रीय चळवळीला विरोध करू लागले. त्यांची 'दार उलउलम' नांवाची (ज्ञानाचे माहेरघर) एक नवीच संघटना तयार झाली व दिल्लीचे एक पुढारी महंमदकासीम नावाचे जमीनदार पुढारी तिचे प्रमुख बनले. मीर कासीम हे गृहस्थ चांगले इंग्रजी शिकलेले होते. त्यांचा कल सर्वस्वी ब्रिटिशाकडे होता असे वाटत नाही. युरोपियन संस्कृती आपले शिक्षणात व इतरत्र मुरावी असे त्याना वाटत नव्हते. त्यांचा कल काहीसा अरबी भाषा व अरबसंस्कृतीकडे होता. पण मुस्लिमांच्या जातीय संस्थांना मात्र त्यांचा पुरस्कार उपयोगी पडला. मुस्लिम समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी या उत्तरेकडील संघट-

नांचा अधिक कल होता व सय्यद महंमदखान यांचेप्रमाणे सर्वस्वी ब्रिटिशांचे आहारी ते एकोणिसावे शतकात तरी गेले नाहीत. उलट, स्वातंत्र्ययुद्धात ब्रिटिशाविषयी निर्माण झालेली द्वेषभावना या बाजु-कडील मुस्लीमात कायम होती. अशा स्वरूपाच्या चळवळीमुळे स्वतंत्र मुसलमान समाजाचा एक संघटित गट या बाजूकडे तयार झाला. पण ते हिंदूंना विरोध करीत अगर द्वेष करीत असे मानण्या-सारखा पुरावा सापडत नाही. येवढेच नव्हे तर या चळवळीत पुढे येऊ-नही अलिगड कॉलेजसारख्या अगदी मुस्लिम गटांच्या कॉलेजातून शिकून तयार झालेला मुसलमान शिक्षकांचा एक गट काँग्रेसविरोधक अगर सर्वस्वी हिंदुविरोधी जातिनिष्ठ बनला असे म्हणता येत नाही. यातील काही जण तर पुढे काँग्रेसच्या चळवळीतही शिरले. इंग्रजांची भेदनीति त्यांचे बाबतीत तेवढीशी यशस्वी होऊ शकली नाही ही गोष्ट काही अपवादात्मक उदाहरणावरून मान्य करावी लागेल.

२ : मुस्लिम स्वातंत्र्याचा पाठपुरावा

एकोणिसावे शतकाच्या उत्तरार्धात निर्माण झालेली हिंदी स्वातंत्र्याची चळवळ नामोहरम करण्यासाठी ब्रिटिश राज्यकर्त्यांना मुस्लिम जनतेच्या मनात स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव उत्पन्न करून तिचा फायदा आपल्या भेदनीतीचे राजकारणासाठी पुरेपूर करून घेतल्या-नंतर, विसाव्या शतकाचे सुरवातीलाहि या धोरणाचा पुरस्कार हे राज्यकर्ते कसा सारखा करीत होते, याची कल्पना त्यानी स्वतंत्र मुस्लिम चळवळीस दिलेल्या प्रोत्साहनावरून स्पष्ट येते. नुसत्या शिक्षणप्रसाराचे नावाखाली एकोणिसावे शतकाचे उत्तरार्धात सुरू झालेली मुस्लिमांची चळवळ विसावे शतकाचे सुरवातीला नुसती शैक्षणिक चळवळ राहू शकली नाही. ब्रिटिश राज्यकर्त्यांना उघड उघड मदत करणारे काही मुस्लिम पुढारी आपले राजकीय दात उघडपणे दाखवू लागले. पंजाबमधील व्यापारी, सावकार व जमीन-दार मुसलमानांनी तर आपला स्वतंत्र धार्मिक गट अहमदिया पंथ या नावाने सुरू केला. अहमद क्वाहीयांनी नावाचे गृहस्थ या गटाचे प्रमुख होते. त्यांच्या भाषणातून इस्लामचे धार्मिक तत्त्वाचे नव्या आर्थिक, सामाजिक व राजकीय दृष्टिकोनातून पुनरुज्जीवन झाले पाहिजे, नुसत्या मुसलमान जमातीने नव्हे तर आपल्यात येऊ शकणाऱ्या

ख्रिश्चन व हिंदु जमातीतील लोकांना बरोबर घेऊन आपण पुढे सरसावले पाहिजे व ब्रिटिश राजवटीला उचलून धरले पाहिजे असे ते सांगत. या अहमदिया व पूर्वीच्या कट्टर मुसलमानांची भांडणे होऊ लागली व हे अहमदिया पंथीय मंडळी, ब्रिटिशांना मदत करणारे, सुधारलेले मुसलमान म्हणून वावरू लागले. पण पंजाबात तरी सय्यद अहमद खान यांनी निर्माण केलेल्या मुस्लिम संघटनेवर कुरघोडी करू शकले नाहीत. या नव्या तत्त्वज्ञानामुळे कलकत्ता (बंगाल) विभागातील मुस्लिम संघटनातून बेबनाव निर्माण झाले, पण मुंबई भागात मात्र त्यांची फारशी डाळ शिजू शकली नाही.

अलिगड कॉलेजचे प्रिन्सिपॉल थिओडर बेक यांनी पेटविलेली स्वतंत्र मुस्लिम अस्तित्वाची आग बंगाल व उत्तर प्रदेशाचे बाजूला विझलेली नव्हती. १९०५ पासून १९०८ पर्यंतचे काळात राष्ट्रीय चळवळीची झालेली प्रगती तरुण मुसलमान मंडळीचे डोळ्यासमोर होती व त्यातील काही राष्ट्रीय चळवळीतील काँग्रेसची भूमिका समजून काँग्रेसकडे आपोआप वळू लागले. ब्रिटिशांनी शिक्षणप्रसाराचे नावाखाली मुसलमान समाजात निर्माण केलेल्या उत्तरेकडील व पूर्वेकडील संस्थातील काही तरुण मंडळी राष्ट्रीय भावनेने काँग्रेसच्या धोरणाचे स्वागत करू लागली. या तरुणांचा कल पाहून ब्रिटिश राज्यकर्त्यांनी दुभंगलेल्या मुस्लिम समाजाला एकत्रित आणण्यासाठी बंगालच्या फाळणीचा नवा डाव टाकला. बंगालसारख्या आर्थिक दृष्ट्या सामर्थ्यवान प्रदेशातील मुस्लिम जमातीचा प्रदेश, राज्यकारभाराची सोय पुरी करून वेगळा करावा व तेथे काँग्रेसविरोधी मुस्लिम जमातीच्या चळवळीला पुढे सरसावण्यास वाव द्यावा हा यामागे मुख्य हेतु. लॉर्ड कर्झन यांचेसारख्या व्हाईसरॉयची ही भेदनीति काँग्रेस पुढारी ओळखून होते व त्यांनी या फाळणीविरुद्ध मोहीम सुरू करून सर्व देशाला जागे केले. यावेळी बंगालच्या फाळणीचा पुरस्कार लॉर्ड कर्झन यांचेसारखे हिंदद्वेष्टे व्हाईसरॉय कशासाठी करीत होते यांचे प्रत्यंतर त्यांनी डाका येथे केलेल्या एका भाषणावरून येण्यासारखे आहे. ते म्हणाले, ‘पूर्वबंगालमधील मुस्लिम जमा-

तीचे सामर्थ्य वाढावे म्हणून ही फाळणी आम्ही करीत आहोत त्यामुळे मुस्लिम समाजाचा फायदाच होणार आहे.'

या वेळच्या ब्रिटिश धोरणाचा पुरस्कार करणाऱ्या 'स्टेटस्-मन' या पत्राने तर फाळणीचा पुरस्कार करताना हिंदुसमाजाच्या वाढत्या आकांक्षांना पायबंद घालण्यासाठी बंगालची फाळणी आवश्यक आहे व त्यात मुस्लिम समाजाचे हित आहे असे आपले अग्रलेखातून प्रतिपादले होते. या वेळी फाळणीचा पुरस्कार करणाऱ्या संस्थांनी आपले घोषणात स्वराज्य, स्वदेशी व स्वजाती अशा तीन घोषणांचा प्रामुख्याने पुरस्कार केला व मुसलमान उद्योगधंदे, मुसलमानीव्यापारी, मुसलमानांसाठी स्वतंत्र शाळा व शिक्षणाची सोय ही आमिषे या फाळणीमागे चिकटविली जाऊ लागली. कलकत्त्याचे बाजारातील मारवाडी समाजाचे वर्चस्व कसे उधळून लावावे यासंबंधी योजना आखल्या जाऊ लागल्या व ब्रिटिश भेदनीतीने बंगालचे फाळणीचे निमित्ताने आणखी एक पाऊल पुढे टाकले. या चळवळीचा परिणाम राष्ट्रीय काँग्रेसवर झाला नाही, असे म्हणता येणार नाही. काही बुद्धिमान मुसलमानांनी काँग्रेसशी जोडलेला संबंध या वेळी तोडला व या बंगालफाळणीचे मोहजालात ते पुरते गुरफटून गेले व त्यातूनच स्वतंत्र मुस्लिम राष्ट्रीय पक्षाचे स्थापनेची बोलणी सुरू झाली.

१९०४ चे काँग्रेसला मुसलमान समाजाचे ७०० प्रतिनिधी हजर होते. परंतु या नव्या राष्ट्रीय पक्षाचा परिणाम एवढा झाला की बनारस येथे झालेल्या काँग्रेस अधिवेशनाला अवघे १७ मुसलमान प्रतिनिधी हजर होते. त्यात २१ वर्षांचे अबुलकलम आझाद यांचेसारखे आजन्म काँग्रेसशी निष्ठावंत राहिलेले पुढारी होते. हिंदु-मुसलमान ऐक्याशिवाय इंग्रजांविरुद्ध लढा देणे शक्य नाही, ही लोकमान्य टिळकांची भूमिका बंगालमध्ये मानणारा एक लहानसा गट मौलाना आझाद यांचेसारख्या तरुणांनी त्या वेळी तयार केला, व ही गुप्त चळवळ बंगालफाळणीला विरोध करणारी प्रभावी चळवळ ठरली.

या वेळी ब्रिटिशांचा हस्तक म्हणून वावरणाऱ्या अलिगड कॉलेजातील मुस्लिम गटाने आपले संरक्षणासाठी स्वतंत्र अधिकारांची

मागणी करणारी पत्रके काढावयास सुरुवात केली व या वेळचे अलिगड कॉलेजचे दुसरे ब्रिटिश प्रिन्सिपॉल मि. आर्चिबाल्ड यांनी ती उचलून धरली. या स्वतंत्र गटाचे पुढारीपण स्वीकारून ते सिमल्याला व्हाईसरॉयचे सेक्रेटरी कर्नल डनलप् स्मिथ यांचे भेटीसाठीही गेल्याचा पुरावा सापडतो. मि. स्मिथ व आर्चिबाल्ड यांनी या वेळी केलेल्या चर्चेतूनच एक स्वतंत्र मुस्लिमांचे शिष्टमंडळाने व्हाईसरॉयची भेट घेऊन हिंदु पुढाऱ्यापासून संरक्षणाची मागणी करावी असे ठरविण्यात आले. या शिष्टमंडळानी काय मागण्या कराव्या व ब्रिटिश राज्यसत्तेशी आम्ही एकनिष्ठ राहू अशी शपथ घ्यावी वगैरे गोष्टी मि. आर्चिबाल्ड यांनी त्यांना पढविल्या होत्या, पण त्या शिष्टमंडळातील तरुण मंडळींना तेवढ्याशा मान्य झाल्या नाहीत. शिष्टमंडळाने जरी अलिगड गट प्रमुख होता तरी त्यांना मुंबईच्या बद्रुद्दीन तय्यबजी यांचेसारख्या कार्यकर्त्यांना असा आततायीपणा न करण्याचा सल्ला दिला.

आक्टोबर १९०६ चे पहिले तारखेस तिसरे नामदार आगाखान यांचे नेतृत्वाखाली ७० मुस्लिम पुढाऱ्यांचे शिष्टमंडळ त्या वेळचे व्हाईसरॉय लॉर्ड मिन्टो यांचे भेटीस गेले. या वेळी आगाखान यांचे कुटुंबियांना ब्रिटिश अधिकारी व लष्करी ब्रिटिश प्रमुखांचे दरबारी चांगला मान होता. विशेषतः मुसलमान धर्मियांचे स्वतंत्र शिष्टमंडळ व्हाईसरॉयचे भेटीसाठी या वेळी जाणे व त्यांनी आपले हिंदु दडपणापासून संरक्षण करण्याची मागणी करणे हे ब्रिटिश राजनीतीचे एक मोठे यश समजण्यात आले. या शिष्टमंडळाला दिलेल्या खान्याचे प्रसंगी व्हाईसरॉय लॉर्ड मिन्टो यांनी केलेल्या भाषणात मुस्लिम जमात ही एक स्वतंत्र जमात म्हणून ओळखली जावी. ह्या शिष्टमंडळाने केलेल्या मागणीला पाठिंबा दिला व ब्रिटिश सरकार ही मागणी न्याय्य समजते असे सांगितले. या जमातीला स्वतंत्र प्रतिनिधित्व, येणाऱ्या नव्या सुधारणात देण्याचा ब्रिटिश सरकारचा विचार असल्याचेही त्यांनी या वेळी बोलून दाखविले. व्हाईसरॉय मिन्टो यांचे हे आश्वासन म्हणजे मुस्लिम गट हिंदुस्थानात वेगळा काढण्याचे

कारस्थानाला आलेले पहिले दृश्यफल होय. या कारस्थानाचे प्रतीक म्हणजेच १९०९ साली पास झालेल्या इंडियन कौन्सिल ॲक्ट या कायद्यानं करण्यात आलेली हिंदु-मुसलमानासाठी स्वतंत्र मतदार संघाची योजना होय. ब्रिटिश भेदनीतीचे हे पहिले प्रतीक होय व अखेरपर्यंत हिंदुस्थानला ते अत्यंत त्रासदायक झाले. या कायद्याचे जन्मानंतर हिंदु महासभा व मुस्लिम लीग या दोन पक्षांची उभारणी झाली. सिमला येथे गेलेल्या मुस्लिम शिष्टमंडळानेच मुस्लिम राजकीय पक्ष नावाची स्वतंत्र संघटना स्थापन केली. याचे अध्यक्ष मुस्लिम पोलिटिकलचे असोसिएशन पहिले अध्यक्ष डाक्याचे नबाब सलिमुल्ला होते. त्यांनी आपल्या संघटनेच्या मूळ ध्येयातच ब्रिटिश राज्यकर्त्यांना सदैव पाठिंबा देऊन मुस्लिम हितसंबंधांचे संरक्षण करील असा खुलासा केला होता. यावरून या संघटनेवरही अलिगड गटाचे केवढे प्रभुत्व होते याची कल्पना येते. याच संघटनेने अखिल भारतीय मुस्लिम जमातीची एक परिषद १९०७ चे डिसेंबरात कराची येथे घेतली व त्यातच 'ऑल इंडिया मुस्लिम लीग' या संस्थेचा जन्म झाला.

ही परिषद जरी कराची येथे घेण्यात आली, तरी तिचे सर्व नेतृत्व अलिगड गटाकडे होते. अदमजी पिरभाई नावाचे एक प्रमुख उद्योगपति हे या परिषदेचे अध्यक्ष होते. या स्वतंत्र मुस्लिम संघटनेच्या प्रतिष्ठापनेला जरी उत्तर प्रदेश व बंगाल व उत्तरेकडील बऱ्याच मुस्लिम संघटनांनी पाठिंबा दिला असला तरी मुसलमान समाजाचे मुंबईचे तय्यबजी यांचेसारखे पुढारी मुस्लिम लीगमधील जातीय संघटनेला तेवढे पाठिंबा देणारे नव्हते. मुस्लिम लीगचे पहिले अध्यक्ष आपल्या आत्मचरित्रात या लीग चळवळीसंबंधी लिहितात, 'मुस्लिम लीगसारखी संस्था ताबडतोब अस्तित्वात आणण्याची आवश्यकता मला १९०६ साली अलिगड येथील पुढारी मंडळींचे गटांशी चर्चा केल्यानंतर वाटू लागली. ब्रिटिश सरकारकडून आपण स्वतंत्र राजकीय वैशिष्टय प्राप्त करून घेतले पाहिजे व एका मोठ्या राष्ट्रातील एक स्वतंत्र राष्ट्र गट म्हणून मुस्लिम समाजाला स्थान प्राप्त झाले पाहिजे असे मला वाटू लागले.' मुस्लिम लीगच्या स्थापनेनंतर जे

कागदपत्र हाती लागतात त्यावरून पाहता लीगची स्थापना १) मुसलमान जमातीने ब्रिटिशांशी राजनिष्ठ राहून त्यांचेविषयी समाजाचे मनात निर्माण होणारे गैरसमज दूर करावे. (२) मुस्लिम समाजाचे हितसंबंध, हक्क व अपेक्षा ब्रिटिश राज्यकर्त्यांपुढे शांततेच्या मार्गाने मांडाव्या. (३) दुसऱ्या समाजाविषयी मुस्लिम जमातीच्या मनात निर्माण होणाऱ्या द्वेषमूलक भावना उद्‌भवणार नाहीत अशी काळजी घ्यावी. अशा तीन मुख्य तत्त्वावर आधारलेली होती. १९०८ साली मुस्लिम लीगची दुसरी परिषद अलिगड येथेच घेण्यात आली व तिचे अधिवेशन महमद शहाद्दीन यांचे अध्यक्षतेखाली झाले. या परिषदेवर अलिगड गटाचे पूर्ण प्राबल्य होते व बैठकीत बंगालचे फाळणीला पाठिंबा देणारे व काँग्रेसच्या स्वराज्य व स्वदेशी चळवळीला विरोध करणारे ठराव पास होऊन ब्रिटिशांचे अपेक्षेप्रमाणे मुस्लिम लीग संघटना राज्यकर्त्यांची पुरती हस्तक व राष्ट्रीय चळवळीची पूर्ण विरोधक बनली. यावेळी लीगच्या शाखा स्थापन झाल्या व त्यांच्या चाळीस कचेऱ्या ठिकठिकाणी काम करू लागल्या. इंग्लंडमध्येही लीगचे कार्याचे प्रसारार्थ अमीरअल्ली नावाचे गृहस्थांनी लीगची सूत्रे हाती घेतली. बहुतेक प्रांतातून लीगचे सूत्रचालक मोठमोठे जमीनदार व राजेरजवाडे होते. दक्षिणेकडे हैद्राबादचे निजामांनी व इतर जमीनदारांनी हे कार्य हाती घेतले. फक्त मुंबई, बिहार व मद्रास हे तीन प्रांत असे होते. त्यात मात्र सर्वसाधारण मुस्लिम पुढाऱ्यांचे हातीच या संघटनेची सूत्रे होती. पण एवढे करूनही मुस्लिम लीग सर्वसाधारण मुस्लिम समाजात व कामगारवर्गात यावेळी फारशी हातपाय पसरू शकली नाही. काँग्रेसविरोधक चळवळ ब्रिटिशांनी या मुस्लिम लीगकरवी उभी केली, अशी सर्वांची भावना असल्याने त्याचा परिणाम व्हावा तसा झाला नाही. पूर्व बंगालमधील क्रांतिकारक चळवळीस हातभार लावणारात तरुण मुसलमान पुढारी भरपूर होते, यामुळेच १९११ साली बंगालची फाळणी रद्द करणे ब्रिटिशांना भाग पडले. वंगाल फाळणीला पाठिंबा देणाऱ्या मुस्लिम

लीगची ही फजिती फार मोठी होती व १९११ चे सुमारास मुस्लिम लीगची समाप्ति येथेच होते किंवा काय अशी चिंता निर्माण झाली.

पहिल्या महायुद्धाचे सुरुवातीला तर मुस्लिम लीग या संघटनेची स्थिती अशी झाली की मुस्लिम लीगमधील काही तरुण मंडळींनी तिच्या जुन्या ध्येयापासून या संघटनेला परावृत्त करून तिचेमध्ये नवे राष्ट्रीयत्त्व निर्माण करण्यास सुरुवात केली. लखनौचे नोमानी शिबली नावाचे गृहस्थांनी मुस्लिम गॅझेट नावाचे एक नवविचाराचे पत्र काढून त्यातून लीगचे धर्मविषयक दृष्टिकोनाला तडाखे देण्यास सुरुवात केली व नुसती धार्मिक स्वतंत्रता राखून मुसलमानांचे चालणार नाही. इतर धर्मियांशी खांद्याला खांदा भिडवून त्यानी प्रथम हिंदवी स्वराज्याचे स्थापनेचा लढा लढविला पाहिजे, अशा तऱ्हेचा प्रचार सुरू केला.

तरुण मुस्लिमांचा हा दृष्टिकोन ब्रिटिशांचे आजपर्यंत केलेल्या सर्व कार्यावर घाला घालणाराच होता. या तरुण मुस्लिमांचे प्रचाराला मौलवी व जमीनदार गटाने जरी कसून विरोध केला तरी त्यांचेमध्ये स्वाभिमानाची पेटलेली ही ज्योत ते विझवू शकले नाहीत. व त्यातूनच पुढे 'पॅन' इस्लामिक चळवळीचा जन्म झाला. या चळवळीचे धागेदोरे नुसते हिंदुस्थानपुरते मर्यादित राहिले नाही, तर इजिप्त व तुर्कस्तान पर्यंत याची पाळेमुळे गेली. काँग्रेसला मिळालेले अबुलकलम आझाद यांचेसारखे मुस्लिम देशभक्तांनी याच वेळी 'अल-हिलाल' सारखी प्रभावी पत्रे काढून उर्दूतून मुस्लिम समाजाला जागे करण्याचा सपाटा चालविला. त्याचा परिणाम एवढा झाला की मुस्लिम समाजात क्रांतीचे नवे बीज पेरले गेले. अल्हिलाल या पत्राने प्रथम अलिगडचे ब्रिटिशधार्जिण्या गटावर जोराची टीका करून तो गट नेस्तनाबूत करण्याचा चंग बांधला.

याचा परिणाम एवढा झाला की या अलिगडगटाकडून मौलाना आझादांना ठार करण्याची धमकींची पत्रे येऊ लागली. १९१३ साली आग्रा येथे भरलेल्या लीगच्या वार्षिक अधिवेशनात तर, महमदअल्ली (अल्लीबंधूपैकी) झाफरअल्लीखान, अबुलकलम आझाद व सैफुद्दीन

किश्चलु या पुढाऱ्यांनी मुस्लिम लीगमधील जमीनदारांच्या सत्तेला धक्का देऊन सर्वसाधारण मुस्लिमांची संघटना बनविण्याचा प्रयत्न केला. व हिंदवी स्वराज्य फक्त मुस्लिम लीग व काँग्रेस यांचे सलोख्यानेच मिळू शकेल ही कल्पना सर्वांपुढे मांडण्यात आली. याचा परिणाम सर्व परिषदेवर एवढा झाला की आगाखान यांचेसारखे ब्रिटिश राजवटीचे कट्टे पुरस्कर्ते काँग्रेसशी बोलणी करावयास तयार झाले. अलिगड कॉलेजतील तरुण मुस्लिम गटही आता एवढा फिरला की याच वेळी त्यांनी आपली जुनी ब्रिटिश सहकार्याची तत्त्वे झुगारून देऊन इराण व तुर्कस्तानमध्ये सुरू झालेल्या ब्रिटिशविरोधी चळवळीला पाठिंबा देण्यासाठी फंड जमा करावयास सुरुवात केली. अहमदअल्ली व शौकतअल्ली हे दोन अल्लीबंधु याच वेळी पुढे आले व त्यांनी मुस्लिमांची सशस्त्र स्वयंसेवकपथके तयार करण्याचा चंग बांधला. सरहद्द प्रांतातील महमद हसन नावाचे पुढाऱ्यांनी ही चळवळ उत्तरेकडे पसरविली व हिंदी काँग्रेसचे कार्याला मुस्लिम लीगचे पुढारी आपोआप साथ देऊ लागले. उत्तरेकडील महमद हसन यांची चळवळ एवढी प्रभावी झाली की या पुढाऱ्यांनी उत्तरेकडील हिंदी प्रदेश स्वतंत्र करण्याची एक योजनाही आखली होती. परंतु ती अयशस्वी झाल्यामुळे महमद हसन याना पकडून ब्रिटिशांनी माल्टा बेटावर स्थानबद्ध केले. या मुसलमान क्रांतिकारक चळवळीतून शिल्लक राहिलेल्या पुढाऱ्यांनी पुढे ' खिलाफत चळवळ ' हाती घेतली व तिच्या छोटयामोठ्या हालचाली १९२२ पर्यंत सुरू होत्या. परंतु पहिल्या महायुद्धाचे काळात ब्रिटिशांना पदोपदी त्रास देणारी चळवळ या तरुण मुस्लिम क्रांतिकारकांनी हिंदमध्ये सारखी चालू ठेविली व जुन्या अलिगड गटाचे प्राबल्य व त्यातून निर्माण होणाऱ्या ब्रिटिश भेदनीतीचे योजनांना बराच पायबंद बसला.

● ● ●

३ : जीनांचे हाती लीगची सत्ता

एकीकडे जमीनदार व धनिकवर्ग व दुसरीकडे राष्ट्रीय बाण्याची तरुण मुस्लिम पिढी यांचे हाती सापडलेली लीगची चळवळ मार्गावर आणण्याचे खरे कार्य युद्धकालात लीगमध्ये प्रवेश केलेले पुढारी महमदअल्ली जीना यांनी केले. त्यांनीच पुढे पाकिस्तानची कल्पना मूर्त स्वरूपात आणली व पहिले गव्हर्नर जनरल म्हणून पाकिस्तानचा कारभार पाहिला. महमदअल्ली जीना हे काही जुन्या जमीनदारवर्गापैकी लीग पुढारी नव्हते अगर मुस्लिम उलेमांचे धार्मिक पाठबळही त्यांना नव्हते. त्यांचे वडील काठेवाडातील खोजा व्यापारी. बॅ. जीना यांनी व्यापारी म्हणूनच पुढे यावे अगर एकदा उद्योगपति बनावे, अशी त्यांचे वडिलांची इच्छा होती. त्याच दृष्टीने त्यांचे शिक्षणास सुरुवात झाली. कराची येथे एका मिशन हायस्कूलमध्ये शिकत असताना त्यांनी दाखविलेल्या प्राविण्यामुळे त्यांनी बॅरिस्टर व्हावे म्हणून त्यांना श्रीमंत वडिलांनी इंग्लंडमध्ये शिक्षणासाठी पाठविले. ते इंग्लंडमधील वास्तव्यात ब्रिटिश समाजाशी राजकीय व सामाजिकदृष्ट्या एवढे एकरूप झाले की, ते ज्या वेळी परत आले, त्या वेळी त्यांना हिंदी म्हणण्याऐवजी युरोपियन म्हणणेच जास्त योग्य झाले असते. एवढे ते बदलून गेले होते. त्यांनी मुंबईत

वकिलीचे व्यवसायाला सुरुवात केली व १९०६ पर्यंत ते उत्तम वकील म्हणून गाजू लागले. मुसलमान समाजात इतका अस्खलित इंग्रजी बोलणारा वकील त्या वेळी क्वचितच आढळे. त्यामुळे सर्व मुसलमान समाजाचे बहुतेक मोठे दावे चालविणारे म्हणून मुंबईत त्यांचा बोलबाला झाला. त्यांना राजकीय जीवनाची खरी ओळख श्री. दादाभाई नवरोजी यांचेमुळे झाली व १९०६ साली ते कॉंग्रेस अधिवेशनास दादाभाई नवरोजी यांचे सेक्रेटरी म्हणूनच आले होते. मुसलमान समाजाबरोबर पारशी समाजावरही त्यांनी आपली पकड चांगलीच बसविली व पुढे पारशी समाजातील दिनशा पेटिट यांचे कन्येशी त्यांचा विवाह झाला. यामुळे मुंबईतील मुसलमान–पारशी या दोन्ही समाजाचे राजकीय नेतृत्व त्यांचेकडे आले. मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलवर मुंबईचे मुसलमान गटातर्फे त्यांची निवड झाली व त्यांनी राजकारणात प्रथमच धडाडीने पाऊल टाकले. त्या वेळी कॉंग्रेसमधील मवाळ राजकीय पुढाऱ्यांशी त्यांची चांगली ओळख होती. श्री. गोपाळ कृष्ण गोखले तर त्यांचे उत्तम मित्रांपैकी होते. ब्रिटिशांचे हातून सत्ता आपले हाती घेण्यासाठी सर्व राजकीय पक्षांना एकत्रित आले पाहिजे, असे मत प्रतिपादन करणाऱ्या गटातच बॅ. जीनांचा समावेश होता. त्याच धोरणाने त्यांनी त्यावेळची मुस्लिम लीग व कॉंग्रेस यांचा सलोखा घडवून आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला व ते हिंदु-मुस्लिम ऐक्याचे प्रवर्तक म्हणूनच ओळखले जाऊ लागले. बॅ. जीना १९१२ साली प्रथम मुस्लिम लीगचे अधिवेशनासाठी गेले व पुढील दोन वर्षात मुस्लिम लीगचे एक सर्वमान्य पुढारी म्हणून ओळखले जाऊ लागले.

लंडनमध्ये १९१४ साली भारतमंत्र्याचे कौन्सिलमध्ये प्रांतिक व मध्यवर्ती कौन्सिलने निवडलेले प्रतिनिधी घेण्याची मागणी करण्यासाठी गेलेल्या शिष्टमंडळात बॅ. जीना होते. यानंतर पहिल्या महायुद्धात ब्रिटनला कॉंग्रेस व मुस्लिम लीगने पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला व या निमित्ताने ते इंग्लंडला गेले. ते इंग्लंडहून परत आल्यानंतर त्यांनी कॉंग्रेस व मुस्लिम लीग या दोन्ही पक्षांची एकी घडवून

आणण्यासाठी पुन्हा आटोकाट प्रयत्न सुरू केले. मुंबईच्या काही लीग-पुढाऱ्यांना हाताशी धरून १९१५ साली मुस्लिम लीगचे अधिवेशनाला काँग्रेसपुढाऱ्यांना बोलविण्याचा बॅ. जीना यांनी चंग बांधला व मुंबई येथे डिसेंबरात झालेल्या मुस्लिम लीगचे अधिवेशनाला डॉ. ॲनी बेझंट, सौ. सरोजिनी नायडू व नुकतेच आफ्रिकेतून आलेले महात्मा गांधी ही मंडळी हजर राहिली. पण बॅ. जीनांच्या या हालचाली लीगमधील अलिगड गटाला बिलकुल आवडल्या नाहीत. भर अधिवेशनात हे मतभेद एवढे कळसास पोहोचले की प्रकरण गुद्दागुद्दीवर आले व पोलिसांना मध्ये पडून ते आवरावे लागले. परंतु बॅ. जीनांनी अखेरपर्यंत काँग्रेसशी सलोख्याने मिळते घेऊन लीगने आपली राजकीय चळवळ चालवावी हा आपला निर्धार सोडला नाही व शेवटी काँग्रेसशी सलोखा घडवून आणण्यासाठी करावयाच्या कराराचा मसुदा तयार करण्यासाठी एक स्वतंत्र समिति याच बैठकीत स्थापन करण्यात आली. या अधिवेशनात पुढील वर्षाचे अध्यक्ष म्हणून बॅ. जीनांची निवड होऊन त्यांचे मुस्लिम लीगचे पुढारीपण मान्य केले गेले व अलिगड गटाने ब्रिटिश भेदनीति उचलून धरण्यासाठी केलेले सर्व प्रयत्न वाया गेले.

यावेळी मुस्लिम लीगला कायदेमंडळात जातीय तत्त्वावर (कम्युनल ॲवॉर्ड) राखीव जागा देण्याची कल्पना चर्चिली जात होती ती कोणत्या उपायाने काँग्रेसच्या गळी बॅ. जीना यांनी उतरविली याचा इतिहास पाहण्यासारखा आहे. ते या करारासंबंधी म्हणाले, ' आज आम्ही स्वतंत्र मतदारसंघाची जी मागणी करीत आहोत, तो काही लीगने ठरविलेल्या धोरणाचा प्रश्न नाही. आज मुस्लिम समाजाची ती एक गरज होऊन बसली आहे. वर्षानुवर्ष ज्या संभ्रमात व झोपेत मुस्लिम समाज घोरत पडला आहे, त्यातून त्यांना जागे करण्यासाठी हे आहे. तेव्हा मी माझे हिंदुबंधुंना अशी विनंती करतो की मुस्लिम समाजाचा विश्वास संपादन करण्यासाठी तरी या स्वतंत्र मतदारसंघाचे मागणीला त्यांनी विरोध करू नये. जर मुसलमान समाजाला स्वतंत्र मतदारसंघाची आवश्यकता वाटते तर त्यांचेशी

सहमत होऊन हिंदुसमाजाने आपले ऐक्य कायम राखावे.' बॅ. जीना यांची ही विनंती हिंदु–मुस्लिम ऐक्याचे प्रतिष्ठापनेसाठी काँग्रेसने मान्य केली व या करारावर दोन्हीकडील पुढाऱ्यांनी सह्या केल्या. यावेळी लीगच्या वतीने बॅ. जीना यांनी सही केली होती. या एकोप्यानंतर मुस्लिम लीग व काँग्रेस या दोन्ही संस्थांची अधिवेशने १९१६ साली लखनौ येथे भरली व दोन्ही परिषदेत हा सलोख्याचा करार ठरावरूपाने पास झाला. हिंदु–मुस्लिम ऐक्याचा 'लखनौ करार' म्हणून तो ओळखला जातो.

या करारात काँग्रेसने व मुस्लिम लीगने एकत्रित येऊन पुढील घटनात्मक सुधारणांसाठी व वसाहतीचे स्वराज्यासाठी प्रयत्न करावे असे म्हटले असून स्वतंत्र मतदार संघाची कल्पना दहा वर्षे तरी अस्तित्वांत रहावी अशी अट त्यांत होती.

पहिले महायुद्ध संपल्यानंतर १९१७ चे रशियन क्रांतीने जी लाट सर्व जगात उसळली त्याचा परिणाम हिंदमधील राजकीय पक्षावर झाला. हिंदु-मुसलमान ऐक्यावर भर देऊन लखनौ करार करणाऱ्या पुढाऱ्यांची ब्रिटिश सत्तेला विरोध करण्यासाठी एक नवी आघाडी हिंदुस्थानात तयार होऊ लागली, पण मुलिलम लीगमधील जमीनदारवर्ग मात्र तरुण वर्गाची ही धडाडी तेवढीशी मान्य करावयास तयार नव्हता. १९१९ साली ज्यावेळी मॉन्टेग्यु-चेम्सफर्ड सुधारणा अंमलात आल्या त्यावेळी काँग्रेसमधील काही मवाळ पंथीय मंडळी या सुधारणाना पाठिंबा देऊन बाजूला पडून या सुधारणा राबवाव्या असे म्हणू लागली. तर काँग्रेसमधील जहाल पक्ष प्रत्यक्ष प्रतिकाराचे चेतावणीची भाषा बोलू लागला. बॅ. जीनांचे नेतृत्वाखाली तयार होणाऱ्या मुस्लिम लीगमधील नेत्यांना काँग्रेसमधील मवाळांचा पंथ पसंत पडला व प्रत्यक्ष चळवळीची भाषा बोलणाऱ्या काँग्रेसवाल्यापासून ते काहीसे मागे पडू लागले. परंतु यावेळी मुस्लिम समाजात एक गट असा होता, की त्याला प्रत्यक्ष प्रतिकाराची चळवळ मान्य होऊन त्यांनी काँग्रेसमध्ये यासाठी प्रवेश केला.

काँग्रेस सुरू केलेल्या नव्या चळवळीपासून मुस्लिम लीगचा एक

महत्त्वाचा भाग बाजूला पडला, तरी ब्रिटिश राजवटीला विरोध करण्यासाठी लीगने खिलाफत चळवळ जोरात सुरू केली. १९१९ साली पहिली खिलाफत कमिटी स्थापन झाली व १९२० साली ठिकठिकाणी मुस्लिम जमातीच्या खिलाफत कमिट्या सर्वत्र निघाल्या. त्यात विद्यार्थी, कामगार, सर्व व्यवसायातील मुसलमान सामील झाले. खिलाफत चळवळ जरी तुर्की खलिफाचे विरुद्ध ब्रिटिशांच्या धोरणाचे निषेधार्थ स्थापन झाली असली, तरी हिंदमधील तिचे स्वरूप ब्रिटिश विरोध एवढेच होते अणि काँग्रेसनेही या खिलाफत चळवळीला पाठिंबा दर्शविला. १९१९ च्या अमृतसरचे लीग अधिवेशनाला श्री. मोतीलाल नेहरू, महात्मा गांधी व ॲनी बेझंट हे हजर होते व त्यानी खिलाफत चळवळीला पाठिंबा देणारी भाषणे केली. आणि काँग्रेसप्रमाणे ब्रिटिशांविरुद्ध असहकाराचा मार्ग स्वीकारण्याचा मुस्लिमाना उपदेश केला. यावेळी प्रत्यक्ष प्रतिकाराचे चळवळीसाठी खिलाफत चळवळीची सूत्रे अबुलकलाम आझाद यांनी हाती घेतली व ' जमियत उल्उलेमा हिंद ' ही नवी संघटना या चळवळीसाठी स्थापन केली.

प्रथमपासूनच मौलाना आझाद यांचे मनात महात्मा गांधीविषयी अतिशय प्रेम असल्यामुळे १९२० चे काँग्रेसच्या असहकाराचे चळवळीत त्यांनी भाग घेतला होता. ही गोष्ट बॅ. जीना यांना तेवढीशी आवडली नाही. त्यांनी व लीगमधील धनिकांचे गटांनी असहकाराचा महात्माजींचा मार्ग आम्हाला मान्य नसल्याचे जाहीर केले व त्याचा पुरस्कार करणाऱ्या खिलाफत चळवळीचे धोरण पसंत नसल्याची पत्रके जाहीरपणे काढली. मुस्लिम लीगची अशा तऱ्हेने प्रथमच या वेळी दोन छकले पडल्याचे स्पष्ट दिसू लागले. खिलाफत व काँग्रेस यांच्या असहकाराचे चळवळीतील एकोप्यामुळे बॅ. जीनांनी काँग्रेस सभासदात्वाचा राजीनामा १९२१ साली दिला. या वेळी महात्माजींना लिहिलेल्या एका पत्रात ते लिहितात, ' तुमच्या कार्यक्रमाला मी पाठिंबा देऊ शकत नाही. यामुळे सर्वसाधारण समाजाला तुम्ही अशा तऱ्हेच्या चळवळीत ओढीत आहात की त्याचा परिणाम काय होईल याची

मला कल्पना करवत नाही !' याच वेळी कलकत्ता येथे जाहीर सभेत केलेल्या एका भाषणात बॅ. जीना म्हणाले, 'महात्मा गांधींचा मार्ग हा एक चुकीचा मार्ग आहे असे मला वाटते व माझा मार्ग बरोबर आहे. घटनात्मक मार्गाने कोणतीही चळवळ करणे हे मी आमचे ध्येय समजतो.' या दिवसापासून महात्माजींचे कोणत्याही चळवळी-विषयी बॅ. जीनांनी कधीही सहानुभूती दाखविली नाही. त्यांचे मागे या बदलामुळे आलेला मुस्लिम धनिकांचा समाज या त्यांचे धोरणाला सदैव चिकटून होता. १९२० चे काँग्रेसअधिवेशात महात्माजींच्या असहकाराचे चळवळीला विरोध करणारे बॅ. जीना हे एकमेव पुढारी होते. यानंतर त्यांनी तर काँग्रेसचा राजीनामा सादर करून संपूर्णपणे महात्माजींपासून दूर रहावयाचे ठरविलेले दिसते. या घटकेपासून एकेकाळी हिंदु–मुस्लिम ऐक्यासाठी प्रयत्न करणारे बॅ. जीना मुस्लिम समाजाचे स्वतंत्र अस्तित्वासाठी प्रयत्न करू लागले व काही काळ अलिगड गटापासून वेगळा पडलेला मुस्लिम समाज बॅ. जीनांचे नेतृत्वाखाली पुन्हा एकत्रित येऊ लागला. बॅ. जीनांचे बाजूचे उर्दू पत्रातून खिलाफत चळवळीचे पुरस्कर्ते महमंदअल्ली व अब्दुल कलाम आझाद यांचे विरुद्ध उघडपणे आग पाखडली जाऊ लागली. जणू अलिगड कॉलेजातील तरुण मुस्लिम पिढीला मात्र ती तेवढीशी आवडली नाही. बऱ्याच मुसलमान तरुणांनी आझादांचे खिलाफत चळवळीत उघडपणे भाग घेतला व खिलाफत चळवळीचे पुरस्काराने होणाऱ्या अनेक ब्रिटिशविरोधी निदर्शनात त्यापैकी काही दिसू लागले. खिलाफत चळवळीचे निमित्ताने सुरू केलेली ही तरुण मुस्लिमांची ब्रिटिशविरोधी चळवळ महात्माजींना एवढी आशादायक वाटली, की १७ ऑक्टोबर १९२० रोजी लिहिलेल्या एका लेखात महात्माजींनी ही हिंदु–मुसलमानांची ब्रिटन विरोधी एकी उद्याचे इतिहासकारांना सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावी लागेल, असे म्हटले आहे. शांततेने हिंदु-मुसलमानांची निदर्शने या वेळी पार पडत होती.

१९१९ ते १९२१ पर्यंतच्या काळात खिलाफत चळवळीचे निमित्ताने मौ. अबुल कलाम आझाद व महंमद अल्ली यांचे नेतृत्वा-

खाली खिलाफत चळवळीचा प्रसार एवढा झाला, की काँग्रेसच्या ब्रिटनविरोधी लढ्यांचे ती एक महत्त्वाचे अंग बनली. १९२१ चे जुलै महिन्यात भरलेल्या अखिल भारतीय खिलाफत परिषदेचे अध्यक्षस्थान अल्लीबंधुपैकी महंमदअली यांचेकडे आले. त्यावेळी ब्रिटिश असहकाराची प्रत्यक्ष चळवळ हाती घेण्यासाठी मुसलमान समाजांनी ब्रिटिश लष्करांत जाऊ नये, तो व्यवसाय देशविरोध समजला जाईल असा ठराव पास करण्यात आला. ही गोष्ट ब्रिटिश राज्यकर्त्यांना अजिबात आवडली नाही व त्यांनी खिलाफत परिषदेचे अध्यक्ष महंमदअल्ली व दुसरे प्रवर्तक एस्. किश्चलु यांना अटक केली. या धरपकडीनंतर झालेल्या मुस्लिम लीग अधिवेशनात, खिलाफत परिषद व जमियत उल् उलेमा या संघटनांनी चालू केलेल्या चळवळीचा निषेध करण्यात आला. यानंतर मात्र बाहेर असलेल्या अबुलकलाम आझाद यांचे नेतृत्वाखाली खिलाफत चळवळ चालविणाऱ्या मुसलमान पुढाऱ्यांनी लीग सभासदत्वाचे राजिनामे देऊन ते काँग्रेसमध्ये उघडपणे सामील झाले आणि मुस्लिम लीग पुन्हा बॅ. जीना यांचे नेतृत्वाखाली धनिक पुढाऱ्यांची स्वतंत्र संख्या बनली. या लीगने काँग्रेसच्या प्रत्येक धोरणाला विरोध दर्शवीत आपले कार्य यापुढे चालू ठेवले. लीगचे झालेले हे परिवर्तन ब्रिटिश राज्यकर्त्यांना केव्हाही फायदेशीर असेच होते व त्याचा फायदा त्यानी वेळोवेळी पद्धतशीरपणे घेतला.

या परिवर्तनाचा परिणाम मुस्लिम लीगवर येवढा झाला की, त्यातील तरुणांचा डावा गट अजिबात बाजूला पडला. उजव्या गटाच्या मंडळींनी ब्रिटिशांना हवा होता तसा, काँग्रेसच्या असहकार चळवळीला विरोध करणारा ठराव १९२१ चे अधिवेशनात पास केला. बॅ. जीना पुरतेपणे या उजव्या गटाचे आहारी गेले व त्यांचा सुरुवातीचा ब्रिटिशविरोध लुळा पडला. त्यांची कडवी भाषणे मऊ पडली व एकेकाळी महात्माजींना मानणारे हे मुस्लिम समाजनेते या घटकेपासून त्यांचे विरोधक बनले. कारस्थानी ब्रिटिश राज्य-

कर्त्यांना जे हवे होते ते घडून आले. काँग्रेसची चळवळ व तिचा ब्रिटिश धोरणाला होणारा कडवा विरोध यापासून मुस्लिम लीग बाजूला पडली. ती मुस्लिमांचे वरच्या थराची संघटना बनली व सर्वसाधारण मुस्लीमांना तिचे काही वाटेनासे झाले. धर्मद्वेष मात्र हळू हळू वाढीस लागला. १९२१ पासून लीगचे राजकारणात झालेला हा फरक तिच्या पाकिस्तानच्या भावी मागणीची पाया–खोदणी होती, असेच समंजस इतिहासकारांना म्हणावे लागेल.

● ● ●

४ :

हिंदु-मुसलमान भांडणाचा काळ

मुस्लिम लीग काँग्रेसपासून संपूर्णपणे बाजूला पडल्या नंतरचा १९२७ पर्यंतचा सहा वर्षांचा कालावधि या दुहीला चेतावणी देण्यासाठी ब्रिटिशांनी खर्ची घातला, असे म्हणता येण्यासारखा पुरावा या कालातील घडामोडीवरून हाती येतो. १९२३ पासून १९२७ पर्यंतच्या अवधीत जेथे संधी सांपडली तेथे दंगे झाले व ते मुद्दाम घडवून आणले जात होते किंवा काय अशी शंका उघडपणे घेतली जाऊ लागली. विशेषतः सरहद्द प्रांत, पंजाब वगैरे भागात तर मुसलमान कामगार व हिंदु–शीख जमीनदार व सावकार यांचेमध्ये ते झाले. या पदोपदी ठिकठिकाणी डोके वर काढणाऱ्या दंगली देशाला सर्वत्र ग्रासू लागल्या. काँग्रेस पुढाऱ्यांना या दंगलीने निर्माण झालेल्या परिस्थितीबद्दल शंका वाटू लागली व डॉ. राजेंद्रप्रसाद व हकीम अजमलखान यांनी पंजाबातील दंगलीचे शहरातून जाऊन परिस्थिति पाहण्याची इच्छा प्रदर्शित करताच त्यांना पंजाबात शिरण्यास मज्जाव करण्यात आला. डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी आपले आत्मचरित्रात या-संबंधी लिहिताना, आमचे या बंदीला मुख्य कारण म्हणजे ब्रिटिश अधिकाऱ्यांना हे दंगे आटोक्यात यावे असे वाटत नव्हते हे आहे असे म्हटले आहे. सरहद्द प्रांतात कोहाट येथे झालेल्या दोन दिवसांचे

दंगलीत ठार व जखमी झालेल्यांची संख्या १५५ होती. या चार वर्षांचे काळात झालेल्या ठिकठिकाणच्या हिंदु-मुसलमान दंगलीत कमीत कमी ४५० लोक ठार झाले असून व पाच हजार निरपराधी नागरिकांची अपरिमित नुकसानी झाली असावी असा अंदाज सरकारी माहितीपत्रकातूनही प्रदर्शित करण्यात आला आहे. याच दंगली-बरोबर हिंदु-मुसलमान समाजात नव्या नव्या चळवळी निर्माण होऊन धार्मिक भावना अधिक चेतविल्या जाऊ लागल्या. मुस्लिम संघटनांनी 'तबलीघ' नावाची नवी संघटना स्थापन करून मुसलमान होऊ इच्छिणाऱ्या कोणत्याही धर्मियाला आपले धर्मात घेण्याची मोहीम सुरू केली तर हिंदु महासभेत मुस्लिम झालेल्यांना पुन्हा हिंदुधर्मात घेण्यासाठी शुद्धी चळवळ सुरू झाली. या दोन्ही चळवळींचे काँग्रेस गोटात कधीही स्वागत झाले नाही. देशातील दोन्ही समाजातील विचारवंतांनी या प्रतिगामी चळवळी आहेत म्हणून दोन्ही संघटनांकडे बोटे दाखविली. मुस्लिम समाजात यामुळे होणारे परिवर्तन व त्यानुसार वाऱ्यासारख्या वाढत चाललेल्या दंगलीत बॅ. जीना हे कधीच सहभागी होऊ शकले नाहीत, अगर सर्वसाधारण मुसलमान नागरिकांना मानवेल अशी कोणतीही चळवळ ते करू शकले नाहीत. त्यांचा 'लीग' गट हा मुस्लिमांचे वरचे थरातच वाढू शकला. हिंदु-मुस्लिमांच्या होणाऱ्या दंगली आणि त्यांच्यापायी होणारा रक्तपात त्यांना मान्य नव्हता, परंतु याबद्दलची कारणमीमांसा मात्र ते वेगळ्या तऱ्हेने करीत. हिंदु-मुसलमान ऐक्यासाठी महात्माजींनी जी चळवळ या वेळी सुरू केली तिला त्यांनी पाठिंबा दिला. लखनौ येथे १९२३ साली भरलेल्या मुस्लिम लीगचे अधिवेशनात या ऐक्यासाठी काँग्रेस व मुस्लिम लीगने संयुक्त प्रयत्न करणे आवश्यक आहे, हा ठराव पास झाला, व तसाच ठराव दिल्ली येथील काँग्रेस अधिवेशनात पास करून घेण्यात आला. यामुळे दुरावलेल्या या दोन संघटना या ऐक्याचे मुद्द्यावर तरी एकत्रित आल्या. १९२५ साली हिंदु-मुसलमान ऐक्यासाठी महात्माजींनी बोलविलेल्या परिषदेत बॅ. जीना आपले लीगचे मंडळीसह सामील झाले. त्यांनी दोन्ही समाजात निर्माण झालेल्या

वैमनस्याचा निषेध करून यामागील कारणमीमांसा शोधून काढण्यासाठी महात्मा गांधी व अजमलखान यांची एक समिती स्थापन केली. या वेळी मुसलमान समाजाची 'तबलीघ' चळवळ व हिंदुमहासभेची शुद्धी चळवळ यांचेवरही चर्चा झाली व दोन्ही संघटना सुरू ठेवाव्या, परंतु कोणीही धाकदपटशा दाखवून आपले कार्य करू नये असे सांगण्यात आले. या परिषदेत दोन्ही समाजातील समंजस मंडळी एकत्रित आली व दंगलीची तीव्रता हळूहळू कमी होऊ लागली, तरी त्याने मुस्लिम लीग व कॉंग्रेसमधील एकोपा पुन्हा साधू शकला असे मात्र म्हणता येणार नाही.

या तात्पुरत्या साधण्यात आलेल्या एकोप्याला पुन्हा मतभेद निर्माण होण्याला सुरुवात ब्रिटिश सरकारने इंडिया ॲक्टचा विचार करण्यासाठी नेमलेल्या सायमन कमिशनचे नेमणुकीनंतर झाली. यामुळे मुस्लिम लीगमध्ये कॉंग्रेसशी सहकार्य करण्याचे प्रश्नावर बरेच मतभेद झाले. सायमन कमिशनचे विचारार्थ कॉंग्रेस व मुस्लिम लीगचे दिल्ली येथे झालेल्या संयुक्त सभेत कॉंग्रेसच्या मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुका घेण्याच्या प्रश्नांवर खालील योजना आखण्यात आल्या. (१) सिंध प्रांत स्वतंत्र करावा (मुंबई प्रांतापासून) (२) सरहद्दप्रांत व बलुचिस्तान यांचा एक स्वतंत्र प्रांत व्हावा. (३) पंजाब व बंगाल प्रांतिक कायदेमंडळात लोकसंख्येच्या प्रमाणात मुसलमानांना जागा मिळाव्यात. (४) मध्यवर्ती कायदेमंडळात एकतृतीयांश जागा मुसलमानांकडे रहाव्या. बॅ. महंमदअली जीना व कॉंग्रेसचे मौलाना महंमदअल्ली यांनी हा करारनामा तयार केला व तो दिल्ली करारनामा या नावाने ओळखला जातो. या करारानुसार स्वतंत्र मतदारसंघाची कल्पना काही काळ बाजूला ठेवण्याचे मुस्लिम लीगने कबूल केले व १९३७ पर्यंत हा करार पाळावा असेही ठरविण्यात आले. कॉंग्रेसने या कराराला हिंदु-मुसलमान ऐक्यासाठी डॉ. अन्सारी यांचे अध्यक्षतेखाली भरलेल्या अधिवेशनात मान्यता दिली, पण आपले संपूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय मात्र घोषित केले. याच वेळी

हिंदची नवी घटना तयार करण्यासाठी एक सर्वपक्षीय परिषद भरविण्याचीही योजना आखण्यात आली.

मुस्लिम लीगमध्ये मात्र घुसणाऱ्या दुहीचा स्फोट या सायमन कमिशनचे निमित्ताने झाला. डिसेंबर १९२७ मध्ये लीगचे वार्षिक अधिवेशन भरण्यापूर्वी सर्वपक्षीय परिषदेत भाग घेण्याचे प्रश्नावर मतभेद निर्माण होऊन मियान महंमद शफी यांचे नेतृत्वाखाली लीगमधून काही पुढारी बाहेर पडले व त्यांनी लाहोर येथे आपली स्वतंत्र परिषद घेतली. या शफी गटात पंजाब, सिंध, उत्तर प्रदेशमधील बरेच जमीनदार व व्यापारी होते. तर बॅ. जीना यांचे जुने मुस्लिम लीगमध्ये मुंबई, मद्रास व बंगालकडील मुसलमान उद्योगपति व व्यापारी होते. शफी गटाच्या या मुस्लिम लीगवाल्यांनी स्थापन केलेल्या मुस्लिम कॉन्फरन्स या संस्थेने ब्रिटनने नेमलेल्या सायमन कमिशनचे कार्याशी सहकार्य करण्याचा ठराव पास केला. तर बॅ. जीनांचे लीगने सायमन कमिशनवर बहिष्कार टाकण्याचा ठराव पास करून काँग्रेसशी सहकार्य करण्याचे ठरविले. काँग्रेसशी सहकार्य करण्याचे बॅ. जीनांचे धोरण त्यांच्या काही सहकाऱ्यांना यावेळी आवडले नाही, पण जीना कधीही काँग्रेसचे जहाल गटाशी सहमत झाले नाही. चळवळ करून स्वराज्य मिळविण्यास त्यांचा पूर्ण विरोध होता. संपूर्ण स्वराज्याचे काँग्रेसच्या मागणीला त्यांनी एकमुखी पाठिंबा दिला नाही, तरी पं. मोतिलाल नेहरू यांचे वसाहतीचे स्वराज्याचे कल्पनेला त्यांनी मान्यता दिली. मोतिलालजींनी तयार केलेल्या वसाहतीचे स्वराज्याचे घटनेत दिल्ली करारातील अल्पसंख्य मुस्लिमांचे संरक्षणासाठी त्यांना पार्लमेंटमध्ये एकतृतीयांश जागा व कायदेमंडळात लोकसंख्येनुरूप प्रतिनिधित्व देण्याची कल्पना मान्य केली होती. पण लखनौ येथे जून १९२८ मध्ये भरलेल्या सर्व पक्षीय परिषदेत हे प्रतिनिधित्व मान्य करण्यात आले नाही. डिसेंबरमध्ये झालेल्या या परिषदेत पुन्हा ही योजना फेटाळण्यात आली व काँग्रेसने बॅ. जीनांना ज्या योजनेमुळे जवळ आणले ती योजनाच ढासळून

पडली. यानंतर मात्र काँग्रेस व बॅ. जीनांच्या मुस्लिम लीगचा एकोपा कधीच घडून येऊ शकला नाही.

महंमदशफी यांचे नेतृत्वाखाली कार्य करणाऱ्या मुस्लिम कॉन्फरन्सने आपले सर्वपक्षीय अधिवेशन जानेवारी १९२९ साली भरविले. त्यावेळी नामदार आगाखान हे अधिवेशनाचे अध्यक्ष होते. यावेळी हिंदमधील मुस्लिमांचे संरक्षणासाठी एक चौदा कलमी मसुदा बॅ. जीना यांनी तयार केला व तोच पुढे १९३० चे गोलमेज परिषदेपुढे ठेवण्यात आला. या चौदा कलमी योजनेत (१) प्रांतांना स्वायत्तता लाभावी म्हणून त्यांचेकडे काही महत्त्वाचे अधिकार राहावे, परंतु सर्व सत्ता मध्यवर्ती संघटनेकडे संयुक्त जबाबदारीने सोपविण्यात यावी. (फेडरल) (२) मुसलमानासाठी विभक्त मतदारसंघ असावे व त्यांचेमध्ये फेरबदल करताना मुस्लिम नेत्यांची मते अजमावावी. (३) मध्यवर्ती कायदेमंडळात एकतृतीयांश जागा मुस्लिमांसाठी राखीव म्हणून ठेवाव्या व प्रांताचे अगर मध्यवर्ती मंत्रिमंडळातही मुस्लिमांना एकतृतीयांश जागा मिळाव्या. (४) सर्व मुसलमानांना प्रांतिक अगर मध्यवर्ती सरकारी यंत्रणेत योग्य त्या जागा मिळाव्या. (५) धर्मस्वातंत्र्य व निरनिराळ्या भाषासमृद्धीचे स्वातंत्र्य देशात रहावे. (६) वरील सर्व मागण्या लक्षात घेऊनच घटनेत करावयाचे फेरबदल केले जावे. वरील महत्त्वाचे मुद्द्यावर आधारलेली १४ कलमी योजना मुस्लिमांचे दोन्ही गटांना मान्य होऊन १९३० साली अलाहाबाद येथे भरलेले मुस्लिम लीगचे अधिवेशनापुढे मांडण्यात आली व दोन्ही गटांनी ती मान्य केली. या योजनेमुळे बॅ. जीना यांचे मुस्लिम लीगमधील वर्चस्व पुन्हा प्रस्थापित झाले. पण काँग्रेसमधील अबुलकलम आझाद व डॉ. अन्सारी यांना ती मान्य नसल्यामुळे १९३२ च्या काँग्रेसअधिवेशनापर्यंत त्यांचा विचारच झाला नाही. त्यामुळे काँग्रेसमधील मुसलमानमंडळी बरीच नाखूष झाली. १९३१ चे एप्रिल महिन्यात त्यांची एक परिषद लखनौ येथे होऊन प्रांतातील ३० टक्के लोकसंख्येच्या जागा अल्पसंख्यांकांसाठी राखीव ठेवाव्या. भाषा आणि धर्मस्वातंत्र्य अबाधित रहावे व सरहद्द प्रांत व सिंध स्वतंत्र प्रांत व्हावे

व तेथे अल्पसंख्यकांना योग्य प्रतिनिधित्व मिळावे वगैरे ठराव पास झाले. पण या ठरावांनी मुस्लिम लीगचे सांत्वन झाले नाही. जीनांच्या १४ कलमी मागण्यात आपण बदल करू शकत नाही, असेच मुस्लिम लीग पुढारी सांगू लागले.

यानंतरच्या पाच वर्षांतील घडामोडी कॉंग्रेस व मुस्लिम लीगच्या राजकीय परिस्थितीत अनेक स्थित्यंतरे घडवून आणणाऱ्या होत्या. १९३२ साली ब्रिटिश सरकारने जातीय मतदारसंघाची (कम्युनल् अॅवॉर्ड) घोषणा करून त्याचा १९३५ सालचे इंडिया अॅक्टात समावेश केला. त्यामुळेच प्रांतिक असेंब्लीतील १६७५ जागांपैकी ८०८ जागा सर्वसाधारण मतदारसंघाला व ४८२ जागा मुस्लिम मतदारसंघाला मिळाल्या. या योजनेमागे मुस्लिम व हिंदु जनतेत संपूर्ण फूट पाडण्याची योजना दडलेली होती. मुस्लिम लीगने जातीय मतदारसंघाला भावी घटनेचा एक मूलगामी पाया म्हणून मान्यता दिली. याच वेळी हिंदमध्ये काही जादा गट उदय पावू लागले होते. कम्युनिस्ट पक्ष व किसान सभेचा उदय झाला, व कॉंग्रेसच्या एकमुखी सत्तेसमवेत साम्राज्यवादी सत्तेशी झगडण्याला एक एक जहाल गट निर्माण होऊ लागला. यावेळी परदेशप्रवासाहून परत आलेल्या बॅ. जीनांना कामगार व शेतकरी वर्ग यात निर्माण झालेल्या जागृतीचा फायदा मुस्लिम लीगनेही घ्यावा असे वाटू लागले व त्यांनी काही कार्यक्रम आखले व लीगची चळवळ सर्वसाधारण मुसलमानापर्यंत नेण्याचा प्रयत्न केला. सुरवातीला जातीय मतदार संघाला मान्यता देणारी मुस्लिम लीग १९३६ चे मुंबईचे अधिवेशनात थोडी बदललेली दिसली.

या अधिवेशनात '१९३५ चा गव्हर्मेंट ऑफ् इंडिया अॅक्ट' आपणाला अमान्य असल्याचे बॅ. जीनांनी सांगितले. परंतु त्या कायद्या अन्वये होणाऱ्या निवडणुकांत भाग घेण्याची तयारी मात्र त्यांनी दर्शविली. १२ जुलै १९३६ रोजी लीगने आपला जाहीरनामा काढला. यात कॉंग्रेसइतकेच आम्ही पुढारलेले आहोत व मुस्लिम समाजाला वसाहतीचे स्वराज्य व अल्पसंख्याकांचे धर्मस्वातंत्र्य हवे आहे असे दाखविण्याचे प्रयत्न झाले. उद्योगधंद्याची वाढ, खेड्यातील

जनतेच्या परिस्थितीत सुधारणा वगैरे कितीतरी अभिवचने या जाहीरनाम्यात देण्यात आली होती. १९३६ साली झालेल्या कायदेमंडळाचे निवडणुकीत मुस्लिम लीगला बॅ. जीनाचे अपेक्षेप्रमाणे सर्व मुस्लिमांचा पाठिंबा मिळू शकला नाही. बॅ. जीनांना जमीनदार व खान व नबाबांचे पुढे पाठिंब्यासाठी नमावे लागले. पंजाबमधील अहरार संघटना व काँग्रेसमधील मवाळगटांना पाठिंबा देणारी युनियनिस्ट संघटना लीगशी हातमिळवणी करू शकली नाही. यामुळे पंजाबमध्ये १६७ प्रांतिक असेंब्लीचे जागांपैकी १०१ जागा युनियनिस्ट पक्षाला मिळाल्या. या पक्षांत शिकंदर हयातखान, फाझलहुसेन यांचेसारखे गाजलेले पुढारी होते व त्यांचेपुढे लीगचे काही चालले नाही. मुस्लिम बहुसंख्याकांचा दुसरा प्रांत म्हणजे सरहद्द प्रांत होय. पण हा प्रांत काँग्रेसचे सहकारी खानबहाद्दूर अब्दुलगफार खान यांनी आपल्या तांबडे डगलेवाल्यांचे चळवळीने येवढा व्यापून टाकला की हे खुदाई खिदमतगार सर्व सत्ता ताब्यात ठेवून होते तर बलुचिस्तानात खनिन-ईवतन या संघटनेने लीगला शह दिला. सिंधमध्ये तर यावेळी लीगची शाखाही नव्हती व तेथेही पंजाबच्या धर्तीवर काँग्रेसशी सहकार्य करणारा युनियनिस्ट पक्ष स्थापन झाला. या ठिकाणी ३९ पैकी २२ जागा युनियनिस्ट पक्षाने मिळविल्या. इतरत्र हिंदुस्तानात लीगची धुळधाण या निवडणुकात अशीच उडाली. फक्त मुंबई प्रांतात मस्लिमांच्या २९ पैकी २० जागा बॅ. जीनांचे लीग पक्षाला मिळाल्या.

१९३७ चे निवडणुकीत मुसलमान मतदारसंघाला मिळालेल्या प्रांतिक असेंब्लीतील ४८२ जागांपैकी अवघ्या १०८ जागा मुस्लिम लीगला (एक तृतीयांशापेक्षा कमी) मिळाल्या. ७३१९४५ मुसलमान मतदारापैकी ३२१७७२ मतदारानी लीग उमेदवारांना मते दिली. यावरून लीग व काँग्रेसला पाठिंबा देणारी मुस्लिम जमात यांचे प्रमाण कसे होते याची कल्पना येते. बॅ. जीना आपली मुस्लिम लीग वरच्या थरातील प्रचारावर आधारून यावेळी चालवीत होते. ही गोष्ट यावेळी स्पष्ट झाली. ही त्याची निर्बलता सर्वसाधारण समाजापासून आपण वेगळे पडल्यामुळे आली हे त्यांनी ओळखले.

बॅ. जीनांचा झालेला हा पराभव ब्रिटिशांचे भेदनीतीचे धोरणाला तेवढासा फायदेशीर नव्हता यासाठी त्यांनी पुन्हा मुस्लिम लीगशी निरनिराळ्या प्रकारे संधान बांधून त्यांना पाठिंबा देण्यास सुरवात केली. यासाठी त्यांनी स्वतंत्र मुस्लिम राष्ट्रांची कल्पना प्रथम इंग्लंड-मध्ये पुढे आणली. केंब्रिज विश्वविद्यालयात अभ्यास करणारे चौधरी रहमतअल्ली या मुसलमान गृहस्थांनी हिंदी राजकीय परिस्थितीविषयी लिहिलेल्या एका प्रबंधात हिंदुस्थानात स्वतंत्र मुस्लिम राष्ट्राची कल्पना पुढे आणली. ब्रिटिश विद्यापीठांत व ब्रिटिश प्राध्यापकांचे नेतृत्वाखाली शिक्षण घेताना ती तयार झाली होती–ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे.

या कल्पनेला ब्रिटनमध्ये भरपूर प्रसिद्धी मिळाली व त्यामागे ब्रिटिश पैसा होता असे म्हणतात. गोलमेजपरिषदेला गेलेल्या बॅ. जीनां-सारख्या प्रतिनिधींना ती दाखविण्यात आली होती, पण त्यावेळी त्यानी या योजनेकडे फारसे लक्ष दिले नाही. एवढंच काय पण काहींनी ती अयोग्य ठरविली. पण कॉन्झर्वेटिव्ह पक्षांच्या पार्लमेंटरी कमिटीने मात्र या देशाची फाळणी करून दोन राष्ट्रे निर्माण करण्याच्या कल्पनेला एकमुखी पाठिंबा दिला. मुस्लिम प्रांताना स्वायत्तता असावी एवढ्यापर्यंत मुस्लिम लीग जावयास तयार होती, पण १९३७ मध्ये तरी ही कल्पना त्यांचे डोक्यात नव्हती. पण पुढील तीन वर्षात लीग पुढाऱ्यांचे डोक्यात ती कल्पना भरवून देण्याचे प्रयत्न ब्रिटिश राज्य-कर्त्यानी अनेकवेळा केले व त्याचा योग्य तो परिणाम होऊ लागला. सिंधमधील लीगचे संघटनेने हिंदु व मुसलमान प्रांताचे विभक्तीकरण करावे हा ठराव केला व तोच ठराव पाकिस्तानला जवळ आणणारा ठरला.

५ : पाकिस्तानचा निर्णय कसा झाला ?

ब्रिटिशांनी यानंतर देशाची फाळणी करून पाकिस्तान स्वतंत्र राष्ट्र करण्याची कल्पना एवढी वाढीस लाविली की हिंदी पुढाऱ्यांचे कोणत्याही योजनात त्यांना दुहीचा वास येऊ लागला. काँग्रेसने मंत्रिमंडळे बनविल्यानंतर (१९३७ साली) प्रत्यक मंडळाने प्रांतातील मुसलमानावर अन्याय केला असा ओरडा लीगसंघटनात सुरू झाला, त्यांचे हितसंबंधांचे संरक्षण होत नाही असे ते म्हणू लागले. ‘ वंदे मातरम् ’ या राष्ट्रगीतालाही हिंदुत्वाचा वास येतो अशी शंका लीगची पत्रे घेऊ लागली. यावेळी मुसलमान कामगार व शेतकऱ्यांचे हितसंबंधांचा काँग्रेस मंत्रिमंडळाने केलेल्या कायद्यात विचार केला जात नाही अशीही टीका सुरू झाली. आर्थिक पाया बलवत्तर करण्यासाठी योजिलेले काही उपायात लीगला जातीयतेचा वास येऊ लागला. यावेळी लीगच्या तक्रारीचा विचार करण्यासाठी एका फेडरल कोर्ट जज्जांचे नेतृत्वाखाली समिती नेमावी अशी सूचना डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी केली. पण तीहि लीगने अमान्य केली व काँग्रेस विरोधाची चळवळ बॅ. जीनांनी आपले नेतृत्वाखाली जोरात सुरू केली. जीनांचे लीगला काँग्रेस पुढाऱ्यांचे नेतृत्व स्वीकारावयाचे नव्हते. काँग्रेस

मंत्रिमंडळाचे बरोबर एक विरोधी पक्ष म्हणून काम करावयाचे होते, ही गोष्ट यावेळी स्पष्ट झाली.

यातच १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाले. त्यामुळे लीगचा प्रचार प्रभावी होण्याला भरपूर संधी मिळाली. हिंदच्या स्वातंत्र्याचे मागणीत मुस्लिम लीग सहभागी होऊ शकत नाही, कारण हे देशाचे स्वातंत्र्य म्हणजे बहुसंख्य जमातीचे राज्य होईल असे मत प्रदर्शित करणारा ठराव मुस्लिम लीगचे १७ सप्टेंबर १९३९ रोजी भरलेल्या अधिवेशनात पास झाला. या वेळी १९३५ चा ब्रिटिश वसाहतीचे स्वराज्याची योजनाही मुस्लिम लीगचे संमतीशिवाय आम्ही अंमलात आणणार नाही असे आश्वासन ब्रिटिश राज्यकर्त्यांनी मुस्लिम लीगला दिले. महायुद्धात काँग्रेसला सहकार्य देणे शक्य नसल्यामुळे काँग्रेस मंत्रिमंडळानी २२ डिसेंबर १९३९ रोजी राजिनामे दिले व त्याने लीगचे चळवळीला अधिकच जोर चढला. देशाची फाळणी करण्याच्या विविध योजना लीगच्या प्रांताप्रांतातील सभातून उघडपणे चर्चिल्या जाऊ लागल्या. सभासभातून हिंदुस्थानात स्वतंत्र मुस्लिमांचे राज्य प्रस्थापित करण्याची गाणी म्हटली जाऊ लागली. महंमद इकबाल यांच्यासारख्या कवि व वक्त्याला पंजाबसारख्या प्रांतात महत्त्व प्राप्त झाले व या साऱ्या चळवळीचा परिपाक लाहोर येथे २६ मार्च १९४० रोजी झालेल्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनावर झाला.

या अधिवेशनात हिंदुस्थानची धार्मिक आधारावर लोकसंख्येची विभागणी करून फाळणीचे तत्त्व अमलात आणावे व मुस्लिमांचे स्वतंत्र राष्ट्र प्रस्थापित करावे ही मागणी उघडपणे करण्यात आली. अधिवेशनाचे अध्यक्षस्थान बॅ. महंमदअल्ली जीना यांनी स्वीकारले होते. या वेळी भाषण करताना बॅ. जीना यांनी आपल्या मागणीचे समर्थन नेहमीचे वकिली भाषेत केले. ते म्हणाले, ' हिंदुस्थानातील मुसलमान म्हणजे एक धर्मभोळी जमात आहे असे कोणीही समजू नये. ही मागणी करताना देशाचे उत्तर, पश्चिम व पूर्वेकडील प्रदेशातील आमची जमात एकत्रित यावी, तिला स्वयंनिर्णयाचा हक्क मिळावा हाच एक हेतु यामागे आहे.' या अधिवेशनातील फाळणीचे ठरावाचा अर्थ असा स्पष्ट

होता की, ' पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत बलुचिस्तान, सिंध, बंगालचा पूर्व भाग हे ब्रिटिश हिंदुस्थानातील बहुसंख्य मुसलमान जमातीचे प्रांत स्वतंत्र करून व त्यांचा एक स्वतंत्र विभाग व्हावा. हे मुस्लिम विभाग एक 'कॉन्स्टिटयुअन्ट युनिट' रहावा एवढीच मागणी या मूळ ठरावात आहे. म्हणजे ब्रिटिशांनी कोणत्याही स्वरूपाचे वसाहतीचे स्वराज्य देऊ केले तरी त्यात आमचा मुस्लिमांचा सवता सुभा हवा हीच कल्पना या वेळी लीगचे ठरावाचे मुळाशी होती. या स्वतंत्र निर्देशी-लेल्या पाकिस्तानचे संबंध ब्रिटिश सत्तेशी कसे राहणार याचीही कल्पना या ठरावानंतर बॅ. जीनांनी वृत्तपत्रांना दिलेल्या मुलाखतीत स्पष्ट केलेली नव्हती.

यानंतरच्या पाच वर्षांच्या काळात पाकिस्तानच्या स्वतंत्र अस्ति-त्वाबद्दल महात्मा गांधींचे बरोबर बॅ. जीनांचे झालेल्या पत्रव्यवहारात पाकिस्तान एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून राहील ही कल्पना त्यांनी स्पष्ट-पणे मांडली. पाकिस्तान हे लोकशाहीप्रधान राष्ट्र राहील आणि त्यात धर्म व वर्णभेद मानला जाणार नाही अशीही अभिवचने आहेत. १९४३ साली पाकिस्तानचेसाठी मुस्लिम लीगने प्रत्यक्ष चळवळीची घोषणा केली. यावेळी बॅ. जीनांचे सहकारी म्हणून लियाकत अल्लीखान हे प्रथम पुढे आले. डॉनसारखे लीगचे मुखपत्र या पाकिस्तानच्या कल्पनेचा उदोउदो करू लागले. अलिगड विद्यापीठातूनही दोन देशाचे पुरस्का-राला पाठिंबा मिळू लागला. यासाठी पाकिस्तानी वाङमय म्हणून निरनिराळ्या प्रचार करणाऱ्या संस्था निघाल्या, उलेमाचा मशिदी-तून प्रचार सुरू झाला व ब्रिटनविरोधाऐवजी संयुक्त हिंदुस्तान म्हणजे शत्रु प्रदेश असाही प्रचार ' जिहाद ' या धर्मयुद्धाची घोषणा देत होऊ लागला. मुसलमानांच्या स्वतंत्र व्यापारी संस्था निघू लागल्या. या सर्व चळवळी बहुसंख्य मुस्लिम जमातीचे प्रांतातून सुरू होत्या, त्यांना अखिल भारतीय स्वरूप कधीच आले नाही. पण या प्रचारामुळे मुस्लिम लीगची चळवळ अगदी खालचे थरात जाऊन पोहचली. उलेमा व काझीकडून मशिदीमशिदीतून स्वतंत्र राष्ट्रांचे पाठ पढविले जाऊ लागले व त्याला विरोध करण्यास बहुसंख्य जमातीची काँग्रेस अयशस्वी

झाली. जमीनदारवर्गानीहि या चळवळीचा फायदा पुरेपूर घेतला व पंजाबात काँग्रेसला मदत करणारे युनियनिस्ट पक्षासारखे पक्षही हळहळू रोडावू लागले.

बंगालमध्ये तर १९४३ चे दुष्काळात लीगने दुष्काळ निवारणाची चळवळ हाती घेतली. त्यांनी काळ्याबाजारवाल्यावर हल्ले चढविताना नेमके हिंदु साठेबाज उजेडात आणले. हिंदु सावकाराविरुद्ध मुसलमानांना चिथावून दिले. आणि गरिबांचा प्रश्न बंगालमध्ये तरी लीगच सोडवू शकेल असे मत बनविण्याचा प्रयत्न केला. यावेळी लीगच्या अधिवेशानातून ब्रिटिश अधिकाऱ्यांवरही कडाडून टीका केली गेली.

प्रथमपासूनच पाकिस्तानचे चळवळीचे आधारस्तंभ ब्रिटिश राज्यकर्ते होते ही गोष्ट जरी सत्य असली, तरी उघडपणे कोणत्याही ब्रिटिश राजकर्त्यांनी पाकिस्तानचा यावेळेपर्यंत पुरस्कार केला नव्हता. एवढेच काय पण १९४२–४३ साली ब्रिटिश राज्यकर्त्यांनी केलेल्या भाषणात हिंदु–मुसलमान एकोप्याचा अनेक वेळा पुरस्कार केला. पण काँग्रेस व लीग एकत्रित येऊन त्यांनी कोणतीही योजना आखावयाचे ठरविले, तर त्याला मात्र ब्रिटिशांचा आतून विरोध होत असे.

१९ सप्टेंबर १९४५ रोजी ब्रिटिश सरकारची सूत्रे मजूर पक्षाचे हाती आली. हिंदुस्थानचे स्वातंत्र्यचळवळीला विरोध करणारा कॉन्झर्वेटिव्ह पक्ष मागे पडला. मजूर–मंत्रिमंडळ अधिकारावर आल्याबरोबर त्यांनी प्रथम हिंदमधील प्रांतिक व मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणुका १९४५–४६ चे सुरुवातीला होतील असे जाहीर केले, व हेच निवडून आलेले सभासद हिंदची नवी घटना तयार करतील. या निवडणुकात आणखी एक गोष्ट स्पष्ट झाली की देशातील डावे गट (कम्युनिस्ट) व किसानसभा हळूहळू डोके वर काढू लागले. मुस्लिम लीगने प्रांतिक असेंब्लीत बऱ्याच जागा मिळविल्या. सर्व प्रांतातून मुस्लिम जमातीसाठी ६०० राखीव जागा होत्या. त्यातील ४२० जागा लीगने मिळविल्या. परंतु बंगाल प्रांताखेरीज इतर कोठेही लीगला प्रांतिक असेंब्लीत बहुमत प्रस्थापित करता

आले नाही. या निवडणुकीचा अर्थ एवढाच होता की, देशाचे फाळणी-साठी झगडणाऱ्या मुस्लिम लीगचे हाती मुसलमानांची सत्ता गेली व ब्रिटिशांचे अपेक्षेप्रमाणे राष्ट्रीय वृत्तीची विभागणी होऊ शकली. १९४६ चे पेथिक लॉरेन्स योजनेनुसार ब्रिटिशांनी वसाहतीचे स्वराज्य हिंदला देण्याचे मान्य केले, पण ही योजना घटना–समितीने नवी घटना तयार केल्यानंतर अंमलात आणावी असे सांगण्यात आले. या योजनेत देशाचे तीन भाग पाडले. एका भागात हिंदु बहुसंख्याकांची वस्ती होती. दुसरा पूर्व विभागात बंगाल व आसामचा समावेश केला तर तिसऱ्या पश्चिम भागात पंजाब, सरहद्द प्रांत व सिंध प्रांत घातला. या विभागांना स्वायत्तता देण्याची योजना या वसाहतीचे स्वराज्यात होती. फक्त परदेशसंबंध व वाहतूक एवढी खाती मध्यवर्ती सत्तेकडे राहणार होती.

यावेळी ४० टक्के जागा हिंदूंना ४० टक्के जागा मुस्लिमांना व २० टक्के इतर अल्पसंख्याकांना मिळणार होत्या. ही योजना म्हणजेच देशाचे फाळणीची पूर्वतयारी होती. यावेळी कॉंग्रेसपक्षाने आपली संपूर्ण स्वराज्याची मागणी पुन्हा घोषित केली व या मागणीची पूर्वतयारी म्हणून या पेथिक लॉरेन्स योजनेचा विचार करावयाचे ठरविले. कॉंग्रेसचे हे धोरण पाहून मुस्लिम लीगने लॉरेन्स योजनेला मान्यता दिली, पण पाकिस्तान हे स्वतंत्र राष्ट्र बनविण्याची कल्पना पुन्हा घोषित केली. जून १९४६ साली घटना–समितीचे निवडणुकांत ३८९ जागांपैकी १९२ जागा कॉंग्रेसला व ७० जागा मुस्लिम लीगला मिळाल्या. पण यावेळी ब्रिटिश सत्तेने पुन्हा आपल्या अधि-काराची नखे दाखवावयास सुरवात केली. घटनासमितीचे अधिकार अल्पसंख्याकांचे संरक्षणासाठी मर्यादित करण्याची भाषा ते बोलू लागले त्यावेळी त्यांना पंडित नेहरू यांनी दिलेले सडेतोड उत्तर सर्वत्र गाजले. ते म्हणाले, 'आमच्यावर कोणतीही बंधने घालून जर आमचेशी राज्यकर्ते तह करणार असतील तर त्या तहाचा मसुदा आम्ही फाडून टाकू. अल्पसंख्याकांचा प्रश्न हा आमचे देशाचा प्रश्न आहे. तो आम्ही निश्चित सोडवू शकू. त्यासाठी बाहेरच्या सत्तेची

ढवळाढवळ आम्हाला नको! घटनासमितीचे अधिकार मर्यादित करण्याचे धोरण आम्हाला बिलकुल मान्य नाही' या घोषणेचा फायदा ब्रिटिशांनी पूर्णपणे घेऊन काँग्रेसला देऊ केलेली प्रांतिक स्वायत्तता नको, असा ओरडा करावयास सुरुवात केली.

या वेळी मुस्लिम लीगने केलेल्या टीकेत काँग्रेस हिंदु हितसंबंधाचे संरक्षणासाठी पक्षपाती धोरण स्विकारीत आहे असे म्हटले होते, पण या वेळी काँग्रेस व मुस्लिम लीग यांचेमध्ये निर्माण झालेले मतभेद कधीही मिटू शकले नाहीत. व लीगने आपली पाकिस्तानची मागणी जोराने मांडावयास सुरुवात केली. हिंदु-मुसलमानांचे दंगलींना ठिकठिकाणी सुरुवात झाली. पण काही झाले तरी ब्रिटिश सत्ता यापुढे राहण्यास दोन्ही पक्षांचा सारखाच विरोध असल्यामुळे भेद-नीतीच्या जोरावर आपले आसन पुन्हा टिकविण्याचे ब्रिटिश प्रयत्न मात्र या वेळी यशस्वी होऊ शकले नाहीत. याचा परिणाम असा झाला की हिंदी मंत्रिमंडळाची स्थापना करून त्यांचे हाती तात्पुरती सत्ता देणे ब्रिटिशांना भाग पडले. १९४६ चे ऑगस्टमधे या तात्पुरत्या हिंदच्या मध्यवर्ती सरकारचे नेतृत्व पं. जवाहरलाल नेहरू यांचेकडे आले. मुस्लिम लीगने मात्र या अधिकार ग्रहणावर सुरुवातीला बहिष्कार घातला व व्हाईसरॉय लॉर्ड वेव्हेल यांनी प्रयत्न करून बॅ. जीनांचे मन वळविले व १५ ऑक्टोबर १९४६ रोजी बॅ. जीना यांनी या अधिकार-स्विकारात भाग घेण्यास मान्यता दिली. लियाकत अल्लीखान, इस्माईल इब्राहीम चुंद्रीगर, सरदार अब्दुर रब्निस्तार, गझनफर अल्लीखान व जोगेंद्रनाथ मंडळ (बंगाल) या मध्यवर्ती मंत्रिमंडळात लीगचे प्रतिनिधी म्हणून पाठविले. जोगेंद्रनाथ मंडळ या बंगाल प्रांतातील हिंदु कार्यकर्त्यांची निवड या वेळी त्यांनी लीगवर जातीयतेचा आरोप येऊ नये म्हणून मुद्दाम केली. या निवडीत बंगालचे ख्वाजा नझिमुद्दीन व नबाब इस्माईलखान यांना वगळण्यात आल्यामुळे बंगाली लीगचे पुढाऱ्यात थोडा असंतोष पसरला. अधिकार ग्रहणात जरी बॅ. जीनांनी सहकार्य केले, तरी लीगचा घटनासमितीवरील बहिष्कार कायम

ठेवल्यामुळे पेथिक लॉरेन्स यांची घटनासमितीची योजना प्रत्यक्षात येण्याची चिन्हे दिसेनात.

या परिस्थितीत ब्रिटनने आपली सत्ता संपुष्टात येणार हे पूर्णपणे ओळखून २० फेब्रुवारी १९४७ रोजी हिंदला अधिकारदान करण्याची तयारी दर्शविली. पंतप्रधान ॲटली यांनी हाऊस ऑफ् कॉमन्समध्ये घोषणा करून जून १९४८ नंतर सत्तांतरास सुरुवात होईल असे सांगितले व त्यासाठी लॉर्ड मौन्टबॅटन यांची व्हाईसरॉय म्हणून नेमणूक केली. ही घोषणा काँग्रेस व लीग या दोन्ही मोठ्या पक्षांनी मान्य केली.

परंतु यानंतर पाकिस्तानचे चळवळीने निराळेच वळण घेतले. पंजाबमध्ये काँग्रेसला पाठिंबा देणारे युनियनिस्ट पक्षाचे मंत्रिमंडळ अधिकारावर होते. त्याना पंजाबचा काही भाग हिंदमध्ये रहावा असे वाटत होते तेथे मुस्लिम जनतेला लीगने आपले प्रचाराने मुद्दाम उठवून दिले व पंजाबातील शीख व हिंदु जमीनदार हे तुमचे खरे शत्रू आहेत, ते तुम्हाला लुबाडू इच्छितात असा प्रचार लीगने सुरू केला. सिंधमध्ये पाकिस्तानचे प्रचाराला भरपूर अवसर मिळाला. बंगालमध्ये तर नुसता बंगालचा पूर्व भाग नव्हे, तर सर्व बंगाल पाकिस्तानमध्ये सामील व्हावा असा प्रचार सुरू झाला. सरहद्द प्रांतात मात्र खान बहाद्दूर अब्दुल गफारखान यांच्या तांबडे डगलेवाल्यांचे सरकार अधिकारावर असल्यामुळे बॅ. जीनांचे पाकिस्तान चळवळीला तेथे फारसा अवसर मिळाला नाही. कारण खान अब्दुल गफारखान यांचा काँग्रेसच्या कर्तृत्वावर पूर्ण विश्वास होता. देशाची दोन छकले व्हावी असे त्याना वाटत नव्हते. १९३७ पासून लीगची एक शाखा सरहद्द प्रांतात काम करीत होती. तिने पाकिस्तानचे चळवळीला हातभार लावला, तर या संकटातून बाहेर पडण्यासाठी सरहद्द प्रांतातील मुल्ला, मौलवींनी स्वतंत्र पख्तुनिस्तानची नवी योजना पुढे मांडली. पण या सर्व घडामोडींवर लीगच्या अनुयायांनी कुरघोडी केल्यामुळे सरहद्द प्रांतातील मुस्लिमांत दुही बोकाळली. याच वेळी ब्रिटिशांनीं भडकत चाललेल्या या हिंदु-मुसलमानांचे भांडणावर तेल ओतून त्याचा अधिक

भडका उडविला. लीगच्या काही स्वयंसेवकांनी तर हिंदूंवर बेधडक हल्ले केले. सरहद्द प्रांतात तर लीगचे स्वयंसेवक व लाल डगलेवाले यांचे वैर एवढे वाढले की, त्यांचेमागे प्रांताचे गव्हर्नराचा हात असावा असा उघड आरोप खान अब्दुल गफारखान यांनी केला. अशा ब्रिटिश कलागतीमुळे देशातील हिंदु-मुसलमान ऐक्य टिकणे शक्य नाही, असे दिसून येताच काँग्रेसने पाकिस्तानला मान्यता दिली. हा निर्णय फक्त काँग्रेस वर्किंग कमिटीचे सभासदांनी घेतला. ब्रिटिशांना जे हवे होते ते साध्य झाल्यामुळे ३ जून १९४७ रोजी इंडिया इंडिपेन्डन्स अॅक्ट, नावाचा कायदा जारी करून देशाची फाळणी करण्याची तयारी ब्रिटनने दर्शविली. वसाहतीचे स्वराज्याची कल्पना मागे पडून या स्वातंत्र्याचे कायद्याने दोन्ही देशांना स्वातंत्र्य दिले व पाकिस्तान स्वतंत्र राष्ट्र बनविले. काँग्रेस व मुस्लिम लीगनी या घोषणेला काही आक्षेपाचा विचार करण्याचे आश्वासन देऊन मान्यता दिली. पण एवढे झाले तरी पंजाब व बंगाल ह्या दोन्ही प्रांतांचे सामिलीकरण पाकिस्तानमध्ये व्हावे ही मागणी लीगने सोडली नाही. देशाची फाळणी करून पाकिस्तानचे धार्मिक पायावर राष्ट्र–उभारणीला ब्रिटिशानी मान्यता दिली पण सर्व बंगाल व सर्व पंजाब पाकिस्तानला जोडण्यास काँग्रेसने विरोध केल्यामुळे हा प्रश्न पंजाब व बंगाल या विधिमंडळाचे संमतीने सोडवावा व ऑगस्टचे मध्यापर्यंत ही या दोन प्रांतातील दोन्ही देशाची सीमारेषा ठरवावी असे ठरले व हा प्रश्न निकालात काढण्यात आला. पण सरहद्द प्रांताचा प्रश्न मात्र सहजासहजी मिटण्याची चिन्हे दिसेनात. आजपर्यंत काँग्रेसवर विश्वास ठेवणारे सरहद्द प्रांताचे पुढारी, काँग्रेसने इंडिया इंडिपेन्डन्स अॅक्टला मान्यता देऊन सरहद्द प्रांताचा विश्वासघात केला असे उघडपणे बोलू लागले. त्यानी बन्नु येथे झालेल्या सरहद्द प्रांतियांचे सभेत स्वतंत्र पख्तुनिस्तानची मागणी केली. पण ही मागणी मान्य करावयास ब्रिटिश सरकार तयार नव्हते.

या वेळी अफगाण सरकारही सरहद्द प्रांताची मागणी मान्य करावी असा आग्रह ब्रिटिशांना करू लागले, पण त्याचा काही एक

उपयोग झाला नाही. सरहद्द प्रांतात सार्वमत घेऊन हा प्रश्न निकालात काढावयाचा निर्णय ब्रिटिशांनी घेतला. हे सार्वमत म्हणजे एक फार्स होता. १९३५ चे घटने अन्वये सरहद्द प्रांतातील वयात आलेले मतदार अवघे ५,७३,००० होते. हे मतदार म्हणजे सरहद्द प्रांताच्या लोकसंख्येच्या फार तर एक तृतीयांश भरले असते. ता. ६ जुलैपासून १६ जुलै १९४७ पर्यंतच्या काळात घेतलेल्या मतदानात अवघे २ लक्ष ९३ हजार मतदार या मतदानासाठी आले व त्यापैकी २ लक्ष ८९ हजारांनी सरहद्द प्रांत पाकिस्तानात सामील करावा या गोष्टीला मान्यता दिली. यामुळे ब्रिटिश राज्यकर्ते व लीगचा डाव सिद्धीस गेला.

या मतदानात काय होणार याची कल्पना खानबहादूर अब्दुलगफारखान यांना पूर्णपणे होती. त्यांनी यापूर्वीच बॅ. जीनांशी बोलणी सुरू करून सरहद्द प्रांताला पूर्वीप्रमाणे पूर्णपणे प्रांतिक स्वायत्तता तरी द्यावी अशी मागणी केली. पण तीही मागणी यावेळी बॅ. जीनांनी मान्य केली नाही. पख्तुन जनतेतही यानंतर मतभेद निर्माण होऊन गफारखान यांचे बंधु व सरहद्द प्रांताचे मुख्यमंत्री डॉ. खानसाहेब यांचे नेतृत्वाखाली एक नवा गट तयार होऊन त्यांनी लीगशी सहकार्य करावयाचे कबूल केले व गफारखानांची स्वतंत्र पख्तुनिस्तानची कल्पना मागे पडली. परंतु गफारखान आपले काही अनुयायांसह पख्तुनिस्तानला अखेरपर्यंत चिकटून राहिले. त्यांना पाकिस्तानचे निर्मितीपासून १८ वर्षे तुरुंगात काढावी लागली व शेवटी औषधोपचारासाठी इंग्लंडला गेले असताना परत येताना अफगाणिस्तानचे आश्रयास आले आणि तेथेच १९६६ अखेरपर्यंत ते होते.


आसाममध्ये घेतलेल्या मतदानात सिल्हेट प्रांत पाकिस्तानला मिळाला तर बलुचिस्तान पाकिस्तानला मिळण्यात कोणतीच अडचण पडली नाही. बंगाल व पंजाबची विभागणी झाली आणि अशा तऱ्हेने बॅ. जीनांना हवे असलेले पाकिस्तान १५ ऑगस्ट १९४७ रोजी त्यांचे ताब्यात देण्याचे ठरविण्यात आले.

● ● ●

६ : हिंदवर झालेला अन्याय

ब्रिटिशांनी हिंदवरील सत्ता सोडताना आपले लागेबांधे कायम राहावे म्हणून केलेली देशाची फाळणी व त्यामुळे निर्माण झालेल्या पाकिस्तानचे चित्र निःपक्षपातीपणे काढावयाचे म्हटले, तर कोणाचेही हित साधण्यापेक्षा प्रथम आपले स्वार्थाची काळजी ब्रिटिश राज्यनेत्यांनी प्रथम घेतली असे म्हणावे लागेल. या वेळी विभागणीत फक्त धार्मिक भावनांचा विचार केला गेला ही गोष्ट स्पष्ट आहे. पूर्व व पश्चिम पाकिस्तानमध्ये १५०० किलोमीटर्सचे अंतर आहे. या दोन्ही प्रदेशांना जोडणारा एक पट्टा आम्हाला मिळावा अशी मागणी बॅ. जीनांनी एकदा करून पाहिली, पण ती मान्य होणे शक्य नसल्याने ती कल्पनाच त्यांना सोडावी लागली.तथापि त्यांच्या इतरसर्व मागण्या मान्य झाल्या. इस्लामियांचे पाकिस्तान म्हणून जाहीर केलेल्या पाकिस्तानात फाळणीचे वेळी १४ टक्के लोकसंख्या हिंदु होती व पूर्व पाकिस्तानात तर जवळ जवळ २३ टक्के म्हणजे जवळजवळ एक चतुर्थांश हिंदु होते. उलट हिंदुस्थानात ३ कोटी मुसलमान मागे राहिले व त्यांची संख्या १९६६ पर्यंत ५ कोटीचे घरात गेली. म्हणजे या फाळणीमुळे हिंदुस्थानातील ७० टक्केच मुसलमान आपले इस्लामी राष्ट्रात फाळणीचे वेळी जाऊ शकले. सरहद्द प्रांत (टोळीवाल्यांचा प्रदेश धरून) सिंध,

पाकिस्तान–भारत पूर्व सीमा



Give Date

ब्रिटिश बलुचिस्तान, पंजाबचा पश्चिम भाग, भावलपूर, खैरपूर, कलात, खारान, मकरान, लासवेला, चित्रळदार, स्वात, आम्ब, फुलारा ही ११ संस्थाने, बंगालमधील, चितगाँग, डाक्का, बोग्रा, राजशाही, पाबना, रंगपूर, राजशाही विभाग, दिनाजपूरचा काही भाग, नाडिया जेसोर, जलपैगोरी, मालडा, खुलना व आसामचा सिल्हेट जिल्हा पाकिस्तानला मिळाला तर पंजाबमधील, रावळपिंडी, मुलतान, सियालकोट, गुजराथवाला, शेखपूर, नलाहारे व गुरदासपूर जिल्ह्याचा काही भाग पाकिस्तानात सामील झाले. या सर्व ९ लक्ष ४७ हजार ७०० चौरस मैलाचे प्रदेशात फाळणीचेवेळी ७ कोटी ५८ लक्ष ४२ हजार लोकसंख्या होती. यातील ५५ टक्के लोकसंख्या पूर्व पाकिस्तानातील १४१२०० मैलाचे प्रदेशात सामावलेली होती. पूर्व पाकिस्तानचा समावेश जरी पाकिस्तानात ताबडतोब करण्यात आला तरी त्याची घडणच अशी होती की त्यातील ९८ टक्के प्रजाजन बंगालच्या भूमीत लहानाचे मोठे झालेले होते व भाषा, संस्कृति यांनी ते बंगाली हिंदूंशी फारच निगडित होते.

प्रांतानुसार लोकसंख्येविषयी बोलावयाचे तर पूर्व पाकिस्तानचे सरहद्दीवरील खेड्यातील आसामी व ब्रह्मी लोकांची वस्ती विशेष आहे, तर पश्चिम पाकिस्तानातील २० टक्के लोकसंख्या पख्तुन, सिंधी व बलुची आहे. नुसत्या प्रांतिक भेदभावानेच हे प्रदेश विभागलेले नाहीत तर पश्चिम पाकिस्तानची भौगोलिक रचना पूर्व पाकपेक्षा भिन्न आहे. डोंगर, दऱ्याखोऱ्या व वाळवंटांनी व्यापलेला हा प्रदेश, तर पूर्व पाकिस्तानात दलदलीचा प्रदेश, बंगालचे उपसागराने निर्माण केला आहे. गंगा व ब्रह्मपुत्रेसारख्या दोन मोठ्या नद्यांचे सहकार्य पूर्व पाकिस्तानला लाभले आहे. काही ठिकाणी तर वर्षातून दोन किंवा तीन पिके काढणे येथील शेतकऱ्यांना शक्य आहे. अशा तऱ्हेने परस्पर भिन्न असे दोन प्रदेश फक्त धार्मिक भावनांचा विचार करून या पाकिस्तानचे योजनेत एकत्रित आणले, ही गोष्ट कोणाही तज्ज्ञाला मान्य करावी लागेल. या योजनेत १ लाख लोकवस्तीवरची अवघी आठ शहरे पाकिस्तानला मिळाली. (लाहोर, कराची, डाक्का,

हैद्राबाद, रावळपिंडी, मुलतान, सियालकोट, पेशावर) पूर्व पाकिस्तानातील ९५ टक्के लोकसंख्या खेड्यात राहते तर पश्चिम पाकिस्तानात फाळणीचे वेळी अवघे १५ टक्के लोक शहरात राहात होते. या विभागाचा विकास साधण्यासाठी आजपर्यंत ब्रिटिशांनी किती निष्काळजीपणा दाखविला होता, याचे उदाहरण पाकिस्तानचे नागरिकांचे फाळणीचे वेळचे व्यक्तिगत उत्पन्नावरून येईल. या वेळी व्यक्तिगत वार्षिक उत्पन्न अवघे २३० रुपये होते. सर्वसाधारण अमेरिकन नागरिकाचे उत्पन्न याचे तेवीस पट आहे. जगातील सधन देशाशी तुलना करता नवे निर्माण झालेले पाकिस्तान कोणत्या पायरीवर होते याची यावरून कल्पना येईल.

फाळणी झालेल्या दोन देशाची इतर दृष्टीने तुलना करावयाची म्हटले, तर पाकिस्तानचे वाट्याला अखंड हिंदुस्थानातील १० टक्के उद्योगधंदे आले (१४६७७ कारखान्यांपैकी १४५४ कारखाने पाकिस्तानात गेले. यातील ४१ टक्के छोटे उद्योगधंदे होते.) साडे सहा टक्के वीज (१३७५००० किलोवॅटपैकी ७२७०० किलोवॅट वीज) पाकिस्तानला मिळाली. उद्योगधंद्यात काम करणाऱ्या कामगारांपैकी अवघे १० टक्के कामगार पाकिस्तानचे वाट्याला आले. १० टक्के खाणीचा प्रदेश पाकिस्तानला मिळाला. २२ कापड गिरण्या पाकिस्तानकडे आल्या. या उद्योगधंद्याचे विशेष म्हणजे या उद्योगसमुहांचे मालक टाटा, बिर्ला, डालमियासारखे हिंदी नागरिक फाळणीचे वेळी होते. १९४७ पासून १९५० पर्यंतचा पाकिस्तानचा इतिहास पाहिला की हिंदुस्थानचे जे ईस्ट इंडिया कंपनीने केले तेच धोरण ब्रिटिश भांडवलदारांनी या नव्या निर्माण झालेल्या राष्ट्रात स्वीकारले. १९५० पर्यंत १० कोटी रुपयांचे ब्रिटिश भांडवल ब्रिटनने या देशात गुंतवून पाकिस्तानच्या व्यापारी नाड्या आपले ताब्यात ठेविल्या आहेत. तेलाचा धंदा तर सर्वस्वी ब्रिटिशांनी आपले हाती घेऊन सुरुवातीलाच हिंदमध्ये गमावलेले पाठबळ त्यांनी पाकिस्तानात मिळविले व फाळणीचा ब्रिटिशांचा मूळ हक्क व्यापारी दृष्टीने तरी साध्य होऊ लागला.

शेती हा पाकिस्तानचा फाळणीचे वेळचा प्रधान व्यवसाय होता. जवळजवळ ७५ टक्के पाकिस्तानी लोकसंख्या या शेतीव्यवसायात गुंतलेली होती. पाकिस्तानचे १६८६ कोटी रुपयांचे राष्ट्रीय उत्पन्नापैकी ११७० कोटी उत्पन्न शेतीउत्पादनामुळे मिळत असल्याने शेतीवर पाकिस्तानचा विशेष भर होता. गहू, बार्ली, कापूस व ऊस हा या प्रदेशाची मुख्य पिके, परंतु जगातील या पिकांचे एकरी पैदाशीचे प्रमाण लक्षात घेता, पाकिस्तानची एकरी पैदास सर्वात कमी ठरली असती. सुरुवातीचे पाच वर्षात तर ती ९ टक्क्यांनी आणखी कमी झालेली आढळते. जमीनदारवर्गाचे प्राबल्य या शेतीत येवढ होते की, पश्चिम पाकिस्तानातील ६ हजार जमीनदारांचे ताब्यात सर्व शेती असून ३० लाख शेतीवर खपणारे कामगार नुसते मजूर म्हणून या शेतीत राबत होते. पूर्व पाकिस्तानातील परिस्थिति यापेक्षा फारशी निराळी नव्हती. ८० टक्के शेती तेथे जमीनदारांचे ताब्यात होती, तर २० टक्के जमिनीत ज्याला स्वतःपुरते पुरेसे धान्य पिकविता येणार नाही असे छोटे छोटे शेतकरी विभागलेले होते.

वरीलप्रमाणे फाळणीनंतर निर्माण झालेला पाकिस्तान आर्थिकदृष्ट्या मोठा समृद्ध देश होण्याचे मार्गावर ब्रिटिशांनी आणून ठेविला होता असे म्हणता येणार नाही. बॅ. जीना यांचेसारख्या पुढाऱ्यांचा अट्टाहास व ब्रिटिश भेदनीतीचे प्राबल्य यांचे संगोपनाला भरपूर जागा मिळावी म्हणून वरील स्वरूपाचे पाकिस्तान ब्रिटिशपुढाऱ्यांनी निर्माण केले व त्याचा फायदा उद्योगधंद्याचे बाबतीत ब्रिटिशांनी कसा घेतला ते वर निर्देशित केलेच आहे. या वेळी ब्रिटिश व्यापाऱ्यांना व राज्यकर्त्यांना जवळ करून आपले आसन बळकट केल्याशिवाय पाकिस्तानी पुढाऱ्यांना दुसरे गत्यंतरच नव्हते. आंतरराष्ट्रीय परिस्थितीत ब्रिटन, अमेरिका व रशिया या तीन मोठ्या देशांनी या बाल्यावस्थेतील राष्ट्राकडून जेवढा फायदा लुबाडता येईल तेवढा घेऊन आशियातील स्वामित्व टिकविण्यासाठी जेवढे प्रयत्न करता येतील तेवढे प्रयत्न गेल्या वीस वर्षात केले व त्याचाच परिणाम

म्हणजे भावाप्रमाणे पाठीशी उभे राहू शकणाऱ्या हिंदुस्थानसारख्या देशाशी पाकिस्तानला कायमचे वैर पत्करावे लागले. या दोन्ही देशातील कलागती निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेला दारूगोळा पुरविण्याचे कार्य गेली २० वर्षे ब्रिटन, अमेरिका ही राष्ट्रे करीत आहेत, तर त्यांना तोंड देण्यास सज्ज झालेले चीनसारखे राष्ट्र पाकिस्तानचे पाय एका बाजूने ओढीत आहे. हा सर्व पाकिस्तानच्या सुरुवातीचे निर्बल परिस्थितीचा परिपाक आहे.

पाकिस्तानच्या निर्मितीचे वेळी ब्रिटिश सैन्य केव्हा मागे घेतले जाणार याचा कोणताही निर्देश इंडिया इंडिपेन्डन्स कायद्यात ब्रिटिशांनी केला नव्हता. हिंदी सैन्य व त्यांच्या साधनसामुग्रीची वाटणी करताना १९४७ साली अखंड हिंदुस्थानात असलेल्या सैन्याचा एक-चतुर्थांश भाग व त्याच प्रमाणात सैन्याची साधनसामुग्री पाकिस्तानला मिळावयाची होती व तो निर्णय घेतला जाताच त्याची वाटणीही सुरू झाली. मुसलमान सैनिकांपैकी बहुसंख्य पाकिस्तानकडे, हिंदु आणि शीख सैनिक हिंदकडे अशी वाटणी सुरू झाली. या वेळीच सैन्याचे डोक्यात कधीही न येणारी धर्मभावना वाढीस लागू लागली व याचा परिणाम पाकिस्तानच्या निर्मितीबरोबर झालेल्या दंगलीवर झाला. या वाटणीमुळे दंगलीचे वेळी शांततारक्षणाचे जे कार्य सैन्यानी करणे आवश्यक होते ते केले गेले नाही, असे ब्रिटिश अधिकाऱ्यांचेही मत होते. तर मौलाना आझाद आपले पुस्तकात लिहितात की, 'आमच्या सरहद्दीच्या दोन्ही बाजूला निरपराधी नागरिकांच्या रक्ताच्या नद्या वाहत असताना, लष्करातील शिपाई नुसते डोळे उघडे ठेवून पाहत होते, तर काहींनी या दंगलीत भाग घेतला होता.'

हिंदुस्थानात स्वातंत्र्याची घोषणा होऊन राज्यकारभार हाती घेण्यापूर्वी १४ ऑगस्ट १९४७ रोजी मध्यरात्री आपले राष्ट्राचा कारभार पाक पुढाऱ्यांनी हाती घेतला व पाकिस्तानचे गव्हर्नर जनरल म्हणून कायदे आझम महंमदअल्ली जीना यांची नेमणूक मुस्लिम लीगने केली. पाकिस्तानचे निर्मितीचा आनंदोत्सव पुरा होतो न होतो तोच पश्चिम व पूर्व पाकिस्तानच्यां खेड्या–शहरांतून हिंदूंना हाकलून

देण्याची मोहीम सुरू झाली. निराधार हिंदु व शीख नागरिकांचे थवेचे थवे सरहद्द ओलांडून हिंदहद्दीत शिरू लागले व तीच स्थिती पंजाब दिल्लीपर्यंतच्या मुस्लिम नागरिकांची झाली. हिंदु लोकवस्तीच्या पाकिस्तानातील शहरांना व रस्त्यांना आगी लागू लागल्या, घरांची लुटालूट झाली व यावेळी अल्पसंख्याकांना संरक्षण मिळेल अशी कोणतीही सामर्थ्यवान् शक्ति पाकिस्तानजवळ नव्हती. यामुळे नकळत का होईना, पण अल्पसंख्याकांना कोणतेही संरक्षण पाकिस्तानचे नवे गव्हर्नर जनरल देऊ शकले नाहीत. सर्व जगाला लाजविणारी निराधारांची हत्त्या पाकिस्तानहद्दीत यावेळी झाली. लाहोर, रावळपिंडी, अमृतसर इत्यादि शहरामागून शहरे पेटविली गेली. दिल्ली, उत्तरप्रदेश बिहारमधील काही शहरे व राजपुताना आणि हैद्राबाद या बाजूलाही हिंदु–मुसलमानांच्या दंगली झाल्या. एकट्या पंजाबात यावेळी ५ लाखावर लोक या दंगलीत मारले गेले असावे. जखमी व ज्यांची घरेदारे व सर्व मालमत्ता नष्ट झाली अशांची संख्या १ कोटी २० लाखावर असावी असा अंदाज परकीय निरीक्षकांनी प्रसिद्ध केला आहे. ब्रिटिशांनी हा मोठा देश सोडताना आपल्या हिंदु–मुसलमान द्वेषभावना फैलावण्याच्या योजनेचा अखेरचा तडाखा दोन्ही देशांना एवढा जोरात लगावला, की ही भेदनीति या दोन्ही देशांचे जीवनाला मोठा धक्का देणारी ठरली व एकेकाळी सुखासमाधानाने राहणाऱ्या या दोन्ही जमाती निदान पाकिस्तानात तरी सलोख्याने राहणे अशक्यप्राय झाले.

या स्वतंत्र राष्ट्राच्या निर्मितीत किती नवनव्या अडचणी निर्माण झाल्या याची कल्पना पहिल्या पाच वर्षात पाकिस्तानला पुरेपूर आली. हिंदुस्थानात जसे लक्षावधीं हिंदु शीख त्यांचेवर झालेल्या अत्याचारामुळे देश सोडून आले, तसेच आपल्यावर हिंदमध्ये याचा सूड उगविला जाईल या भीतीने व इतर काही कारणामुळे पाकिस्तानात आलेल्या निर्वासितांची संख्या ७० लक्ष २० हजारावर गेली असे पाकिस्तानी राज्यकर्त्यांचे म्हणणे आहे. यातील ६० लक्ष ५०

हजार पश्चिम पाकिस्तानात तर पूर्व पाकिस्तानात ७० हजार आले असे सांगण्यात आले. पश्चिम पाकिस्तानातील २६ टक्के प्रजा निर्वासितांची आहे. व ते सर्व कराची, लाहोर, मुलतान अशा मोठमोठ्या शहरांचे आसमंतात नवे उद्योगधंदे मिळतील म्हणून मैदानावर छोटया मोठ्या झोपड्या बांधून राहिले, यामुळे या शहरांची आर्थिक घडीच विसकटून जाण्याची वेळ आली. एकटया कराची शहरात १९५२ साली ४९ टक्के लोक निर्वासित होते. या सर्वांना बाल्यावस्थेत सर्व नव्याने पुनर्घटना होणाऱ्या या राष्ट्राला खावयास घालावयाचे होते. अधिक तुटवडा असलेल्या या प्रदेशात परक्या देशातून धान्य व साधनसामुग्री आणून त्याना पोसण्याशिवाय राज्यकर्त्यांना गत्यंतर नव्हते. याच वेळी ब्रिटन–अमेरिकेसारख्या राष्ट्रांनी अनेक प्रकारच्या मदतीची लालूच दाखवून या नव्या राष्ट्रांचा कल आपणाकडे वळविता आला व आशियाच्या कायमच्या लष्करी संरक्षणयोजनेतही पाकिस्तानला गुंतवूत घेता आले. काही गुप्तकरार या मदतीच्या अभिवचनापोटी पाकिस्तानने यावेळी आपली बाजू सावरण्यासाठी ब्रिटन-अमेरिकेशी केले असावे असा अंदाज आहे.

या सर्वच अस्थिर परिस्थितीमुळे पाकिस्तान व हिंदमधील मतभेदाचे अनेक प्रश्न सुरुवातीपासूनच उत्पन्न होत राहिले व ते सुटण्याऐवजी गोंधळाची परिस्थिति अधिक निर्माण झाली. (१) दोन्ही देशातील सरहद्दीची नीट आखणी व्हावयाची होती. (२) निर्वासितांचे प्रश्नात परस्परांचे देशातील या निर्वासितांच्या मालमत्तेची कशी व्यवस्था लावावी हा एक बिकट प्रश्न दोन्ही देशांपुढे होता. (३) दोन्ही देशांचे सरहद्दीवरून वाहणाऱ्या नद्यांचे पाण्याचा प्रश्न कसा सोडवावा. (४) त्यावर अवलंबून असलेल्या पाणीपुरवठ्याच्या योजना यशस्वीरित्या कशा सुरू राहतील. (५) तसेच अखंड हिंदुस्थानचे राष्ट्रीय कर्ज पाकिस्तानने आपले अंगावर किती घ्यावे. (६) काश्मीर, जुनागड व हैद्राबाद या संस्थानांचे बाबतीत कोणते निर्णय घ्यावे वगैरे अनेक बिकट प्रश्न तसेच सोडून ब्रिटिश राज्यकर्ते या दोन्ही देशांना गोंधळात टाकून गेले होते.

पाकिस्तानच्या निर्मितीची मूळ कल्पना उर्जितावस्थेत आणणारे पाकिस्तानचे गव्हर्नर जनरल कायदे आझम जीना यांनीही या गोंधळा-तून पाकिस्तानला बाहेर काढण्याच्या काही व्यवहार्य सूचना केल्या असे म्हणता येत नाही. २४ आक्टोबर १९४७ रोजी रेडिओवरून केलेल्या भाषणात बॅ. जीना म्हणतात, 'आम्ही देशाच्या फाळणीची जी मागणी केली ती नुसती मागणी राहिली नसून ती आता प्रत्यक्षात उतरली आहे. सत्यावर आधारूनच देशाची विभागणी झाली व त्याचे होणारे परिणाम आता हिंदने भोगले पाहिजेत.' एके काळी हिंदु-मुस्लिम ऐक्याची ग्वाही देणारे जीना आता या भाषेत पाकिस्तानी धोरणाचा पुरस्कार करीत होते.

एकमेकांच्या प्रदेशासंबंधी निर्माण झालेले बिकट प्रश्न सोड-विण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न पाकिस्तानकडून कधीच झाले नाहीत. एवढेच नव्हे तर पाकिस्तान व हिंदुस्थानमधील संबंध नेहमीच बिघड-लेले राहावे म्हणून काही नवे प्रश्न ब्रिटनच्या फुशीमुळे पाकिस्तानने कसे निर्माण केले याचे मोठे उदाहरण म्हणजे काश्मीर प्रश्न होय. काश्मीरसारख्या २१ हजार चौरस मैलाच्या प्रदेशाचे महत्त्व आशियावर सत्ता गाजवू इच्छिणारांना फार आहे. त्यावेळी राजे हरिसिंग यांची हिंदु राजवट जरी या संस्थानात होती, तरी बहुसंख्य मुसलमान प्रजा-जनांचे हे संस्थान पाकिस्तानला मिळाले पाहिजे अशी आशा पाकि-स्तानला ब्रिटन–अमेरिकेने लावली. या संस्थानचे प्रदेशाचा प्रत्यक्ष संबंध पाकिस्तान, अफगाणिस्तान, रशिया, चीन व हिंदुस्थान यांचेची सरहद्दीमुळे येत असल्यामुळे या लष्करीदृष्ट्या महत्त्वाचे सुपीक प्रदेशांचा ताबा आपले हस्तकांचे हाती असावा असे ब्रिटनला प्रथम-पासून वाटत होते. पण त्याचा परिणाम पाकिस्तानवर सुरुवातीपासून कसा होत गेला व या काश्मीरपायी दोन महत्त्वाचे लढे देण्याचा प्रसंग पाकिस्तानवर कसा आला, यानेच गेल्या वीस वर्षांतील इतिहास भरलेला आहे.

● ● ●

७ : काश्मीरचा बिकट प्रश्न

पाकिस्तानचे सुरवातीपासून ज्या प्रश्नावर हिंद व पाकिस्तानमध्ये तेढ उत्पन्न झाली तो प्रश्न म्हणजे काश्मीर या सरहद्दीवरील महत्त्वाचे प्रदेशाचा होय. ब्रिटिश राजवटीतील ८४४७१ चौरस मैलाचे जम्मू-काश्मीरचे संस्थानी प्रदेशात ३० लक्ष ७३ हजार ५४० लोक रहात असून त्यातील ७६ टक्के मुसलमान आहेत व अवघे २४ टक्के हिंदु आहेत. जुन्या हिंदी संस्कृतीचे अमोल भांडवल या संस्थानात खिस्त जन्मशकापूर्वीपासून साठविलेले असून, अनेक आक्रमकांचा काश्मीरच्या भूमीवर डोळा आहे. गझनीच्या महमुदानेही हिंदवर वचक ठेवावयाचा म्हणजे काश्मीर व तेथील संपत्ती आपले हाती हवी हे ओळखले होते. मोंगल सम्राटांनी काश्मिरी सौंदर्याची पुरी लज्जत चाखली होती. शहाजहाननंतर वीर नाग, अचिबाल, नयीन व शालीमारच्या बागा या सौंदर्य संपन्न प्रदेशात उठवून त्याला नंदनवन बनविले. मोंगल सम्राटानंतर शिखांच्या हाती काश्मीरची सत्ता आली व रणजितसिंगाने या काश्मीरचे साधनसामुग्रीला उजाळा दिला. यानंतर ईस्ट इंडिया कंपनीचे सावकार म्हणून जम्मूचे राजे गुलाबसिंग हे इंग्रजांना पैशाची मदत करीत असल्याचा पुरावा मिळतो. याच मदतीबद्दल १६ मार्च १८४६ रोजी झालेल्या करारात

जम्मू व काश्मीरची सत्ता राजे गुलाबसिंगाकडे आली. याच तहाविषयी पाकिस्तानचे प्रथमपासून आक्षेप आहेत.

काश्मीरची खरी परिस्थिती अशी आहे की, मुसलमानी अमलात बरेचसे हिंदू काश्मीरात मुसलमान करून घेण्यात आले. या मूळच्या हिंदूंना हिंदु संस्कृतीविषयी एवढा अभिमान व आदर आहे की त्यांना परत हिंदुधर्मात घ्यावे असा प्रयत्न पंडित नेहरू यांनी केला पण बनारसचे पंडितांनी त्यांना मान्यता दिली नाही व मदतही केली नाही. काश्मीरचे नागरिक आपल्या संस्थानची विभागणी करून घेण्यास कधीही तयार नव्हते. १९४७ चे इन्डिपेन्डन्स ॲक्टअन्वये हिंदी संस्थानांची साम्राज्यसत्ता जे ब्रिटिश सरकार त्याने या देशावरील आपली सत्ता सोडल्यानंतर संस्थानांना त्यांची सत्ता पूर्ववत् परत मिळाली होती. यामुळे काश्मीर संस्थानने स्वतंत्र राहावयाचे का हिंद अगर पाकिस्तानमध्ये सामील व्हावयाचे हा प्रश्न सर्वस्वी या संस्थानचा होता. हिंदुस्थानातील बहुतेक संस्थानातील चळवळी आतापर्यंत काँग्रेसने चालविलेल्या असल्यामुळे संस्थानिकाने कोणत्या राष्ट्रात सामील व्हावयाचे हा जनतेचा प्रश्न आहे. संस्थानिकांचा नाही ही भूमिका काँग्रेसने घेतली होती. तर ब्रिटिश सरकारचा कल संस्थानिकांचे मतावर हा निर्णय ठेवावा असा होता. बॅ. जीनांनी ही परिस्थिती लक्षात घेऊन जोधपूर, जेसलमीर, जुनागड वगैरे संस्थानिकांना आपले बाजूला वळविण्याचे प्रयत्न सुरूच ठेविले होते. हैद्राबादचे बाबत तर हिंदुस्थानने दडपशाही करून हे संस्थान मिळविण्याचा प्रयत्न करू नये, तेथील निजाम आपण कोणाला मिळावयाचे याबाबतचा निर्णय घेण्यास खंबीर आहेत अशी धमकी बॅं. जीनांनी देऊन आपली बोलणी निजामाशी सुरू केली होती.

हैद्राबादचे निजाम हे मुसलमान असल्यामुळे त्यांचेबाबत त्यांनी वरील धोरण बोलून दाखविले. पण काश्मीरचे महाराजे हरिसिंग गौर यांचेबाबत मात्र बॅ. जीनांची तागडी निराळी होती. संस्थानिकांचे इच्छेपेक्षा जनतेचा कौल आपले बाजूचा आहे असे ते बोलून दाखवीत होते. पंजाबात हिंदु व शिखांची जी कत्तल पाकिस्तानचे

जन्मानंतर झाली ती पाहिल्यानंतर तरी काश्मीरचे राजेसाहेबांनी आपली कुवत ओळखून हिंदु–शीख नागरिकांच्या रक्षणासाठी हिंदुस्थानशी ताबडतोब संस्थानचे विलिनीकरण पत्करणे आवश्यक होते. यावेळचे हिंदचे गव्हर्नर जनरल मौन्ट बॅटन यांनी २९ जून १९४८ रोजी केलेल्या एका भाषणात तर काश्मीर संस्थानला तसे बोलून दाखविले होते. ते म्हणाले, '१४ ऑगस्ट १९४७ पूर्वी काश्मीरच्या राजेसाहेबांनी पाकिस्तानात सामील होण्याची तयारी दर्शविली असती तर हिंदुस्थान सरकारला याबाबत आक्षेप घेता आला नसता. यावेळी काश्मीरमधील नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष शेख अब्दुल्ला हे होते. त्याचा हिंदला संपूर्ण पाठिंबा होता. नॅशनल कॉन्फरन्सने याबाबतचे जनतेचे मत काय आहे ते नीट अजमावावे अशी सूचना देण्यात आली होती. २१ ऑक्टोबर ४७ रोजी शेख अब्दुल्ला यानी दिल्ली येथे केलेल्या भाषणात प्रथम जनतेचे जबाबदार सरकार काश्मीरला मिळावे म्हणजे पाकिस्तान का हिंदमध्ये सामील व्हावयाचे याचा काश्मिरी विचार करू शकतील असे बोलून दाखविले. यावेळी आर्थिक व सांस्कृतिक दृष्टया काश्मीरला हिंदमध्ये विलीन होणे सोयीचे आहे असेही मत त्यांनी प्रगट केले होते, परंतु शेख अब्दुल्लांचे हे उद्गार बॅ. जीनांना पसंत पडले नाहीत. त्यांना काश्मीरच्या महाराजांइतकेच नॅशनल कॉन्फरन्सचे प्रेम होते. हा निर्णय ते यावेळी मानावयास तयार नव्हते. बक्षी गुलाम महमद यांचेसारख्या नॅशनल कॉन्फरन्सचे सदस्यांनी काश्मीरचे विलिनीकरणाबाबत सार्वमत घ्यावे अशीहि सूचना केली, पण पाकिस्तानचे पंतप्रधान लियाकत अल्ली खान यांनी ती फेटाळून लावली. पाकिस्तानने निराळयाच मार्गांचा अवलंब करून काश्मीर संस्थानचा कारभार धाकदपटशाहीने हाती घेण्याची एक योजना आखली. पाकिस्तानचे ताब्यात गेलेल्या पंजाबचे व काश्मीरचे आज शतकानुशतके निगडित संबंध होते, व त्या दृष्टीने आवश्यक त्या वाहतुकीच्या सवलतींची मागणी काश्मीर संस्थानने पाकिस्तानकडे केली असता तिला पाकिस्तानने सपशेल नकार दिला. सरहद्दीवरील पाकिस्तानी गुंडांच्या

कारवाया यानंतर दिवसेदिवस वाढू लागल्या व त्यांना आटोक्यात ठेवण्याचे सामर्थ्य काश्मीर संस्थानच्या तुटपुंज्या लष्करांत अगर पोलिसांत नव्हते. १९ ऑक्टोबर रोजी पाकिस्तानचे पंतप्रधान लियाकत अल्ली खान यांनी राजे हरिसिंग यांना पाठविलेल्या पत्रांत तुमचे संस्थानात शिरलेले हिंदी निर्वासित, व तुमचे डोग्रा सैनिक यांचेकडून संस्थानातील मुसलमान नागरिकांचा छळ होतो व तो थांबला पाहिजे असे दमदाटी देणारे पत्र पाठविले. या पत्राचे उत्तर येण्यापूर्वीच पाकिस्तानी सैनिक काश्मीर हद्दीत आपले साध्य साधण्यासाठी घुसले ते हल्लेखोर आहेत, आमचे सैनिक नाहीत असा पाकचा दावा होता.

काश्मीरच्या पहिल्या लढयाचा हा इशाराच होता. २२ ऑक्टोबर १९४७ रोजी म्हणजे पाकिस्तानचे निर्मितीनंतर अवघ्या दोन महिने सात दिवसांनी काश्मीरच्या लढयाचे रणशिंग पाकिस्तानने फुंकले व काश्मीरची सत्ता बळकावण्याचा प्रयत्न केला. सरहद्द प्रांतातील पठाण सैनिकांच्या तुकडया मेजर जनरल अकबर खान या पाकिस्तानी सेनानीचे नेतृत्वाखाली पंजाबची सरहद्द ओलांडून काश्मीरमध्ये घुसल्या व त्यांचेबरोबर हल्लेखोर होते. या सैनिकांना सर्व शस्त्रास्त्रे पाकिस्तानने आपले शस्त्रास्त्रागारांतून दिली होती. येवढेच काय पण पाकिस्तानी विभागणीमुळे तेथील सैन्यात गेलेले काही ब्रिटिश सेनानी आपापल्या तुकडयांचे पाकिस्तानचे आज्ञेनुसार लढयाचे नेतृत्व करीत होते. सरहद्दीजवळील पुंच हे महत्त्वाचे शहर प्रथम त्यांनी आपले ताब्यांत घेऊन तेथे 'आझाद काश्मीर' सरकारची स्थापना केली. त्या सरकारचे नेतृत्त्व सरदार महमद इब्राहिम यांचेकडे देण्यात आले हे सरदार इब्राहिम एकेकाळी काश्मीरचे मुस्लिम कॉन्फरन्सचे सभासद होते. काश्मीर हद्दीत पाकिस्तानी हल्लेखोरांच्या टोळया घुसू लागल्या व त्यांनी गरीब नागरिकांत अमर्याद लुटालुटीला सुरवात केली. तेव्हा मात्र आपल्या नागरिकांचे हाल काश्मीरचे राजेसाहेबांना पहावेनात. अपुऱ्या सैन्यबलामुळे पाकिस्तानचे सैन्याला त्याना थोपविता येईना. शिकारपूर, सियालकोट, गुजरात

लालमुसा, रावळपिंडी, अबोताबाद वगैरे शहरात सरहद्द प्रांतातून येणाऱ्या टोळीवाल्यांना पाकिस्तानी अधिकारी शस्त्रास्त्रे देत होते व लढ्यासाठी काश्मीरमध्ये पाठवीत होते. अशी वर्णने न्यूयॉर्क टाइम्सचे बातमीदाराने आपले पत्रांना पाठविलेल्या तारातून केली आहेत. अशा तऱ्हेने प्रत्यक्ष लढ्यात भाग घेऊनही आमचा काश्मीरमध्ये शिरलेल्या टोळीवाल्यांशी काहीही संबंध नव्हता अशी घोषणा पंतप्रधान लियाकत अल्ली खान करीत होते.

परिस्थिती गंभीर होताच २६ ऑक्टोबर १९४७ रोजी काश्मीरचे राजेसाहेबांनी काश्मीर संस्थान हिंदमध्ये विलीन केल्याची घोषणा केली व हिंदी सैन्याची मदत संरक्षणासाठी मागितली ती विमानाने दिल्लीहून पाठविण्यात आली. यावेळी काश्मीर हद्दीत शिरलेले टोळीवाले श्रीनगर जिकण्याचे तयारीने निघाले होते, पण काश्मीर दरीतील नागरिक व सैनिकांनी हिंदी सैन्य येऊन उतरेपर्यंत त्यांना मोठ्या धैर्याने थोपवून धरले. काश्मीरमध्ये शिरलेले हे सैनिक 'स्वतंत्र' काश्मिरी नागरिक आहेत असा ओरडा पाकिस्तानी राज्यकर्त्यांनी यावेळी सुरू केला. त्यांना काश्मीरच्या डोग्रा सैनिकांचे हातून काश्मिरी जनतेला सोडवावयाची आहे अशी घोषणा पाकिस्तान रेडिओ करीत होता. काश्मीरमध्ये शिरलेल्या सैनिकांची वृत्ती नुसती लुटारू दरोडेखोरासारखी होती. त्यांचेमध्ये सैनिकी शिस्त आणावयास पुरेसा वेळच पाकिस्तानी सेनानींना मिळाला नव्हता. त्यामुळे या स्वारीचा हिंदी सैनिकांचा प्रतिकार सुरू होताच बोजवारा उडाला. सुरुवातीला २६ ऑक्टोबरला उरी हे शहर या हल्लेखोरांनी घेतले व दुसऱ्या दिवशी बारामुल्ला हे श्रीनगरचे जवळचे केन्द्र त्यांचे हाती पडले. श्रीनगरपासून अवघ्या १७ मैलावर पाटण शहराजवळ जेव्हा ते आले तेव्हा मात्र श्रीनगरच्या भवितव्याची सर्वांना शंका वाटू लागली.

यावेळेपर्यंत या हल्लेखोरांनी काश्मीर नागरिकांची केलेली लुटालूट व हाल काश्मीरचे इतिहासातील एक हृदयद्रावक घटना म्हणूनच ओळखली जाईल. खेड्यातील बहुसंख्य जनता मुसलमान होती पण धर्मापेक्षा त्यांच्या स्त्रिया व संपत्ति यांच्यावर या पाकि-

स्तानी मुसलमान बांधवांचा अधिक डोळा होता. अलिबेग या शहरात तर पकडलेल्या स्त्रियांची एक मोठी छावणीच या दरोडेखोरांनी उभारली. तेथे कमीत कमी हजार स्त्रिया कोंडून ठेविल्या होत्या. त्यातील अवघ्या २०० स्त्रिया आपल्या जीवनाची करुण कहाणी सांगावयास मागे जिवंत राहिल्या. बारामुल्ला या शहराची लोकसंख्या १०,००० पर्यंत होती. परंतु दंगेखोर शहरातून निघून गेल्यानंतर अवघे १००० नागरिक तेथे जिवंत सापडले.

ही निर्दयतेची कुऱ्हाड फक्त काश्मीर नागरिकांवरच कोसळली असे नाही तर काश्मीरमधील ख्रिश्चन धर्मोपदेशकांनाही या आपत्तीची झळ पोहचली. बारामुल्ला शहरात एक कॅथॉलिक कॉन्व्हेन्टची शाखा होती. त्या कान्व्हेन्टमधील प्रमुख (मदर सुपीरिअर) व इतर सेविका व आश्रयास आलेल्या एका ब्रिटिश कुटुंबाचे निर्दयपणे खून करण्यात आले. शेख अब्दुल्ला यांनी या हल्लेखोरांच्या हकिकती पत्रकारांना सांगताना त्यांना 'गुन्हेगार' या नावाने संबोधिले आहे. ते म्हणाले, 'या हल्लेखोरांना मिळेल तें व मिळेल त्याला लुटले. पवित्र कुराणाचा त्यांनी अपमान केला व कित्येक मशिदींचे कुंटणखाने बनविले. यावेळी मुस्लिम राष्ट्रातील निरीक्षकांनी या हल्लेखोरांनी काश्मीरची कशी धुळधाण उडविली ती आपल्या डोळ्यांनी पाहावी.'

हिंदी फौजा विमानाने श्रीनगरमध्ये उतरविण्यात आल्या. सैन्य विमानाने नेण्यांइतकी विमाने हिंदजवळ नव्हती. परंतु आपल्या तुटपुंज्या साहित्यासह हिंद सेनानींनी शिस्तबद्ध पद्धतीने आपला लढा सुरू केला. एक महिन्याचे अवधीत उरीपर्यंत हल्लेखोरांना हिंदी फौजांनी लोटीत नेले. (जवळ जवळ ६५ मैल) ही हिंदी सैन्याने केलेली चढाई फार धाडसाची समजण्यात येते कारण सैन्याला आवश्यक असलेली साधनसामुग्री-केन्द्रेही यावेळी मुबलक नव्हती. पण नुसत्या लुटालूट करण्याचे उद्देशाने शिरलेल्या विस्कळीत पाक फौजांना मागे पिटाळणे लष्कराला यावेळी शक्य झाले. तरीपण काश्मीर संस्थानचा बराचसा भाग पाकिस्तानच्या हाती राहिला. यूनोच्या आज्ञेनुसार १ जानेवारी १९४९ रोजी युद्धतहकुबी जाहीर

झाली व जवळ जवळ काश्मीरचा अर्धा भाग पाकिस्तानचे हाती राहिला व तेथे आझाद काश्मीरची राजवट सुरू राहिली. पाकिस्तानचे सल्ल्यानेच या भागातील कारभार गेली वीस वर्षे सुरू आहे.

यानंतर पाकिस्तानी राज्यकर्त्यांनी हिंदी सैन्याच्या कारवाईबद्दल बरेच अकांड तांडव परदेशीय पत्रातून केले त्याला पंतप्रधान नेहरू यांनी २ नोव्हेंबर १९४७ रोजी उत्तर दिले असून त्यात ते म्हणतात, ' काश्मीरमध्ये महाराज हरिसिंग व पंतप्रधान शेख अब्दुल्ला यांचे मागणीनुसार सैन्य न पाठविणे म्हणजे काश्मीरचा विश्वासघात करण्यासारखे होते, कायदा धाब्यावर बसवून, शस्त्र हाती घेऊन लुटालुट, बलात्कार व हत्त्या करावयास धजावणाऱ्या दंगेखोरांपुढे भीतीने खाली मान घालणे होते. या आमच्या प्रतिकाराबद्दल आमचेवर पाकिस्तानचे पंतप्रधान लियाकत अल्लीखान यानी आक्रमणाचे, लढ्यासाठी चिथावणी दिल्याचे आरोप करणे म्हणजे सत्याची गळचेपी करणे होय.' यावेळी काश्मीरचे पंतप्रधान शेख अब्दुल्ला व राजेसाहेब यांचेमध्यें हिंदची मदत घेण्याबाबत कोणतेही दुमत नव्हते. यावेळी सैन्याच्या हालचालींना हिंदचे गव्हर्नर जनरल लॉर्ड मौन्टबॅटन यांनी पाठिंबा दिला होता. ते २७ ऑक्टोबर रोजी काश्मीरच्या महाराजांना लिहिलेल्या पत्रात लिहितात, ' आज काश्मीरवर हल्ला करणारांना हद्दीबाहेर घालवून देण्यात आले व तेथे कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित झाली की प्रजेची इच्छा अजमावून संस्थान हिंद हद्दीत जोडण्याचा अखेरचा निर्णय घेता येईल. ' यानंतरच लॉर्ड मौन्टबॅटन यांचे इच्छेनुसारच ३१ डिसेंबर १९४७ रोजी काश्मीरच्या प्रश्नात पाकिस्तानने आक्रमणाचे धोरण पुन्हा स्वीकारू नये म्हणून हिंदने हा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सुरक्षा समितीपुढे नेला.

या अर्जात असे स्पष्टपणे म्हटले होते की 'ज्याअर्थी काश्मीरवर हल्ला करणाऱ्या हल्लेखोरांना पाकिस्तानकडून मदत मिळत होती त्याअर्थी आम्ही हे आक्रमण आहे असे समजतो व आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार त्याचा प्रतिकार करण्याचा हिंदला हक्क आहे.' पण यावेळपासून संयुक्तराष्ट्र परिषदेपुढे काश्मीर प्रश्न सारखा याच पद्धतीने

मांडला जात असताना संयुक्तराष्ट्र परिषदेने युद्ध थांबविण्या व्यतिरिक्त कोणताही महत्त्वाचा निर्णय व पाकिस्तानचा याला होणारा विरोध लक्षात घेऊन दिलेला नाही. किंग्स्ले मार्टिन यांच्यासारख्या निःपक्ष-पाती लेखकांनी काश्मीर प्रश्नात हिंदची निःपक्षपाती भूमिका समजावून घेणे आवश्यक आहे असा इशारा दिला असतानाही यूनो, ब्रिटिश व अमेरिकेसारख्या राष्ट्रांचे वर्चस्वामुळे हा प्रश्न सोडविण्यात आजपर्यंत अडथळे निर्माण झाले असा उघड आरोप अनेक वेळा या बाबतीत केला गेला आहे.

यानंतर हाती आलेल्या पुराव्यात असेही बाहेर आले आहे की या हल्लेखोरांना पिटाळून लावण्यात येत असताना कायदे आझम जीना यांनी गव्हर्नर जनरल म्हणून पाकिस्तानचे त्यावेळचे सेना-प्रमुख जनरल ग्रेसी यांना सैन्य घेऊन काश्मीर हद्दीत शिरा व हिंदी फौजांना तोंड द्या असा हुकूम दिला होता, पण त्यावेळच्या दोन्ही देशातील सेनाप्रमुख सर क्लॉड अचिनलेक हे तातडीने जीनांचे भेटीस लाहोरला गेले व अशा तऱ्हेचा अतिरेकी हल्ला करणे योग्य होणार नाहीं असा सल्ला त्यांनी दिला, व जीनांनी पुन्हा विचार करून प्रथम दिलेले हुकूम मागे घेतले.

या घटनेनंतर काश्मीरचा प्रश्न ज्या पद्धतीने यूनोपुढे मांडला जातो व पाकिस्तान ज्या पद्धतीने आपला हक्क काश्मीरवर प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करते ती पद्धत पाहिली, की पाकिस्तानचे ताब्यात काश्मीर राहण्यामागे आणखी काही राष्ट्रांचे हात गुंतलेले असावेत अशी शंका पदोपदी येते.

• • •

८ : पाकिस्तानचा कारभार

पाकिस्तानचे सुरुवातीपासून कारभाराची घडी अशी विस्कळीत राहिली की त्याचा फायदा जनतेला मिळावा तसा कधीच तिचे इच्छेप्रमाणे मिळाला नाही. ही राजवट जुन्या १९३५ चे इंडिया अॅक्टानुसार व १९४७ चे नव्या इंडिपेन्डन्ट अॅक्टातील काही कलमांचा आधार घेऊन चालू करण्यात आली, गव्हर्नर जनरल कायदे आझम जीना यांचे हाती या अन्वये सर्व नागरी व लष्करी कारभाराची सूत्रे गेली. त्यांना असे कायदे करण्याचे नवे अधिकार मिळाले होते की, कोणत्याही कोर्टाला ते अमान्य करता येत नसत. तसेच देशातील कायदेमंडळे व घटनासमितीचे ते अध्यक्ष बनले होते. अखंड हिंदुस्थानातून पाकिस्तानात आलेल्या जिल्ह्यातून १९४६ चे निवडणुकात कायदेमंडळात निवडून गेलेले प्रतिनिधीच पाकिस्तानचे कायदेमंडळाचे प्रतिनिधी बनले व या प्रतिनिधीतून १० लाख लोकसंख्येमागे एक या प्रमाणात निवडून आलेले प्रतिनिधी घटनासमितीचे सभासद ठरले. घटनासमितीत विरोधक पक्ष निर्बल होता. तर खान अब्दुल गफारखान यांचेसारखे घटना समितीचे सभासद या काळात तुरुंगात डांबले गेले होते. याशिवाय पश्चिम पंजाबचे गव्हर्नर, सरहद्द प्रांताचे गव्हर्नर, सेनाप्रमुख व कित्येक विभागीय सेनाप्रमुख म्हणून

ब्रिटिश अधिकारीच काम करीत होते. पाकिस्तानात गेलेल्या संस्थानिकांचे अधिकार फक्त परराष्ट्रीय संबंध, संरक्षण व वाहतूक ही तीन खाती सोडली तर पूर्ववत् त्यांचे हाती होते, व त्यांची अमर्याद राजेशाही पूर्वीप्रमाणे सर्वसामान्य नागरिकांचे जिवाशी खेळ करीत होती. पश्चिम पाकिस्तानातील ४३ टक्के प्रदेश व पूर्व पाकिस्तानातील दहा टक्के प्रदेश अशा संस्थानिकांचे संपूर्णपणे ताब्यात होता.

ब्रिटिशांनी हिंदची सत्ता बहुसंख्य नागरिकांचा पक्ष म्हणून जशी काँग्रेसच्या हाती दिली तसा मुस्लिमांचा मोठा पक्ष म्हणून मुस्लिम लीगची निवड पाकिस्तानसाठी केली. पण मुस्लीम लीग व काँग्रेस यांचेमध्ये जमीनअस्मानाचे अंतर होते. मुस्लीम लीगमध्ये सर्वसाधारण मुस्लिम जनता कधीच समाविष्ट होऊ शकली नाही. तो पक्ष बहुसंख्य जमीनदारांचा व उद्योगपतींचा होता. ही परिस्थिती पहिली सात वर्षे १९५४ पर्यंत पूर्णपणे कायम होती. त्यामुळे पाकिस्तानचे सुरवातीचे राजवटीत सर्वसाधारण नागरिकांचे हितसंबंधाचे रक्षण व्हावे तसे झाले नाही. त्यांचे पहिले गव्हर्नर जनरल कायदेआझम जीना हे जसे मुस्लिम लीगचे नेते म्हणून या पदावर आले तसेच पाकिस्तानचे पंतप्रधान म्हणून लियाकत अल्लीखानांची निवड, जीनांचे दुय्यम सहकारी म्हणून झाली. ते ऑगस्ट १९४७ पासून ऑक्टोबर १९५१ पर्यंत कारभारावर होते. परंतु या त्यांचे अधिकाराबद्दल ते स्वतःच एका भाषणात म्हणाले की, 'मी जरी पंतप्रधान असलो तरी मुस्लीम लीगचा पंतप्रधान म्हणून कारभारावर आहे. घटनासमितीच्या सभासदांनी माझी निवड केली आहे असे मी कधीच समजलो नाही.' पश्चिम पाकिस्तानचे जमीनदार मलीक फिरोजखान नून, मियाँ मुमताझ दौलतानी, सय्यद अहमद नवाबशहा गरदेझी, व इफ्तीकार हुसेन, ममदोज हे नुसते घटनासमितीचे सभासद नव्हते तर कारभारासाठी मंत्रिपदे ते भूषवीत होते. या सर्वामुळे सर्व पाकिस्तानची सत्ता पूर्णपणे जमीनदारांचे हाती होती. यामुळे मोठ्या प्रगतिशील उद्योगधंद्याला या काळात वाव मिळाला असे

म्हणता येत नाही. १९५० सालची पाकिस्तानची परिस्थिती लक्षात घेऊन अर्थशास्त्रज्ञ सय्यद हुसेन हे लिहितात,

'पाकिस्तानातील भांडवलदारवर्गाचे हाती सत्ता असली तरी त्याचा फायदा त्यांना व्हावा तसा होऊ शकला नाही. सहजासहजी मिळणाऱ्या फायद्यामुळे भांडवल नव्या योजनेसाठी पुढेच येऊ शकले नाही, व प्रगती होऊ शकली नाही.' यासाठी परराष्ट्रांची आर्थिक मदत घेऊन धंदे वाढविण्याकडे वृत्ती वाढली. पाकिस्तान चेंबर ऑफ् कॉमर्सचे ६०० सभासदच सर्वत्र व्यापारांची कर्तुम अकर्तुम् शक्ति होते व त्यामुळे पाकिस्तान स्टेट बँकेचे ४५ टक्के शेअर भांडवल या मोठ्या भांडवलदारात विभागले गेले होते. १९५० साली पाकिस्तानची षड्वार्षिक योजना २६० कोटी रुपयांची होती. पण यातील ४७ टक्के भांडवल परराष्ट्रीय कंपन्यांचे हाती होते. ही परिस्थिती बॅ. जीना जोपर्यंत सर्व गोष्टीचे सूत्रचालक होते तोपर्यंत कशीबशी टिकून राहिली. सप्टेंबर १९४८ रोजी जीना मरण पावले व मुस्लिम-लीगमधील मतभेदाला सुरवात झाली. यानंतर लीगमधील पूर्व पाकिस्तान गटाचे प्रमुख ख्वाजानझिमउद्दीन हे पाकिस्तानचे अध्यक्ष घटनासमितीचे प्रमुख झाले. डाक्क्याचे नबाब कुटुंबातील ते होते, व त्यांचे लीगमधील सनातनी मतांच्या जमीनदारवर्गावर चांगलेच वजन होते. त्यांचे आगमनामुळे पूर्व पाकिस्तानच्या मुस्लिम लीग पुढाऱ्यांना पाकिस्तानचे राज्यकारभारात महत्त्व प्राप्त झाले. बॅ. जीना यांचे वेळीही सिंध प्रांताचे जमीनदार महंमद आयुब खुरो यांचा एक स्वतंत्र गट बॅ. जीना यांना विरोध करू लागला होता. अशा तऱ्हेने मुस्लिम लीगमध्ये प्रांतनिहाय गटबाजीला सुरवात झाली व बॅ. जीनांचे मृत्यूनंतर ते सारखे वाढीस लागले.

पाकिस्तानच्या मध्यवर्ती मंत्रिमंडळाचा कल कराची व पश्चिम पाकिस्तानच्या विकास-योजना हाती घेण्याकडे विशेष असल्यामुळे त्यात आणखी या द्वेषभावनेची ठिणगी पूर्व पाकिस्तानात विशेष भडकत गेली. १९५० पर्यंत विकासासाठी देण्यात येणाऱ्या कर्जापैकी ८५ टक्के कर्ज पश्चिम पाकिस्तानला दिले गेले. पूर्व पाकिस्तानचा

तागासारखा अमोल माल परदेशात विकून आलेल्या परकीय चलनाचा बराचसा भाग पश्चिम पाकिस्तानातील उद्योग–धंद्यासाठी वापरला जाऊ लागला.

यांतच भाषीय महत्त्वाचा वाद याच वेळी पाकिस्तानात उत्पन्न झाला. पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांपैकी बहुसंख्यांकांची उर्दू ही भाषा असली तरी पश्चिम पाकिस्तानातही ७ टक्के लोक उर्दू भाषा ही मातृ-भाषा मानणारे आहेत. पख्तुन, सिंधी, बलुची या तीन भाषांचे नागरिक बहुसंख्य होते. तर पूर्व पाकिस्तानात ९८ टक्के लोक बंगाली भाषा बोलणारे असून उर्दू बोलणारांची संख्या अवघी दोन टक्के होती. बॅ. जीना यांनी सुरवातीलाच उर्दू हीच पाकिस्तानची राष्ट्रभाषा राहणार हे जाहीर केल्यामुळे पूर्व पाकिस्तानात बंगाली भाषिकांनी आपली भाषा राष्ट्रभाषा झालीच पाहिजे असा आग्रह धरला व पूर्व व पश्चिम पाकिस्तानचे बेबनावात आणखी एका नव्या धुसफुशीची भर पडली.

याच वेळी पश्चिम पाकिस्तानातील कराची बंदराचे वैशिष्टय लक्षात घेऊन ते बंदर सिंध प्रांतातून वेगळे काढण्याचा निर्णय घेण्यात आला. कराची हे शहर फेडरल एरिया म्हणून मध्यवर्ती सत्तेच्या हाती देण्याचा निर्णय घेण्यात आल्यामुळे एम्. ए. खुरो यांचेसारख्या सिंधी पुढाऱ्यांनी या निर्णयाविरुद्ध निदर्शने सुरू केली. तर सरहद्द प्रांतात नवे पख्खतुनीस्तान बनविण्याची चळवळ खान अब्दुल गफार खान यांनी हाती घेऊन पाकिस्तानच्या नेत्यांना शह देण्याचा चंग बांधला. ही चळवळ येवढी उग्र स्वरूप धारण करू लागली की पाकिस्तानी राज्यकर्त्यांना खान अब्दुल गफारखान यांना तुरुंगात टाकावे लागले, पण यामुळे विरोधकांची चळवळ थांबू शकली नाही. जवळ जवळ १२ हजार सरहद्द प्रांताचे रहिवाशी या लढ्यात कारावासात गेले. यावेळी सिंध, बलुचिस्तान सरहद्द प्रांत या तिन्ही विभागातील जमीनदारवर्ग पाकिस्तानचे मध्यवर्ती सर-कारचे हाताखाली जीव धरून होता. ब्रिटिशांचे जुने कायदे उपयोगात आणून पाकिस्तानचे राज्यकर्ते झराझर चळवळ्यांना तुरुंगांत डांबू

लागले. पूर्व पाकिस्तानचे प्रमुख पुढारी मौलाना अब्दुल हमीद भाषाणी यांना १९४९ सालीच अटक झाली तर १९३१ चा प्रेस इमर्जन्सी कायदा पुन्हा जारी करून कित्येक वृत्तपत्रांची मुस्कटदाबी करण्यात आली. मौलाना भाषाणी यांना अटक होण्यापूर्वी त्यानी मुस्लिम लीगमधून फुटून अवामी लीग या नव्या संघटनेची प्रतिष्ठापना केली. या संघटनेत फक्त मुस्लिमांनाच सभासद होता येत असे. त्यात फक्त अधिकृत मुस्लिम लीगचे विरोधक सामील झाले. अवामी लीगच्या शाखा सरहद्द प्रांतातही निघाल्या. पीरसाहेब ऑफ मन्की शरीफ यांनी हा विरोधक गट हाती घेतला. बंगाल मुस्लिम लीगचे पूर्वीचे पुढारी हुसेन सुऱ्हावर्दी हे मौलाना भाषाणीचे चळवळीत सामील झाले व भाषाणीचे अटकेनंतर त्यानी अवामी पक्षाची सूत्रे हाती घेतली. ही फूट फक्त पूर्व पाकिस्तान व सरहद्द प्रांतात झाली असे नाही, तर पंजाबमध्ये मुस्लिम लीगमधून फुटून निघालेल्या महमद अली कसुर, ख्वाजा अली कसुर, शेख महमद रशिद, अझाद पाकिस्तान पक्ष नावाचा एक नवा पक्ष पंजाबमध्ये काढला व त्यांनी सुरवातीलाच नागरी स्वातंत्र्याची घोषणा जाहीरपणे केली. प्रथम सर्व परराष्ट्रीय अधिकारी (ब्रिटिश अधिकारी) पाकिस्तानातून काढून टाकावे ही त्यांची दुसरी मागणी होती मुस्लिम लीगचे राज्यकर्त्यांना विरोधकांची ही सुरू झालेली चळवळ बिलकुल आवडली नाही. त्यांनी या विरोधकांच्या संघटनांच्या कचेऱ्या व संबंधित शाखांच्या पदोपदी झडत्या घेणे वगैरे प्रकार सारखे सुरू केले. यातून प्रोग्रेसिव्ह रायटर्स असोसिएशन ही लेखकांची संघटनाही सुटू शकली नाही. याचा परिणाम असा झाला की, पेशावरपासून डाक्कापर्यंत मुस्लिम लीगचे विरोधक सारखे वाढत गेले.

डिसेंबर १९४८ पासून मे १९५० पर्यंत पाकिस्तान व हिंदच्या अधिकाऱ्यात जे निरनिराळे प्रश्न सोडविण्यासंबंधी बोलणी झाली त्यात सुटू शकलेले प्रश्न मर्यादित स्वरूपाचे होते. १) परस्परांच्या प्रदेशातील अल्पसंख्याकांचे धार्मिक हक्कांना बाध येऊ नये म्हणून त्याना प्रवासाच्या व इतर बाबतीत योग्य त्या सवलती देणे. २) व

रेल्वे व पोस्ट ऑफिस व वाहतुकीबाबत योग्य परस्पर देव-घेवी-बाबतच्या सोयी प्रस्थापित करणे. यातील दुसऱ्या विभागात सुरवातीला ठरलेल्या सवलती, हिंद-पाकचे दुसऱ्या युद्धानंतर पुन्हा बंद झाल्या व त्या १९६६ चे अखेरीपर्यंत नीट सुरू झालेल्या नव्हत्या. निर्वासितांची मालमत्ता, काश्मीर प्रश्न याबाबत कोणतीही तडजोड पाक-हिंदच्या राज्यकर्त्यांचे चर्चेत यशस्वी झाली नाही. हिंदशी वाढणाऱ्या मतभेदांमुळे हिंदशी निकटचे संबंध असलेली पाकिस्तानी प्रजा कधीही राज्यकर्त्यांचे या मतभेदांचे धोरणाशी सहमत होऊ शकली नाही. त्यांना त्यांचे वर्षानुवर्षे जवळ राहिलेले भाईबंद सरहद्दी पलिकडे दिसत पण पूर्ववत् त्यांचेशी सलोख्याचे संबंध ते कधीच प्रस्थापित करू शकले नाहीत. यामुळे सरहद्दीवरील कटकटी वाढतच गेल्या.

यातच पाकिस्तानातील धान्यनिर्मिती कमी होऊ लागल्यामुळे बिकट परिस्थिती निर्माण झाली. पाकिस्तानची बरीचशी पिके कालव्याचे पाण्यावर अवलंबून असल्यामुळे राज्यकारभारातील पाणी पुरवठ्याचे अनास्थेमुळे सर्वच पिकांची हेळसांड होऊ लागली. १९५०-५१ साली गव्हाचे पीक ३९५०००० टन होते. ते १९५२-५३ साली २४३८००० टनावर आले. बाजरी ३८५००० टनावरून २७०००० टनावर आली. ज्वारी २७०००० टनावरून २४३००० टनावर आली. ही घसरगुंडी पश्चिम पाकिस्तानात चांगलीच जाणवली. जिल्ह्यात या तुटवड्यामुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली व सर्वत्र धान्याच्या किंमती तिप्पट-चौपटीने वाढल्या. १९५३ सालचा धान्याचा तुटवडा १२ लक्ष ५३ हजार टनावर गेल्याने हा तुटवडा परदेशातून धान्य आणून भरून काढावा लागला. १९५३ साली ११ लक्ष ८९ हजार ३०० टन धान्य परदेशातून आणावे लागले व त्यामुळे परदेशातील चलनावर परिणाम होऊ लागला. फक्त पूर्व पाकिस्तानातील ताग व पश्चिम पाकिस्तानातील कापूस या दोन वस्तूंचे जिवावर पाकिस्तान परदेशीय बाजारपेठेत परदेशी

चलन मिळवीत असे परंतु या साठ्यातील परदेशीय धान्य आयाती-मुळे १९५२ साली ३० कोटी १० लक्ष रुपये व १९५३–५४ साली ५२ कोटी ६० लक्ष रुपये खर्ची पडले.

या सर्व परिस्थितीमुळें निर्माण झालेले अंतस्थ बेबनाव वाढू लागले. राज्यकर्त्याविषयींची अप्रीति सर्वसाधारण जनतेच्या मनात राहिली नाही. कामगारवर्ग संप करू लागला. १९५१ साली झालेल्या पाकिस्तानातील ६४ संपात २२८०० कामगार सामील झाले तर १९५२ साली हा आकडा ९५ संपावर गेला व त्यात २८००० कामगार सामील झाले. यातील बहुतेक संप पूर्व पाकिस्तानातील उद्योगधंद्यात होते. तर पश्चिम पाकिस्तानात कराचीसारखी शहरे या संपात आघाडीवर होती.

याच वेळी लष्करात असा एक वर्ग निर्माण झाला की, त्याला ब्रिटिश अधिकाऱ्यांचे वर्चस्व मान्य नव्हते. मुस्लिम लीगच्या मंत्रिमंड-ळाने हे वर्चस्व झुगारून द्यावे व पाकिस्तानी सेनेची सत्ता पाक अधि-काऱ्यांचे हाती द्यावी अशी मागणी उघडपणे होऊ लागली. लियाकत अल्लीखान यांचेसारखे पंतप्रधान ज्या जमीनदारवर्गातून आले होते त्यांना ब्रिटिश सेनानी म्हणजे मोठे आधार होते व त्याना ते बाजूला करावयास येवढ्यातच विशेषत: विरोधकांचा जोर वाढल्यामुळे तयार नव्हते. याचा परिणाम असा झाला की, नागरिकाचे पुढाऱ्यांना पकडून त्यांचा बंदोबस्त राज्यकर्ते करू शकत होते. परंतु लष्करात जनरल अकबरखान यांचे नेतृत्वाखाली तयार झालेली आघाडी फार प्रबल होऊ लागली. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी सैन्याला देऊ केलेली शस्त्रास्त्रे मिळू न शकल्यामुळे सैन्यातही बेदिली उत्पन्न झाली. व त्याचा परि-णाम जनरल अकबरखान याचे विरोधाला अधिक पाठिंबा मिळण्याने झाला. हा विरोध वाढू नये म्हणून ९मार्च १९६१ रोजी जनरल अकबर खान व त्यांचे बरोबरचे अकरा लष्करी अधिकाऱ्यांना देशाविरुद्ध कट केल्याबद्दल अटक केली.

हा रावळपिंडी कट या नावाने ओळखला जातो. त्याचेबरोबर, सैयद झहीर, (कम्युनिस्ट) फैझ अहमंद फैझ (एक गाजलेले कवि,)

पाकिस्तान टाईम्सचे संपादक महमद हुसेन अरा याना या पाकिस्तान विरोधी कटाबद्दल अटक झाली. रावळपिंडी कटाचे सहाय्यक म्हणून त्यांना अटक झाली. हा कटाचा खटला हैद्राबाद (सिंध) तुरुंगात ट्रायब्युनलपुढे चालला. यावेळी आरोपींना आपली बाजू मांडण्यास पुरेसा अवधी व संरक्षण मिळाले नाही. तरीपण खटला चालविण्यासाठी नेमलेल्या न्यायमूर्तींनी सैयद झहीर, फैज अहंमद फैज व संपादक महंमद आरा यांचेविरुद्ध पुरावा मिळालेला नाही. असे मत प्रदर्शित केले. पण अकरा लष्करी अधिकाऱ्यांना मात्र ३ ते ७ वर्षापर्यंत शिक्षा झाल्या व त्यांचे प्रमुख जनरल अकबरखान यांना १२ वर्षाची हद्दपारीची शिक्षा सांगण्यात आली. पुरावा न मिळालेल्या तीन नागरिक पुढाऱ्यांचा आरोप सिद्ध झाला नाही तरी राजद्रोहाचे आरोपाखाली चार वर्षे सक्तमजुरी व ५०० रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. हा रावळपिंडी कटाचा खटला म्हणजे पाकिस्तानी राजवटीतील. सुरवातीचा एक महत्त्वाचा खटला म्हणून गणला जातो. यामुळे पंतप्रधान लियाकत अल्लीखान यांचे विरोधक मात्र सारखे वाढू लागले.

याचा परिणाम १९५१ साली झालेल्या पंजाब लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे निवडणुकीवर झाला व अवघे ५२ टक्के मते मुस्लिमलीगला मिळाली. असेंब्लीतील १९४ जागांपैकी १४३ जागा या पक्षाला मिळाल्या. तरी अवामीलीग या विरोधक पक्षाने १८ टक्के मते मिळविली व २९ जागा मिळविल्या तर आझाद पाकिस्तान पक्षाने एक जागा मिळवून २ टक्के मते मिळविली. लाहोरसारख्या महत्त्वाचे शहरात १२ जागांपैकी ६ जागा विरोधकांनी मिळविल्या व राज्यकर्त्या लीग पक्षाला विरोधकांचे निवडणुकीला अनुकूल परिस्थिती नसतानाही चांगला धक्का दिला. या सर्वांचा परिणाम जीनांचे उजवे हात लियाकत अल्लीखान यांचेवर चांगलाच झाला. लष्कराची मागणी मान्य करावी म्हणून त्यांनी काही ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्यांना रजा दिल्या पण त्यांनी ब्रिटिश राज्यकर्ते नाखूष झाले.

अमेरिकेशी मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित करण्याचे दृष्टीने त्यांनी केलेले प्रयत्न मात्र बरेच यशस्वी झाले होते.

पण या सर्व गोष्टींचा परिणाम लियाकतअल्ली खान यांचे विरोधक वाटण्यात झाला. १६ ऑक्टोबर १९५१ रोजी रावळपिंडी येथील एका सभेत ते भाषण करीत असता सय्यद अकबर नावाचे जमियत इस्लामी पक्षाचे एका तरुण सभासदानी त्यांचेवर गोळी झाडून त्यांचा खून केला. बॅ. जीनांचे तख्त चालविणारे मुस्लिम लीगचा खंदा पुढारी नाहीसा झाल्याने व गव्हर्नर ख्वाजा नझीमउद्दीन यांनी पंतप्रधानकीची सत्ता हाती घेतली व गुलाममहंमद गव्हर्नर जनरल झाले. व पाकिस्तानचा कारभार पुढे सुरू झाला.

● ● ●

९ : लष्करी अंमलाची वाटचाल

लियाकत अल्लीखान यांचे खुनाला कारणे कोणती झाली यासंबंधी पाकिस्तान सरकारने चौकशी केली, पण या चौकशीचा अहवाल रावळपिंडी खटल्यासारखा गुप्तच ठेवण्यात आला. पाकिस्तानी वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या बातम्यांवरून पाहता, यामागे अमेरिका व ब्रिटनच्या गुप्तहेर खात्यांच्या काही कारवाया आहेत असे काही पत्रांनी ध्वनित केले तर काहींनी मौलवी व उलेमानी हा कट करून लियाकत अल्लीखान यांचा काटा कायमचा दूर केला असे म्हटले आहे. विशेषतः पाकिस्तानची घटना तयार होत असताना या सनातनी वर्गावर लियाकत अल्लीखानांचे धोरणामुळे अन्याय होत आहे असे या वर्गाचे म्हणणे होते. ते सुधारक गृहस्थ गणले जात त्यांचे पत्नीने पडदा झुगारून देऊन परदेशचा प्रवास केला होता. पाकिस्तानची ही घटनासमिति सर्व जमातीतील एक चर्चेचा विषय बनला होता. १९५० साली हिंदची घटना अंमलात आली, पण पाकिस्तानी घटनासमितीचे कार्याला १९५० साली सुरुवात झाली, व त्यानंतर सहा वर्षांनी १९५६ साली ती अंमलात आली. या समितीस मुस्लिम लीगचे वर्चस्व असल्यामुळे विरोधी पक्षियांच्या कोणत्याच सूचना मान्य केल्या गेल्या नाहीत. इस्लामचे तत्त्वानुसार पाकिस्तानचे नागरिकाला

स्वतःच्या मतानुसार वागण्याचे कामी स्वातंत्र्य या घटनेने दिले. प्रत्येक प्रादेशिक घटकांची प्रांतिक स्वायत्तता मान्य केली. घटनेच्या मूलभूत कल्पनेसंबंधीचा पहिल्या अहवालावरच पूर्व पाकिस्तानचे प्रतिनिधी नाराज होते. पाश्चिमात्य सुधारणांचा पुरस्कार करून मुस्लिम स्त्रियांनी पड्यातून बाहेर पडावे असे सांगणारे लियाकत अल्लीखान व त्यांच्या पत्नी यांनी घटनेत स्त्रियांचे अबाधित स्वातंत्र्यासाठी जी धडपड केली ती मौलवी व मुल्लाना बिलकूल मान्य नव्हती. त्यांचे घटनेवर होणारे परिणाम त्यांचे मृत्यूमुळे टळले व नवे पंतप्रधान नझीमउद्दीन त्यांनी मौलवी मंडळीशी जुळते घेऊन परिस्थिती थोडीफार सुधारली. पण अहमदिया जमात व जमियत उलेमा पक्ष यांना नझीमउद्दीन यांचे म्हणणे तेवढेसे पटेना म्हणून ते समितीतून विरोधक बनून बाहेर पडले. अहमदिया मंडळीचे ताब्यात पाकिस्तानचा व्यापार व उद्योगधंदा असल्यामुळे त्यांना दुखवून नाझीमउद्दीन यांचे चालण्यासारखे नव्हते. अहमदिया मंडळी ब्रिटिश राज्यकर्त्यांना विश्वासात घेणारी होती तर जमियत इस्लामी पक्षाचे पुढारी अमेरिकेशी स्नेहसंबंध ठेवणारे होते. म्हणजे पाकिस्तानच्या अंतस्थ राजकारणात या घटनेचे भांडणाचे वेळी ही दोन राष्ट्रे योग्यवेळी आपले हस्तकाकरवी हातचलाखी करीतच होती.

या अशा गोंधळाचे परिस्थितीत १७ एप्रिल १९५३ रोजी गव्हर्नर जनरल गुलाममहंमद यानी नझीमउद्दीन यांचे मंत्रिमंडळ बरखास्त केले. व महमदअल्ली बोग्रा याना नवे मंत्रिमंडळ बनविण्यास सांगण्यात आले. मि. बोग्रा हे अमेरिकेत पाकिस्तानचे वकील म्हणून काम करीत असल्यामुळे त्यांचे अमेरिकेकडे चांगले वजन होते. व त्यांच्या सहकार्याने सधन अमेरिकेशी आपले संबंध चांगले सुधारू शकतील असे गव्हर्नर जनरल गुलाम महमद याना वाटल्यामुळे नव्या पंतप्रधानकीवर त्यांची निवड झाली. व ब्रिटिश वर्चस्व असलेला गट मागे पडून अमेरिकेचे गटाचा शिरकाव पाकिस्तानचे राजकारणात प्रामुख्याने झाला.

महमद अल्ली बोग्रा यांची निवड मुस्लिम लीग पक्षाने मान्य करून त्यांना १७ ऑगस्ट १९५३ रोजी लीगचे अध्यक्ष केले. घटना-

समिति पूर्व पश्चिम पाकिस्तानात मध्यवर्ती कायदेमंडळातील जागा-वरून निर्माण झालेला वाद सोडविण्यासाठी ३०० पैकी १६५ जागा पूर्व पाकिस्तानला वरिष्ठ कायदेमंडळात दिल्या व तितक्याच जागा दुसऱ्या कायदेमंडळात कमी केल्या यामुळे दोन्ही सभागृहाचे एकत्रित बैठकीत दोन्ही विभागांच्या समान संख्या राखणे शक्य झाले. अशा तऱ्हेने बरेच दिवसात गोंधळात पडलेली पाकिस्तानची घटना १४ नोव्हेंबर १९५३ रोजी अंमलात आली.

वरच्या थरातील हे वाद मिटले तरी कामगारवर्ग व पूर्व पाकिस्तानातील जनतेचे समाधान पाक मंत्रिमंडळाचे धोरणामुळे कधीच झाले नाही. प्रत्येक बाबतीत पूर्व पाकिस्तानवर पश्चिम पाकिस्तानचा कुरघोडी व अन्याय होतो ही तक्रार अजूनहि कायम होती. १९५४ पर्यंत जवळजवळ ९० कोटी ९० लक्षाचे परदेशीय चलन पूर्व पाकिस्तानने पाठविलेल्या मालामुळे मिळाले पण ते सर्व पश्चिम पाकिस्तानच्या प्रगतीसाठी खर्ची पडते हा ओरडा कायम होता.

या वाढणाऱ्या मतभेदामुळ १९५४ साली पाकिस्तानात गण तंत्रीदल (डेमोक्रॅटिक पक्ष) नावाचा पक्ष मि. महंमदअल्ली या पुढाऱ्यांनी तयार केला व त्यानी पूर्व पाकिस्तानसाठी स्वतंत्र फेडरल रिपब्लिकची मागणी करून पश्चिम पाकिस्तानशी संबंध तोडण्या-पर्यंत पाळी आणली. फझलुल हक्क यांच्या पूर्व पाकिस्तानातील कृषक श्रमिक पक्षाने २६ जुलै १९५३ रोजी डाक्का येथे परिषद भरवून पूर्व पाकिस्तान १९४० चे ठरावानुसार संपूर्ण स्वायत्तता द्यावी अशी मागणी केली. अशा तऱ्हेने. भाषाणीचे अवामी लीग गण-तंत्र पक्ष, व फजलुल हक्क यांचा कृषक व श्रमिक पक्ष हे तीन मोठे पक्ष विरोधक पक्ष म्हणून मुस्लिम लीगपुढे उभे राहिले व त्यांचे वर्चस्व दिवसेदिवस वाढू लागले. याशिवाय या विरोधी पक्षांना पाठिंबा देण्यासाठी पाकिस्तानातील रशियन कम्युनिस्ट पक्षाने आपली नवी आघाडी १९५४ साली उभारली.

याच वेळी ८ मार्च १९५४ रोजी झालेल्या पूर्व बंगाल असेंब्ली निवडणुकीत ३०९ जागांसाठी १२८५ उमेदवार उभे राहिले. यावेळी

मुस्लिम लीगला फारच जोराचा पराभव पूर्व पाकिस्तानात स्वीकारावा लागला. ३०९ पैकी २३७ जागा मुस्लिम सभासदांसाठी होत्या त्यातील २२३ जागा या विरोधी पक्षियानी मिळविल्या. ४ जागा खिलाफतई–खानी या एका स्वतंत्र पक्षाला मिळाल्या व अवघ्या १० जागावर मुस्लीम लीगचे सभासद निवडून आले. नुरुलअमीन व इतर मुस्लिम लीगमधील प्रमुख पुढारी यावेळी पराभूत झाले. विरोधी पक्षापैकी अवामी लीगला १४२, कृषक श्रमिक–पक्षाला ४८ ज गा व निझामी इस्लाम पक्षाला १९ जागा मिळाल्या. निवडणुकीसाठी विरोधक पक्षाचे जवळ जवळ १६ पक्षांनी एकत्रित आघाडी युनायटेड फ्रंट निर्माण करून लीगला तोंड दिले व अधिकारारूढ लीगची धूळधाण उडविली. मुस्लिमेतर अल्पसंख्य पक्षासाठी ७२ जागा होत्या. त्यातील ७२ पैकी ६८ जागा विरोधकांना मिळाल्या, त्यात शेडयुल्ड कास्ट फेडरेशनचे २७, नॅशनल काँग्रेसचे २४ व कम्युनिस्टांचे ४ याप्रमाणे उमेदवार निवडून आले. विरोधकांनी आपल्या संयुक्त आघाडीचे मंत्रिमंडळ फझलुल हक्क यांचे नेतृत्वाखाली प्रस्थापित केले. पण संयुक्त पक्षाचे मं.त्रमंडळात सुरवातीपासूनच असावा तसा एकोपा दिसून येत नव्हता. मध्यवर्ती सत्तेशी हे विरोधी पक्षीय मंत्रिमंडळ कितपत जमवून घेणार हा सर्वांपुढे प्रश्न होताच. फझलुल हक्क यांनी अधिकारावर येताच बंगाली ही पूर्व पाकिस्तानची राजभाषा म्हणून घोषणा केली. त्यांनी सर्व राजकीय गुन्हेगारांना बंधमुक्त केले, व तागाचे व्यापारात योग्य फायदा मिळावा म्हणून चौकशीला सुरवात केली. संयुक्त आघाडीचा हा कार्यक्रम इतका गाजला की, पश्चिम पाकिस्तानातही विरोधी पक्षांनी तो हाती घेऊन मुस्लिम लीगचे मध्यवर्ती सरकार विरुद्ध चळवळ सुरुवात केली. या विरोधी पक्षीय चळवळीला येवढा जोर चढला की त्याची एक परिषद सरहद्द प्रांतात १९५४ चे एप्रिलमधे घेण्यात आली व त्यांनी विरोधकांची सर्व पाकिस्तानभर संयुक्त आघाडी निर्माण करून मध्यवर्ती लीग मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावयास लावावयाचा व पश्चिम पाकिस्तानात पुन्हा निवडणुका घेण्याचा कार्यक्रम आखावयास

भाग पाडावयाचे असा निर्णय परिषदेंत घेतला. मुस्लिम लीगविरुद्ध झालेल्या या उठावात, अवामीलीग, अझाद पाकिस्तान पक्ष, व सिंध व सरहद्द प्रांतातील सर्व छोटे मोठे पक्ष सामील झाले. यावेळी अमेरिकन गटाशी पाकिस्तान सरकारने केलेले काही लष्करी करार हाही एक मोठा चर्चेचा विषय पाकिस्तानात झाला होता. विरोधी पक्षियांनी या पाकिस्तान सरकारचे धोरणाला कसून विरोध केला. यावेळी अमेरिकेच्या पाकिस्तानातील हस्तकांनी सरळसरळ मुस्लिम लीगचे मध्यवर्ती मंडळाला पाठिंबा दिला. अमेरिकेचे पाकिस्तानातील वकील मि. हिलड्रेथ यांनी सरहद्द प्रांतात केलेले भाषणात पूर्व पाकिस्तानात विरोधी पक्ष अधिकारावर येणे ही एक स्थानिक घटना आहे, त्यांचा पाकिस्तानच्या सर्व राजकारणावर परिणाम होऊ शकत नाही असे उद्‌गार काढताच विरोधी पक्षियात चांगलीच खळबळ उडाली. याच वेळी विरोधकात फूट कशी पडेल याचा विचार पाकिस्तान लीगचे मंत्रिमंडळ करीत होते. त्यासाठी त्यांनी पुन्हा बंगाली विरोधी वातावरण तापवावयास सुरवात केली. उर्दू व बंगाली या दोन्ही भाषा पाकिस्तानच्या राष्ट्रभाषा आहेत अशी घोषणा केली. पण एवढ्याने ही एकजूट फुटण्याची चिन्हे दिसेनात.

याच वेळी अमेरिकन पत्रांतून येणाऱ्या बातम्या या संयुक्त आघाडीच्या कार्याला मोठ्या घातक ठरू लागल्या. न्यूयॉर्क टाईम्स-सारख्या जबाबदार पत्रांना, फझलुल हक्क हे पूर्व पाकिस्तानचे एक स्वतंत्र राष्ट्र बनविण्याचे विचारात असून ते लवकरच पाकिस्तान-मधून फुटण्याचे विचारात आहेत अशी बातमी टाकली. या बातमीचा फझलुल हक्क व त्यांचे युनायटेड पक्षाने इन्कार केला तरी मुस्लिम लीगला हे विरोधकांचे मंत्रिमंडळ बरखास्त करावयास यामुळे पुरेसे कारण मिळाले. पूर्व पाकिस्तानची असेंब्लीही यावेळी बरखास्त करण्यात आली व पूर्व पाकिस्तानचा कारभार मेजर जनरल इस्कंदर मिर्झा या नव्या गव्हर्नरांचे हाती देण्यात आला. पूर्व पाकिस्तानातील प्रजेचे सर्व हक्क बाजूला सारून तेथे मुस्लिम लीगचे तंत्राने चालणारी गव्हर्नरची राजवट सुरू झाली.

पण यामुळे विरोधकांचा विरोध मात्र थांबू शकला नाही. पूर्व पाकिस्तानात गव्हर्नरची राजवट सुरू झाली तरी पश्चिम पाकिस्तानातील विरोधी पक्षांचे पुढारी स्वस्थ बसले नाहीत. त्यांची निदर्शने व लीग–विरोध सारखा सुरूच होता. तेव्हा पश्चिम पाकिस्तानातही दडपशाहीची तरवार उपसण्यात आली. प्रथमतः कम्युनिस्ट पक्ष बेकायदेशीर ठरविण्यात आला. हा विरोधकांच्या अटकेचा जवळजवळ इशाराच होता. यावेळी निरनिराळ्या संघटनांच्या एकूण १३०० पुढाऱ्यांना एक महिन्याचे अवधीत अटक करण्यांत आली यातच सरहद्द प्रांतात झालेल्या एका पोट–निवडणुकीत मुस्लिम लीग पक्षाचे उमेदवाराचा पराभव होऊन अवामी लीगचे पीर साहेब मंकी शरीफ हे निवडून आले. ही परिस्थिती पाहून सरहद्द प्रांताचे पुढारी खान अब्दुल गफार खान यांनी सरहद्दप्रांत असेंब्लीच्या पुन्हा निवडणुका घ्याव्या अशी मागणी केली, व त्याला सर्व पख्तुनिस्तानात पाठिंबा मिळाला.

या परिस्थितीत लीगचे मंत्रिमंडळाला काही नवी योजना घटनासमितीपुढे मांडून पश्चिम पाकिस्तानातून प्रांताप्रांतातून सुरू झालेले विरोधकांचे प्रस्थ कमी करणे भाग होते. पंजाब, बलुचिस्तान, सिंधमधील जमीनदार वर्गालाही हे निरनिराळे प्रांत राहिल्यास विरोधकांच्या हाती सत्ता जाईल अशी भीति वाटत होती. तेव्हा सर्व पाकिस्तानचा एक प्रांत (वन् युनिट) ही कल्पना मध्यवर्ती मंत्रिमंडळाने घटनासमितीपुढे मांडली. पण त्यावर घटनासमितीत जोराची टीका होऊन सिंध प्रांताचे मुख्यमंत्री अब्दुलसतार पीरझादा हेही त्यांचे विरुद्ध गेले व सिंध प्रांतातील ७४ सभासदांनी आपल्या मुख्यमंत्र्याचे विरोधाला पाठिंबा दिल्यामुळे घटनासमितीत ही पश्चिम पाकिस्तानची एक प्रांत करण्याची कल्पना फेटाळली गेली. हा पराजय म्हणजे लीगचे मध्यवर्ती मंत्रिमंडळावर आलेला अविश्वासाचा ठरावच होता. यानंतर घटनासमितीत पश्चिम पाकिस्तानचे सिंध, पंजाब, सरहद्दप्रांत, बलुचिस्तान, भावलपूर, खरकपूर मिळून सहा विभाग करण्याचे ठरविण्यात आले व खरकपूर आणि भावलपूरचे स्वतंत्र प्रांत करताना त्यांचे

संस्थानिकांना तेथील गव्हर्नरचे अधिकार देण्याचे निश्चित करण्यात आले. हे निर्णय घेण्यात येणाऱ्या घटनासमितीत ७६ सभासद होते व त्यातील ४४ पूर्व पाकिस्तानातील असल्यामुळेच यांचेमधील विरोधकांना सिंध व सरहद्द प्रांतातील विरोधकांचा पाठिंबा मिळे व ते वाटेल तो ठराव पास करू शकत.

ही परिस्थिती निर्माण झाल्यामुळे लीगच्या मध्यवर्ती सरकारचे बूडच जवळ जवळ नाहीसे झाल्यासारखे झाले होते ही गोंधळाची परिस्थिती कोणाच्या का साहाय्याने होईना पण नाहीशी करणे आवश्यक होते. लीगच्या मंत्रिमंडळाने आजपर्यंत अमेरिकन मुत्सद्द्यांचा सल्ला पदोपदी घेतला होता. याबाबत अखेरचा निर्णय घेण्यासाठी आक्टोबरचे अखेरचे आठवड्यात पंतप्रधान महंमदअल्ली व सेनाप्रमुख जनरल आयुबखान हे अमेरिकेकडे जावयास निघाले. त्यांनी तेथे अमेरिकच्या नेत्यांशी कोणती चर्चा केली नकळे पण एक निश्चित निर्णय घेऊन ते कराची येथे विमानाने परतले.

विमानतळावरून ते परस्पर राजभवनात गेले तेथे गव्हर्नरांचे एक प्रमुख सल्लागार इस्कंदर मिर्झा व पाकिस्तानचे इंग्लंडमधील वकील एम्. ए. एच्. इस्पहानी हे हजर होते. या ठिकाणी बरेच वेळा चर्चा होऊन, गव्हर्नर जनरल गुलाममहमद यांनी सर्व पाकिस्तानात आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाल्याचे जाहीर केले. घटनासमिति बरखास्त करून लष्कराचे प्रमुख आयुबखान यांचे हाती देशाचा सर्व कारभार दिल्याचे ही घोषणा होती. पाकिस्तानात लष्करी राजवट वाटचाल करू लागली २४ ऑक्टोबर १९५४ रोजी करण्यात आलेले हे हुकूम म्हणजे पाकिस्तानच्या लोकशाही राजवटीचा अखेरचा अन्त होय. हे करण्यासाठी अमेरिकेची मदत पाकिस्तानने घेतली व आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी ११ कोटी डॉलर्स (६० कोटी रुपये) पाकिस्तानला यावेळी अमेरिकेने दिले व लष्करी मदत किती कोट डॉलर्सची केली हे सांगणे कठीण आहे. 'अशा बातम्या रशियन बातमीदारांनी छापल्या आहेत.' यानंतर आयुबखानची अबाधित सत्ता पाकिस्तानात सुरू झाली.

१० : लष्करी अमलाखालील पाकिस्तान

पाकिस्तानचे सरसेनानी आयुबखान यांनी ऑक्टोबर महिन्यांत सत्ता हाती घेतली त्याचे प्रत्यक्ष परिणाम कराची या शहरांत विशेष झाले. सर्व वृत्तपत्रांवर व बाहेर जाणाऱ्या बातम्यावर त्यांनी प्रथम सेन्सार निर्बंध घातले, व पाचांचे वरचे जमावास बंदी करण्यात आली. घटनासमिति जरी बरखास्त केली असली तरी तिची निवड पुन्हा लवकर करण्यांत येईल असे जाहीर करण्यांत आले. राज्यकारभार एकाचेच हाती आहे असे भासू नये म्हणून महमद अल्ली यांचे मंत्रिमंडळाची पुनर्घटना करण्यांत आली. यावेळी बरखास्त केलेल्या घटनासमितीचे अध्यक्ष तमझुद्दीन खान यांनी सिंध चीफ कोर्टापुढे अर्ज करुन घटनासमिति बरखास्त करण्याचे अधिकार गव्हर्नर जनरल यांना आहेत का? अशी विचारणा केली. असे अधिकार गव्हर्नर जनरलांना नाहीत असा कोर्टाने निर्णय देताच पाकिस्तान सरकारतर्फे सुप्रीम कोर्टात अर्ज केला व गव्हर्नर जनरलांचा तो हक्क या कोर्टाने मान्य केला.

महमद अल्लीच्या मंत्रिमंडळात संरक्षण मंत्र्याचे अधिकार आयुबखान यांचेकडे आले. तर इस्कंदर मिर्झा हे गृहमंत्री बनले. काही सिंधचे जमीनदारांना मंत्रिमंडळात जागा मिळाल्या तर बड्या

लष्करी अधिकाऱ्यांना लष्कराचे हाती सत्ता रहावी म्हणून मोक्यांचे जागी नेमण्यात आले. महमद अल्ली यांनी मुख्यमंत्री व परराष्ट्र मंत्र्याचे खाते आपले हाती ठेविले असले तरी सर्व सत्ता जवळजवळ आयुबखान व त्यांचे सहकारी यांचे हाती होती. यावेळी विरोधकांना काही जागा मंत्रिमंडळात येऊन आपले हाती ठेवण्याचे प्रयत्न मंत्रिमंडळाने केले. सरहद्द प्रांतातील विरोध नाहीसा व्हावा म्हणून खान अब्दुल गफार खान यांचे बंधु डॉ. खानसाहेब यांना मंत्रिमंडळात घेण्यात आले. यानंतर सर्व पश्चिम पाकिस्तानचे एकत्रीकरण करण्याची जुनी कल्पना ज्यांना मानवेल असे पुढारी ठिकठिकाणी अधिकारावर आणण्यात आले व २२ नोव्हेंबर १९५४ रोजी पंतप्रधान महमद अल्ली यांनी राज्यकारभाराचे सोयीसाठी पश्चिम पाकिस्तानचा एक प्रांत केल्याची घोषणा केली. व १७ डिसेंबर १९५४ रोजी पश्चिम पाकिस्तानचे राज्यव्यवस्थेसाठी स्वतंत्र कौन्सिल प्रस्थापित करण्यात आले या एकत्रित झालेल्या कौन्सिलमध्ये पूर्वीच्या प्रांताचे गव्हर्नर व मुख्यमंत्री होते.यांनी पश्चिम पाकिस्तानची राज्यकारभाराची घटना तयार करून १७ मार्च १९५५ पासून नव्या प्रांताची राजवट सुरू केली व या प्रांताचे गव्हर्नर मुस्ताफ अहमद गुरमणी व प्रांताचे मुख्यमंत्री डॉ. खानसाहेब झाल्याचे गव्हर्नर जनरल यानी जाहीर केले.

या सर्व घटना एवढ्या तातडीने उरकण्यात आल्या की कोणालाही या गोष्टींना विरोध करावयास अवसर मिळाला नाही. पहिला विरोध विरोधी पक्षियाना पश्चिम पाकिस्तानात पंजाबी जमीनदारांचे हाती सत्ता गेली असा ओरडा करून केला. पण महमदअल्ली यांचे सल्लागार आयुबखान यांनी कोणालाच दाद दिली नाही. पूर्वीच्या कारभाराला जनता एवढी कंटाळली होती की आयुबखानांचा हा हुकुमशाही खाक्या यावेळी तरी सर्वांना एक सुधारणा म्हणून मान्य होऊ लागला. पंजाबचे एक पुढारी फिरोजखान १९५८ साली केलेल्या एका भाषणात म्हणाले, 'ज्यावेळी प्रांतीयतेचे बळ वाढू लागते त्यावेळी हुकुमशाही जन्मास येणारच व आजच्या पाकिस्तानला हुकुमशाही कोणत्याही दृष्टीने अयोग्य आहे असे मला वाटत नाही.'

सरहद्द प्रांतातील एक मुस्लिम लीगचे माजी मंत्री १९५५ चे मे महिन्यात केलेल्या भाषणात म्हणतात, ' आमच्या पाकिस्तानच्या सैन्यावर आमचा पूर्णपणे विश्वास आहे व त्याने आमच्या राज्यकारभाराचा ताबा घेतला तर मला काडीइतके वाईट वाटणार नाही. '

यावेळी पूर्व पाकिस्तानचा कारभार सतत गव्हर्नरांचे हाती ठेवून भागण्यासारखे नव्हते. तेथे निवडणुका घेण्यास मध्यवर्ती मंत्रिमंडळ तयार नव्हते. तेथे पुन्हा फझलुल हक्क याचे हाती सत्ता देण्यास मध्यवर्ती मंत्रिमंडळ तयार नव्हते तेव्हा मध्यवर्ती मंत्रिमंडळातील ए. एच्. सरकार या मंत्र्यांना मध्यवर्ती मंत्रिमंडळाचा राजीनामा देऊन पूर्व पाकिस्तानात मंत्रिमंडळ बनविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. यावेळी मंत्री निवडण्याचे प्रश्नावरून पूर्व पाकिस्तानातील अवामी लीग व कृषक श्रमिक ' पक्षात ' फूट पडून अवामी लीगविरोधी पक्ष बनला. व पूर्वीच्या संयुक्त आघाडीनी मुस्लिम लीग पक्षाशी सहकार्य करून कसेबसे मंत्रिमंडळ बनविण्यात आले गव्हर्नर जनरल यांचे घोषणेनुसार नवी घटनासमिति बनविण्याचा चंग बांधला.

संयुक्त पश्चिम पाकिस्तानचे ३०६ सभासदात सिंध बलुचिस्तान, व पंजाबचे पूर्वीचेच सभासद होते. व त्यांनी प्रथम मध्यवर्ती मंत्रिमंडळानी घडवून आणलेली संयुक्त पश्चिम पाकिस्तानचे योजनेवर चर्चा आरंभली. पण यातून काही निष्पन्न होऊ द्यावयाचे नाही असा चंग मध्यवर्ती मंत्रिमंडळाने बांधला होता. सरहद्द प्रांताचा समावेश आता पश्चिम पाकिस्तानात झाल्यामुळे अफगाणिस्तानने आपले पाकिस्तानशी असलेले मैत्रीचे संबंध तोडले व आपला वकील १८ आक्टोबर १९५५ रोजी कराचीहून परत बोलविला.

अमेरिकेची भरपूर मदत पाकिस्तानला येऊ लागली होती. काश्मीर प्रश्नात हिंदशी जमवून घेण्यास पाकिस्तान बिलकुल तयार नव्हता व २० ऑगस्ट १९५३ रोजी तर हा प्रश्न सुरक्षा समितीपुढे पाकिस्तानने नेला, व यूनोच्या नेतृत्वाखाली काश्मीरमधे सार्वमत घेऊन हा प्रश्न सोडवावा अशीही मागणी पाकिस्तानने केली. अमेरिकेच्या मदतीवर हे सर्व चाळे पाकिस्तान करीत होते.

पाकिस्तानच्या मध्यवर्ती मंत्रिमंडळातील सर्व पक्षीय पुढाऱ्यांचे बऱ्याच बाबतीत जमेनासे झाले. १९५६ साली झालेल्या घटना समितीच्या बैठकीत संयुक्त मतदारसंघाची मागणी डॉ. खानसाहेब यांनी केली. नोव्हेंबर १९५५ मध्ये डॉ. खानसाहेब यांनी रिपब्लिकन पक्षाचे सहकार्याने सर्व राजकीय पक्ष बरखास्त करून रेव्होल्युशनरी कौन्सिलची स्थापना व्हावी अशी मागणी केली. तर काही उजव्या गटातील पक्षांनी इस्कंदर मिर्झा यांना गादीवर आणून पुन्हा पाकिस्तानात राजेशाही स्थापन करण्याचा चंग बांधला. या पक्षात जमीनदारवर्ग, लष्करी अधिकारी यांचा भरणा विशेष होता. १९५९ पासून लोकशाही पाकिस्तानात चालणे शक्य नाही अशा अर्थाची चर्चा सुरू झाली, लोकशाहीचे येथे दिवाळे निघाले आहे व लष्कराचे हाती सत्ता देणे आवश्यक आहे अशाच तऱ्हेचे सूर सरकारी गटाचे पत्रातून निघू लागले. याच वेळी ९ मे १९५८ रोजी सरहद्द प्रांताचे एका वेळचे नेते व आताच्या पश्चिम पाकिस्तानचे एक पुढारी डॉ. खानसाहेब यांचा तर २४ जून १९५८ रोजी पूर्व पाकिस्तानच्या असेंब्लीत जोराचे वादळ होऊन झालेल्या मारामारीत असेंब्लीचे स्पीकर ठार झाले व काही सभासद जखमी झाले. असले प्रकार वाढू लागल्यामुळे पाकिस्तानच्या राज्यकारभाराविषयी सर्व जगात टीका सुरू झाली. मंत्री बदलणे, मुख्यमंत्री नवे आणणे वगैरे प्रकार पश्चिम पाकिस्तानात सुरू झाले. अध्यक्ष इस्कंदर मिर्झा यांनी तर सर्व पश्चिम पाकिस्तानची सत्ता जमीनदारवर्गाचे हाती रहावी म्हणून सरदार अब्दुल रब्निस्तार, मुझफरअल्ली कांझिलबक्ष यांचे हाती पश्चिम पाकचे मुख्यमंत्र्याची सूत्रे दिली. रिपब्लिकन पक्ष व मुस्लिम लीग हे दोनच मोठे पक्ष. या दोन्ही पक्षांना काबूत ठेवण्यासाठी निरनिराळे फतवे इस्कंदर मिर्झा काढू लागले व या दोन्ही पक्षाच्या स्वयंसेवक–संघटना त्यांनी बेकायदा ठरविल्या.

या परिस्थितीत सार्वत्रिक निवडणुका घेणे शक्य नसल्यामुळे त्या ४ सप्टेंबर १९५८ ऐवजी १५ फेब्रुवारी १९५९ पर्यंत पुढे ढकलण्यात आल्या.

पाकिस्तानच्या या अंतस्थ घडामोडी अमेरिकेसारखी राष्ट्रे मोठ्या काळजीपूर्वक पहात होती. विशेषतः आशियातील सत्ता हाती रहावी म्हणून सिअॅटो करारात पाकिस्तानला अमेरिकेने मुद्दाम ओढून आणले होते. यावेळी काहीतरी तातडीच्या योजना आखल्या-शिवाय पाकिस्तान हाती राहात नाही हे ओळखून ब्रिटन व अमेरि-केने अध्यक्ष इस्कंदर मिर्झा यांना काहीतरी उपाय योजण्याचा सल्ला गुप्तपणे दिला व त्यानुसार पाकिस्तानचे अध्यक्ष सर इस्कंदर मिर्झा यांनी आणीबाणीची परिस्थिति जाहीर केली व पाकिस्तानची सर्व सत्ता लष्कराचे हाती दिल्याचे जाहीर केले. ही जाहीर घोषणा करण्यापूर्वी अमेरिकेचे व सिअॅटो करारातील मित्र राष्ट्रांचे वकिलांना बोलावून काही झाले तरी सिअॅटो राष्ट्रांना दिलेली अभिवचने आपण पाळू असे अध्यक्ष इस्कंदर मिर्झा यांनी जाहीर केले व लष्करी राज-वटीचा पाच कलमी फतवा प्रसिद्ध केला या अन्वये (१) २३ मार्च १९५६ ची घटना रद्द करण्यात आली. (२) प्रांतिक व मध्यवर्ती सरकारे बरखास्त करण्यात आले. (३) नॅशनल असेंब्ली व प्रांतीक कायदेमंडळे बरखास्त केली. (४) सर्व राजकीय पक्षांना बंदी कर-ण्यात आली. (५) सर्व सत्ता पाकिस्तानचे कमांडर इन चीफ जनरल आयुबखान यांचे हाती देण्यात आली. ही घोषणा करण्यात आल्या-बरोबर मध्यवर्ती मंत्रिमंडळाचे सर्व मंत्री त्यांचे घरातच स्थानबद्ध करण्यात आले. ही लष्करी क्रांति फारसा विरोध न होता यशस्वी झाली याचे कारण चालू कारभाराला जनता पूर्णपणे कंटाळली होती, तिला कोणाविषयीही फारसे प्रेम नव्हते. तिला शांतता व सुव्यवस्था हवी होती.

आयुबखानांनी सत्ता हाती घेताच पाकिस्तानचे तीन भाग पाडले. (अ) कराची विभाग (ब) पश्चिम पाकिस्तान (क) पूर्व पाकिस्तान व या तीन भागांवर प्रमुख म्हणून तीन प्रमुख लष्करी अधिकाऱ्यांची नेमणूक केली. सभा-मिरवणुकींना बंदी करण्यात आली व वृत्तपत्रातील मजकुराबाबत सेन्सारशिप सुरू झाली. लष्करी अधि-काऱ्यांना जे जनतेचे पुढारी वाटले त्या सर्वांना तुरुंगात टाकण्यात आले. त्यातून पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते सुटले नाहीत. मौलाना अब्दुल

हमीद भाषाणी, अब्दुल गफारखान, जी. एम्. सय्यद, फझ अहमदफैझ, मिर्झा इब्राहिम व फरझुद्दीन मन्सूर व इतर सर्व जुने व नवे मंत्री लष्करी बंदोबस्तात तुरुंगात पाठविण्यात आले. हे करीत असताना आयुबखानांनी पाकिस्तानचे अध्यक्ष इस्कंदर मिर्झा यांची काडीइतकीही पर्वा केली नाही. ते स्वयंसिद्ध पदाधिकारी लष्कराचे पाठिंब्याने बनले व देशाला दोन नेते नकोत म्हणून अध्यक्ष इस्कंदर मिर्झा यांनीं आपली सर्व सत्ता २७ ऑक्टोबर १९५८ रोजी आयुबखानांचे हाती दिली व ते सेवानिवृत्त झाले; २ नोव्हेंबर १९५८ रोजी ते व त्यांची कुटुंबीय मंडळी पाकिस्तान सोडून इंग्लंडला गेले.

यानंतर पंतप्रधानाची जागा आयुबखानांनी रद्द केली व आयुबखान स्वतःच पाकिस्तानचे अध्यक्ष व सर्व सूत्रनेते झाले. जनरल मूसा, व्हाईस ॲडमिरल चौधरी, व्हाईसमार्शल विमानदल अख्तरखान हे तीन प्रमुख त्यांचे मंत्री झाले व निरनिराळ्या लष्करी प्रमुखांकडे सर्व खाती वाटण्यात आली. व पाकिस्तानचे राज्य खऱ्या अर्थाने लष्कराचे ताब्यात गेले.'

सुरुवातीला आपणाला पाकिस्तानी जनतेला उर्जितावस्थेत आणावयाचे आहे याच भावनेने आयुबखानांनी आपले राज्यकारभाराला सुरवात केली. पूर्वीची लाचलुचपत व वशिलेबाजी गटबाजी प्रथम नाहीशी करण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला व त्यांचे लष्करी प्रमुख त्या धोरणानेच झटले. त्यांनी आपले सुरवातीचे भाषणांत हिंदशी सलोखा साधून शेजाऱ्यांनी प्रेमाचे संबंध प्रस्थापित केले पाहिजेत ही गोष्ट मान्य केली. त्याचे पहिले पर्यवसान म्हणजे गेली तेरा वर्षे सिंधचे पाण्याबाबत दोन्ही देशात सुरू असलेल्या तंट्याबाबत जागतिक बँकेचे सहकार्याने झालेला 'इंडस वॉटर ट्रीटी' हा करार होय. या करारावर १९ सप्टेंबर १९६० रोजी पं. नेहरू व आयुबखान यांनी कराची येथे येऊन सह्या केल्या व या दोन्ही देशातील सलोख्याला सुरवात झाली असे काही काळ जगाला वाटले.

या करारान्वये सिंधु नदीचे ८० टक्के पाणी पाकिस्तानला व

२० टक्के हिंदुस्थानला मिळाले. पाकिस्तानात येणाऱ्या सिंधु, झेलम व चिनाब या तिन्ही नद्या हिंदने सदासर्वकाळ पाकिस्तानात वाहू द्याव्या. हिंदने अडवू नयेत असेही करारात म्हटले आहे. सिंधु नदी तिबेटमध्ये उगम पावून अरबी समुद्राला मिळण्यापूर्वी २५०० मैल वहात येते. तशीच झेलम नदी काश्मीरमध्ये उगम पावून तिचे पाणी १३००० चौरस मैल प्रदेशाला पुरते. तर चिनाब ही काश्मीरमधून पाकिस्तानकडे जाणारी तिसरी नदी असून तिचे पाण्याचा फायदा १४५०० चौरस मैल प्रदेशाला मिळतो. अशा या तीन महत्त्वाच्या नद्यांबाबत खालील योजना आखण्यात आल्या.

(१) या नद्यांमुळे हिंदमधील १० लक्ष एकर जमिनीला कालव्याचे पाणी मिळते तसे ते मिळत राहील. तसेच या नद्यांचे २८ लक्ष हजार एकर जमिनीला लागेल एवढे पाणी साठवून ठेवण्याचा अधिकार हिंदला देण्यात आला. (२) याशिवाय आणखी ७ लक्ष एकर जमिनीला पाणी पुरवण्यासाठी या नद्यांवर कालवे काढण्याची मुभा ठेवण्यात आली.

याशिवाय सतलज दरीतील कालव्यामुळे पाकिस्तान जेवढे पाणी या नद्यातून घेते तेवढे त्याला पुढेही मिळावे, व ते १० वर्षे-पर्यंत याच प्रमाणांत मिळत रहावे. रावी, बियास, व सतलज या तीन नद्यांवर पाणीपुरवठ्यासाठी पाकिस्तानला जी नवी बांधणी करावी लागेल त्याला मदत म्हणून पुढील दहा वर्षात ८३ कोटी ३० लक्ष रुपये हिंदने पाकला द्यावे व त्यांचा हप्ता नियमितपणे दरवर्षी जागतिक बँकेत भरावा. ही रक्कम सिंधु नदीचे खोऱ्यातील योजनांचे विकासासाठी खर्ची पडावी. याशिवाय पाकिस्तानला या पाणी पुरवठ्याचे योजनेसाठी आस्ट्रेलिया, कॅनडा, जर्मनी, न्युझीलँड, ब्रिटन व अमेरिका, या देशानी मदत मिळावायची असून पाकिस्तानची ही विकासयोजना एकूण ३३३ कोटी ३० लक्षाची ठरविण्यांत आली.

या करारात हिंदला पाणीपुरवठा फार थोडा मिळाला, व 'पाकिस्तानचे प्रगतीसाठी द्यावयाची रक्कम फार मोठी होती' अशी टीका हिंदी मुत्सद्द्यांवर झाली. पण पाक व हिंदमध्ये होणारा पहिला

सलोख्याचा करार म्हणून याकडे हिंदने पाहिले व त्याला काहीशी झीज सोसून मान्यता दिली.

परंतु सलोख्याचे हे वातावरण फारच अल्पकाळ टिकले. यानंतर हिंदशी सलोखा वाढविण्याऐवजी द्वेषभाव वाढविण्यासारखे प्रकार सारखे वाढू लागले व याला कारण लष्करी अंमलाचा पाकिस्तान-वरील दबदबा फार काल टिकू शकला नाही. पूर्व व पाकिस्तानमधील आर्थिक विषमता पुन्हा वर येऊ लागली.

आपल्या लष्करी कायद्याचे अंमलावर टीका होते, ती कमी व्हावी व जगात आपणही लोकशाहीप्रधान राज्यकारभार करू शकतो हे दाखविण्यासाठी आयुबखानांनी आपली म्हणून जारी केलेली घटना व मूलभूत लोकशाहीचे तत्त्वावर (बेसिक डेमॉक्रसी) निवडणुका घेण्याची कल्पना अंमलात आणली ती कधीही पाकिस्तानी जनतेला मानवली नाही. व त्यानुसार निर्माण झालेली कायदेमंडळे व मंत्रि-मंडळे जनताभिमुख कारभार करू शकली नाही. लष्करी कायद्यात निर्माण झालेली हुकुमशाही त्यातही कायम होती. नॅशनल डेमोक्रॅटिक फ्रन्ट, अवामी पक्ष, अवामी लीग मुस्लिम लीगमधून बाहेर पडलेल्या मंडळींची कौन्सिलरफ्रॅक्शन् मुस्लिम लीग वगैरे विरोधक पक्ष एका-मागून एक निघत होते, पण त्यांचा प्रभाव कोठेही पडू शकला नाही, व आयुबखानांचा लष्करी कारभार जुन्याच धोरणाने नुसते लोकशाही वरती पांघरूण घालून सुरू होता.

पाकिस्तानच्या नॅशनल असेंब्लीत २ एप्रिल १९६४ रोजी एका विरोधी पक्षीय उमेदवारांनी वयात आलेल्या व्यक्तीला पाकिस्तानात मतदानाचा अधिकार मिळावा अशी मागणी केली, व जोपर्यंत ही मागणी मान्य होत नाही तोपर्यंत काश्मीरमध्ये सार्वमत घ्या, असे सांगण्याचा अधिकार आपणाला पोहचत नाही, असे सांगताच पाकि-स्तानचे परराष्ट्र मंत्री व आयुबखानांचे उजवे हात मि. झेड्. ए. भुट्टो म्हणाले, 'अशा तऱ्हेची भाषणे सभासदांनी करणे राष्ट्रीय हितसंबं-धाला घातक होण्यासारखे आहे.' यावरून राज्यकर्ते जनतेची पावलो-पावली कशी मुस्कटदाबी करीत होते याची कल्पना येण्यासारखी आहे.

आयुबखानाच्या नव्या घटनेत निर्माण झालेले ८० हजार मूलभूत लोकशाहीचे सभासद सर्व निवडणुकींची सूत्रे हलवीत असल्यामुळे मतदानाचा अधिकार वयात आलेल्यांना देण्याची मागणी पाकिस्तानी जनतेने आपली मूलभूत मागणी म्हणून पदोपदी पुढे केली, पण तिचेकडे १९६६ अखेरपर्यंत लक्ष देण्यात आले नव्हते. कारण यामळे आयुबखानांचे हातून सत्ता जाण्याचा संभव निर्माण झाला असता.

पूर्व पाकिस्तानने पाकिस्तानला फारच महत्त्वाचे व लोकशाहीला पोषक अशा मतांचे पुढारी दिले, पण ते आयुबखानांच्या राजवटीला उपयुक्त ठरू शकले नाहीत. पुढे पुढे तर परराष्ट्र मंत्री भूट्टो यांचे सल्ल्याने चीनशी मैत्री साधून, काश्मीरमध्ये गोंधळ उडवून देणे वगैरे प्रकार झाले. काश्मिरात जातीय भांडणे लावून मतभेद निर्माण करण्याच्या अनेक योजनांत हजरत बालप्रकरण हा एक महत्त्वाचा दुवा होता. हजरतबाल मशिदीत जतन करून ठेवलेल्या महंमदाचे केसांपैकी काही भाग १९६३ चे डिसेंबरमध्ये चोरीस गेला. काश्मीरमधील उफळीतून हे प्रकरण निर्माण झाले. परंतु त्याबाबत पाकिस्तानने केलेला ओरडा, शेख अब्दुल्ला यांचे विरोधाला दाखविण्यात घेणारा पाठिंबा या गोष्टी आयुबखानांच्या राजवटीत सारख्या येत त्या वाढत गेल्या व त्यांनी निर्माण केलेल्या परिस्थितीतून हिंदु-मुस्लिम द्वेषभाव वाढीस लागला ही गोष्ट स्पष्ट आहे. आयुबखानांचे हातून अल्पसंख्यांकांना काही संरक्षण मिळेल ही वाटणारी आशा थोड्याच दिवसात नामशेष झाली व त्याचे परिणाम सर्वच पाकिस्तानी राजवटीचे धोरण बदलण्यात झाले. त्याचे पर्यवसान काश्मीरवर पाकिस्तानने हल्ला चढविण्यात झाले. यावेळी पाकिस्तानने यूनोच्या आदेशांची बिलकुल पर्वा केली नाही. एकीकडे चीनची वाढती फूस, अमेरिकेकडून मिळालेली भरमसाट युद्धाची साधन–सामुग्री व काही हिंदविरोधी स्वार्थी राष्ट्रांचे दडपण यामुळे आयुबखानांचे परराष्ट्रीय धोरण जनताभिमुख होण्याऐवजी संधीसाधू बनले व त्याचा परिणाम पाकिस्तानची नाचक्की व नुकसान होण्यातच झाला.

● ● ●

११ : प्रत्यक्ष आक्रमणाला सुरवात

पाकिस्तान व हिंदची एकमेकांला लागलेली सरहद्द ३५१९ मैलाची असून गेल्या १८ वर्षांत त्यातील फक्त १६९५ मैल सरहद्दीची पाहणी दोन्ही देशांचे प्रतिनिधींनी केली, व आखणी पुरी केली, इतर जवळ जवळ निम्म्यापेक्षा अधिक सरहद्दीची आखणी राहण्याचे मुख्य कारण पाकिस्तानचा आडमुठेपणा हे आहे. या आखणी केलेल्या प्रदेशातही हिंदची १२३ खेडी पाकहद्दीत व पाकिस्तानची ७४ खेडी हिंदहद्दीत आहेत. या सर्व खेड्यांना हिंद व पाक राजवटीकडून एकमेकांना काही वाहतुकीच्या सवलती देण्यात आलेल्या आहेत व त्यावरून अनेक भांडणतंटे सारखे होत आहेत. या ३५१९ मैलांचे सरहद्दीवर कोठेही असा प्रदेश सापडणार नाही, की जेथे या आपापसातील कटकटी सुरू नाहीत.

सरहद्दीवरील या कटकटी कायमच्या थांबाव्या म्हणून पंतप्रधान पंडित नेहरू यांनी २२ डिसेंबर १९४९ रोजी प्रथम पाकिस्तान व हिंदमध्ये युद्धबंदीकरार *(No war pact)* व्हावा म्हणून मागणी केली. परंतु तो करार करावयास पाकिस्तानने नकार दिला. १९५६ साली अशा स्वरूपाचा करार दोन्ही देशात व्हावा अशी इच्छा पंडित नेहरूंनी पुन्हा प्रगट केली. ते म्हणाले, ' पाकिस्तान व

आमच्यामध्ये लढा जुंपावा असे मला कधीच वाटणार नाही. आमचे-मधील एकमेकातील मतभेदाचे प्रश्न आम्ही सामोपचाराने सोडविणे इष्ट आहे.' हीच सूचना १९६२ साली त्यांनी आयुबखानांना पुन्हा केली तरीही त्याचा काही उपयोग झाला नाही. २७ मे १९६४ रोजी पं. नेहरूंचे निधन झाल्यानंतर पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांनी १५ ऑगस्ट १९६४ रोजी, स्वातंत्र्यदिनाचे दिवशी केलेल्या भाषणात अशा स्वरूपाच्या कराराची पुन्हा आठवण दिली पण त्याचाही काही एक उपयोग होऊ शकला नाही. व पाकिस्तानशी मतभेद-सारखे वाढत राहिले.

हा सरहद्दीचा लढा मधून मधून सरहद्दीचे पलिकडे आक्रमण करून पाकिस्तानी पुढाऱ्यांनी सारखा जिवंत ठेविला होता. कच्छच्या रणांगणातील आक्रमणापूर्वी पाकिस्तानी पुढारी विशेषतः पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री भुट्टो यांनी कच्छच्या रणातील २४ रेखांशावरील प्रदेश वादग्रस्त असल्याचा दावा सारखा सुरू ठेवला व हीच खरी कच्छच्या आक्रमणाची नांदी होती. कच्छचे रण ९००० चौरस मैल प्रदेशात पसरले असून कच्छ प्रांताच्या भोवताली या उजाड वाळवंटानी वेढा दिलेला आहे. दोनशे वर्षांपूर्वी सिंधु नदीचे पात्र कच्छमधून जात असल्यामुळे लखपतचे प्रदेशात पीक काढल्याचा उल्लेख इतिहासात आहे. परंतु १८७० चे सुमारास सिंधचे राजे गुलाम अल्ली शहा यांनी सिंधु नदीचे पात्रावर भिंत बांधून तिचा प्रवाह सिंधकडे वळविला व कच्छला या प्रवाहाचा मिळणारा फायदा अजिबात थांबला. या सिंधचे राजेसाहेबांनी यावेळी कच्छचा प्रदेश जिकण्याचा प्रयत्न केला होता, पण त्याला अपयश आल्यामुळे त्यांनी सिंधूला बंधारा बांधून कच्छचा सूड घेतला असे म्हणतात. असा जुना इतिहास आहे.

मोराथा या खेड्याजवळ सिंधु नदीवर बांधलेला बंधारा अजूनही उभा आहे. हा ९००० चौरस मैलांचा प्रदेश ब्रिटिशांचे हाती राज्यसत्ता असताना पूर्णपणे गुजराथ प्रांतात मोडत असे. सिंध प्रांताने आपल्या सरहद्दी कच्छच्या रणात असल्याचे कधीच म्हटलेले नाही. १९०७ साली सिंध प्रांताच्या सरहद्दी ज्या दाखविण्यात आल्या आहेत

त्यातही या कच्छच्या रणाचा उल्लेख सिंध प्रांतात केलेला नाही. १८२८ चे ईस्ट इंडिया कंपनीचे गॅझेटमध्येही २३ ते २५ रेखांशा-पर्यंतचा भाग कच्छचे हद्दीत दाखविलेला आहे. १९१४ चे मुंबई-प्रांताच्या सीमारेषा दाखविणाऱ्या गॅझेटमध्ये तर कच्छच्या रणाचा सर्व भाग कच्छमध्येच दाखविलेला आहे. १९४७ साली पाकिस्तानच्या सीमारेषा ठरवितानाही ब्रिटिश मुत्सद्द्यांनी कच्छचे रण हे सर्वस्वी कच्छमध्ये म्हणजे हिंदीहद्दीत असल्याचा निर्देश केलेला आहे. एवढच काय, पण सिंध प्रांताचे गव्हर्नर व कच्छ दरबार यांचेमध्ये कच्छ व सिंधचे सरहद्दीच्या सीमारेषा एवढचा ठरून गेल्या होत्या की, काही भागात त्यानुसार सरहद्दीचे खांब रोवलेले दिसतात. कच्छचा लढा सुरू होण्यापूर्वी पाकिस्तानने सुरू केलेल्या प्रचारात तीन प्रमुख गोष्टी होत्या.

त्या म्हणजे १) कच्छचे सर्व रण १७६७ साली सिंधच्या राजेसाहेबांच्या संपूर्णपणे ताब्यात आले होते. २) १८७५ साली सिंधच्या गॅझेटमध्ये सिंध प्रांताची सीमा २४ व्या अक्षांशाजवळ धर्मशाळा या ठिकाणापर्यंत होती म्हणजे सर्वच कच्छचे रण सिंध प्रांताचे ताब्यात होते. ३) आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार अशा वाळवंट मय प्रदेशात प्रांताची सरहद्द नेहमी वाळवंटाचे मध्यावर धरण्याची प्रथा आहे. १९५६ साली दोन्ही देशांचे पंतप्रधानांचे भेटीचे वेळी हा सरहद्द प्रश्न चर्चिला गेला होता पण अनेकवेळा बोलवूनही पाकिस्तानी अधिकारी या सरहद्द प्रश्नाचे चर्चेसाठी आले नाहीत व तो प्रश्न तसाच लोंबकळत ठेवून १९६४ पासून वरील स्वरूपाच्या मागण्या करून पाकिस्तानने आपले आक्रमणाची पूर्वतयारी सुरू केली. १९६० साली हिंद-पाक अधिकाऱ्यांचे सरहद्दीसंबंधाचे चर्चेतही हा सरहद्दीचा प्रश्न सुटू शकला नाही. ज्या २४ वे रेक्षांशावर आपली सरहद्द असल्याची मागणी पाकिस्तान करीत आहे ती सरहद्द हिंद-हद्दीत २३ मैल येते. अशा अशक्यप्राय मागण्यामुळे हा कच्छ सर-हद्दीचा प्रश्न कधीच सुटू शकला नाही.

पाकिस्तानने या वादग्रस्त म्हटलेल्या प्रदेशात प्रत्यक्ष आक्रम-


भारत–पाकिस्तान सीमा :



काश्मीर ते मध्य राजस्थान

नकाशात अक्षांश व रेखांश
दाखवणे जरूर होते!

मध्य राजस्थान ते कच्छ



भारत–पाकिस्तान सीमा :

णाला सुरुवात १२ मे १९६४ रोजी केली. प्रथमतः तीन पाकिस्तानी शिपाई हिंदहद्दीत फिरताना आढळले पण ते चुकून हद्द ओलांडून आले असावे म्हणून सरहद्द पोलिसांनी त्यांना सोडून दिले. २७ जानेवारी १९६५ पासून पाकिस्तानी शिपायांच्या हालचाली या बाजूकडे १८ मैलाचे आघाडीवर सुरू झाल्याचे स्पष्ट दिसू लागले. हे लोक या हालचाली करतांना चांगले दीड मैल आत आले होते. या आक्रमणाचा विचार करण्यासाठी सरहद्दीवरील पाक अधिकाऱ्यांची एक सभा ५ फेब्रुवारी १९६५ रोजी हिंदहद्दीत भरली. परंतु या अधिकाऱ्यांनी या बेकायदेशीर आक्रमणाचा विचार करण्याची कोणतीहि तयारी दर्शविली नाही. ही बैठक होऊन पाच दिवस लोटतात न लोटतात तो हिंद हद्दीतील कांजरकोट हे महत्त्वाचे ठिकाण पाक सैनिकांनी व्यापल्याची बातमी आली. हे कांजरकोट व्यापणारे सैनिक ४० ते ४५ होते, पण त्यांचेजवळ मशीन गन्स, स्टेनगन्स व रायफल्स वगैरे आधुनिक सैनिकांची सर्व हत्यारे होती व ते पाकिस्तानी सैनिकांचे पूर्णपणे वेषात होते.

पाकिस्तान व हिंदच्या (गुजराथ राज्याचे) हद्दीपासून कांजरकोट हे ठिकाण हिंद हद्दीत १३०० यार्डावर आहे. पाकिस्तानने कच्छवरील आक्रमणासाठी टाकलेले हे पाऊल होते. १८ फेब्रुवारी १९६६ रोजी हिंदने या आक्रमणाबद्दल पाकिस्तानचे परराष्ट्र कचेरीला निषेधाचा खलिता पाठविला व सरहद्दीचे प्रश्नाबाबत दोन्ही देशातील तज्ञांची बैठक घेऊन प्रश्न निकालात काढण्याची मागणी केली. यावेळी प्रत्यक्ष आक्रमण झाले असतानाही हिंदने आपले शांततेचे उपाय सोडले नाहीत व हा सरहद्दीचा प्रश्न सोडविण्यासाठी जेवढे प्रयत्न करता येतील तेवढे करावे असे प्रयत्न सुरू होते. एप्रिलच्या सुमारास नुकत्याच सुरू झालेल्या उन्हाळ्यात फार मोठी निकराची लढाई देऊन कच्छचे रणात पाणी होण्यापूर्वी तेथील काही प्रदेश घशात घालण्याचा निश्चय पाकिस्तानने केलेला दिसत होता. हिंद सरहद्दीजवळ त्यांच्या सैन्याच्या महत्त्वाच्या हालचाली सुरू होताच

हिंदला बेसावध राहून चालण्यासारखे नव्हते. येथील गुजराथ पोलीस दलाचे मदतीस सैनिकांच्या तुकडचा सरहद्दीवर आणाव्या लागल्या.

पाकिस्तानी सैन्यापैकी एकावन्नवी फायनल ब्रिगेड सरहद्दीजवळ येऊन उभी राहताच आता लढचाला तोंड लागणार हे स्पष्ट दिसू लागले. पाकिस्तानचे सैनिक कांजरकोटचे दक्षिणेकडे सरदारपोस्ट नावाचे ठिकाणाजवळ पुढे सरकताच १० एप्रिल १९६५ रोजी हिंदी फौजांनी त्यांचेवर हल्ला चढवून सरदारपोस्ट जवळून त्याना पिटाळून लाविले. यावेळी पाकिस्तानी फौजांनी २५ पौंडी तोफांचा उपयोग केला पण हिंदी शिपायाचे हल्ल्यापुढे त्यांचे काही चालेना व सर्व–साधनसामुग्री टाकून त्यांना मागे पाऊल घ्यावे लागले. यावेळी बरीच लढाऊ साधनसामुग्री व काही महत्त्वाचे कागदपत्र सरदार पोस्ट घेणाऱ्या सैनिकांचे हाती पडले. या कागदपत्रावरून पाहता. कच्छचे रणात हल्ला चढविण्याची योजना पाकिस्तानने मार्च १९६५चे पहिले आठवडचात आखली होती.

सरदार पोस्ट जवळील हल्ल्यात माघार घ्यावी लागल्यामुळेच की काय पाकिस्तानी लष्करी अधिकाऱ्यांनी आपली बरीच मोठी फौज गुजराथ सरहद्दीजवळ आणून उभी केली. १० एप्रिल रोजी हिंदी सैन्याने सरदारपोस्ट ठाणे परत मिळविले व तेथे आपले प्रतिकाराचे खंबीर मोर्चे उभारले. पाकिस्तानने पुढील लढचासाठी क्वेट्टा येथील आपला आठवा सैन्यविभाग व दोन सशस्त्र सैन्यविभाग गुजराथ सीमेवर आणून उभे केले. सर्व लष्कराच्या रजा रद्द केल्या. व विमानदलाचे सर्व सैनिकांना कामावर हजर राहण्याचे हुकूम सुटले. पश्चिम पाकिस्तानने रझाकार व मुजाहिद दलाचे लष्करी शिक्षणाची शिबिरे उघडण्यात येऊ लागली व टाटाईजवळ आली. या भावनेने पाकिस्तान रेडिओवरील प्रचार सुरू झाला. १५ एप्रिल १९६५ रोजी पाक परराष्ट्रमंत्री भुट्टो यांनी केलेल्या भाषणात, '२४ अक्षांशावरील कच्छचे वाळवंट हा आम्ही वादग्रस्त प्रदेश मानतो, त्यांच्या सरहद्दीचा वाद निर्माण झाला आहे असे नाही तर हा प्रदेश हिंदने बेकायदेशीररित्या बळकावल्यामुळे आजचा लढा निर्माण झाला

आहे. संयुक्त राष्ट्र परिषदेच्या जाहीरनाम्याला व १९६० चे पाक-हिंदमधील सरहद्द कराराला हे सोडून होत आहे असा आमचा दावा आहे.' भुट्टोचे हे भाषण म्हणजे पाकिस्तान कच्छच्या रणांगणात करीत असलेल्या आक्रमणाची कारणमीमांसा होती. पाकिस्तानचे कांजरकोट विभागातील अस्तित्व हे आक्रमणच नाही. तेथे सात-आठ वर्षे आम्ही आहोत, हा आमचाच प्रदेश आहे, असा हास्यास्पद दावा यावेळी पाकिस्तानने मांडला याला उत्तर म्हणून पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी पार्लमेंटमधील भाषणात मोठे सडेतोड उत्तर दिले.

'कांजरकोटबाबत आमचे म्हणणे स्पष्ट आहे. तो आमचा प्रदेश आहे. कोणाशीही चर्चा करून आम्ही हे सिद्ध करून द्यावयास तयार आहोत आणि पाकिस्तानला तेथून आपली सेना मागे घेतलीच पाहिजे.' या प्रश्नावरील चर्चेसाठी १६ एप्रिल सकाळी ८ वाजल्या-पासून कच्छमधील युद्धतहकुबी जारी करण्याची योजना यावेळी आखली गेली, पण पाकिस्तानने या योजनेला मान्यता दिली नाही. ९ एप्रिलपासून १६ एप्रिलपर्यंतचे सात दिवसाच्या काळात ही गोष्ट स्पष्ट झाली की, पाकिस्तानला आक्रमण करून कच्छच्या रणावर प्रभुत्व मिळवावयाचे होते. त्यांच्या हल्ल्याचा जोर सारखा वाढू लागला व वाळवंटाच्या लढयात पाकिस्तानने बिरबेटच्या लढया-साठी आपले टँकदलही रणांगणावर आणले. पण याला हिंदी लष्कराने प्रतिहल्ल्याने चांगलेच तोंड दिले. पाकिस्तानची एक ब्रिगेड २६ एप्रिल १९६५ रोजी बिरबेटवर चालून आली. विगुर ठाण्याहून निघालेली पाक सेना या ठिकाणी हिंद हद्दीत जवळ जवळ आठ मैल आली. परंतु हिंदी हल्ल्यापुढे तिला माघार घ्यावी लागली. मोडतोड झालेली सहा टँकस् तेथेच सोडून पाक सेना मागे हटल्या.

हा प्रकार आंतरराष्ट्रीय दृष्टया एवढा गाजला की ब्रिटनचे पंतप्रधान मि. विल्सन यांनी यावेळी दोन्ही राष्ट्रांना लढा थांबविण्याची विनंती केली. याउलट थांबविण्याचे मागणीत दोन्ही राष्ट्रांनी आपल्या फौजा मागे आपापले हद्दीत घेऊन त्याजागी पोलीस ठाणी ठेवावी व

युद्धतहकुबीचे काळात १९६० रोजी ठरलेली सरहद्द प्रमाणभूत धरावी अशीही सूचना ब्रिटिश पंतप्रधानांनी केली. हिंदने यावेळी ही गोष्ट स्पष्ट केली होती की कच्छचा प्रश्न हा सर्वस्वी सरहद्दीचा आहे. पाकिस्तान हक्क सांगत असलेल्या प्रदेशाचा दावा आम्हाला मान्य नाही. यावेळी आपल्या प्रदेशांचे संरक्षणासाठी जेवढ्या गोष्टी करणे आवश्यक आहे तेवढ्याच गोष्टी आमचे सैनिक करतील, व आम्हाला पाकिस्तानशी नाहक लढा द्यावयाचा नाही. या घोषणेला उत्तर म्हणून लाहोर येथे केलेल्या भाषणात पाक अध्यक्ष आयुबखान म्हणाले, 'आज पाकिस्तानी फौजा जय्यत तयारीनिशी उभ्या आहेत. हिंदने हल्ला चढविला तर आम्ही जोराने 'प्रतिहल्ले करू व लढ्याचा निकाल लागेपर्यंत लढू.' अशा गर्जना जरी पाकने केल्या तरी यावेळी सर्वसाधारण आंतरराष्ट्रीय विचारांची दिशा अशी होती की लढा प्रथम थांबवावा. त्यासाठी कोणत्या अटी घालाव्या याबाबत इंग्लंडचे पंतप्रधानांनी चर्चा सुरू करताच पाकिस्तानने २४ वे अक्षांशारेषेपर्यंत पाक शिपायांना गस्त घालण्याची परवानगी असावी कारण कच्छ रणातील हा प्रदेश वादग्रस्त प्रश्न मानला पाहिजे. तरी हिंदने पाकिस्तानने केलेले कच्छ हद्दीतील आक्रमण मागे घ्यावे.

अशा दोन परस्परविरोधी अटीत युद्धतहकुबीचा प्रश्न घोटाळत असताना पाक सेनांनी मोठ्या लढाईची तयारी सरहद्दी मागे करीत होते. याचा पडताळा ताबडतोब आला. या कच्छच्या लढ्यात १९ मे १९६५ रोजी मेंढारजवळ बराच मोठा हल्ला पाक फौजांनी चढविला, त्याला तोंड देऊन हिंदी फौजांनी तो मागे परतविला, व ४० पाकिस्तानी शिपाई कामास आले. २५ मे रोजी आपल्या चिलखती गाड्यांसह बिरबेटसारख्या छोट्या ठाण्यांवर चालून आल्या. पण याही लढ्यात हिंदी फौजा मागे पाऊल न घेता पाकिस्तानी हल्ल्याला तोंड देऊन त्यानी त्यांचे ६० शिपाई मारले. १५ जूनचे पाकिस्तानी लढ्यात तर एक मेजरच्या दर्जाचा पाक अधिकारी हिंदी फौजांचे हाती लागला. वाळवंटात भरपूर वाहतुकीचे

रस्ते नसतानाही हिंदी फौजांना मिळणाऱ्या तुटपुंज्या मदतीवर ते मोठ्या शौर्याने लढून पाक फौजाना हात दाखवीत होते.

याच वेळी काही पाकिस्तानी फौजा काश्मीर सरहद्दीवर हालचाली करू लागल्या. त्यांनी युद्धतहकुबी–रेषा ओलांडून लडाखचा रस्ता तोडण्यासाठी कारागिलजवळ हिंदी फौजांचे ताब्यांत असलेली ठाणी त्यांनी हल्ला चढवून घेतली. ५ जूनचे सुमारास ९००० फूट उंचीवर पाकिस्तानने केलेली ही हालचाल चीनचे लडाखमधील हल्ल्याला पोषक होण्यासाठी आहे किंवा काय अशी शंका घेतली जाऊ लागली. यावेळी काश्मीरमधील यूनोचे निरीक्षक मध्ये पडले व कारगिलचा प्रश्न यूनो चिटणीसांपर्यंत गेला. चीनविरुद्ध लढ्यासाठी आवश्यक असलेला लेहमार्ग पाकिस्तानचे हल्ल्यामुळे धोक्यांत येणार ही गोष्ट यावेळी स्पष्ट झाली, व हा प्रश्न सोडविण्यासाठी अमेरिका मध्ये पडली. ब्रिटन व अमेरिका या दोन्ही राष्ट्रांच्या दडपणामुळे पाकिस्तान व हिंदमधील कच्छ आघाडीवरील लढा थांबविण्यासाठी काही योजना आखल्या गेल्या व त्या पाकिस्तानला मान्य कराव्या लागल्या. ३० जून १९६५ रोजी सकाळी ६ वाजून ३० मिनिटांनी कच्छ आघाडीवरील लढा थांबविण्यांत आला. यावेळी दोन्ही राष्ट्रांनी मंत्र्यांचे बैठकीत सरहद्दीचा प्रश्न सोडविण्यासाठी चर्चा करावी व ते शक्य न झाल्यास तिघांचे लवादमंडळाचे हाती तो द्यावा अशी तरतूद यावेळी करण्यांत आली. यावेळी पाकिस्तानने आपल्या फौजा आंतरराष्ट्रीय सीमारेषेच्या मागे घ्याव्या ही हिंदची मागणी मान्य करण्यात आली. परंतु, दिंग, सुरई, व कांजरकोट भागात मात्र पोलीस गस्त सुरू ठेवण्याचा अधिकार तेवढा या करारांत पाकिस्तानला देण्यात आला. हा गस्तीचा प्रदेश साधारणपणे २० मैलाचा असून ही गस्त आंतरराष्ट्रीय सरहद्दीवरच सुरू ठेवावी असे ठरविण्यात आले. यामुळे कच्छच्या रणांत सरदार, विगाकोट, व कांजरकोट भागातील पाकिस्तानी फौजा मागे घेतल्या गेल्या व छाडबेट व करमशाही येथे आपली पोलीसठाणी ठेवण्याचा हिंदचा हक्क कायम राहिला. सैन्य मागे घेण्याची क्रिया पाकिस्तानने

७ दिवसात पुरी करावयाची होती. हिंदने मात्र आपले पोलीस ठाण्यावर पूर्वी जेवढे शिपाई टेविले होते, तेवढेच ठेवावयाची अट मान्य केली.

हा सरहद्दीचा प्रश्न सोडविण्यासाठी मंत्र्यांच्या बैठकीत प्रश्न न सुटू शकल्यास प्रत्येक राष्ट्राचा एक याप्रमाणे प्रतिनिधी नंतर नेमावयाचे लवादमंडळावर राहील व तिसरी व्यक्ती दोघांनी इतर राष्ट्रातून निवड करून नेमावयाची असे ठरविण्यात आले. या निवडीबाबत एकमत न झाल्यास यूनोचे सेक्रेटरी जनरलने या तिसऱ्या व्यक्तीची निवड करावी व या लवादमंडळाचा निर्णय दोन्ही राष्ट्रांनी मान्य केला पाहिजे. अशा तऱ्हेने कच्छचे सीमेवर पाकिस्तानने निर्माण केलेला हा लढा त्या वेळेपुरता तरी थांबू शकला पण गेल्या सहा वर्षांत यानंतर कच्छच्या सरहद्दी ठरविण्यासंबंधी कोणताच महत्त्वाचा निर्णय घेतला गेला नाही. व पाकिस्तानने अनेक अडचणी निर्माण करून हा प्रश्न तसाच भिजत ठेवला आहे.

● ● ●

१२ : संपणारे वैर

आयुबखानांची हिंदशी सलोखा साधण्याची वृत्ति सिंधु नदीचे पाण्याचे करारानंतर फार काळ टिकाव धरू शकली नाही. मूलगामी लोकशाहीचा जो प्रयोग आयुबखानांनी सुरू केला आहे तो त्यांना एवढा फायदेशीर होऊ लागला, की सर्वच सत्ता हाती असलेल्या नेत्याची निवड या प्रयोगामुळे त्यांच्या मनाप्रमाणे त्यांना करून घेणे शक्य झाले. हे मूलगामी लोकशाहीचे ८० हजार सभासद अध्यक्षाची निवड करीत. ही पद्धत सोडावयास आयुबखान तयार नाहीत व पूर्व पाकिस्तानातील पुढाऱ्यांनी अनेक वेळा वयात आलेल्या मतदारसंघाचे मतदानावर कायदेमंडळे व अध्यक्षांची निवड करावी ही मागणी केली असतानाही ती अमान्य केली जाते. १९६५ चे मार्च महिन्यात आयुबखान अध्यक्षपदासाठी ज्यावेळी पुन्हा निवडणुकीस उभे राहिले तेव्हा विरोधी पक्षांनी एकजुट करून पाकिस्तानचे आद्य प्रवर्तक जीना यांच्या भगिनी फातिमा जीना यांना त्यांचेविरुद्ध उभे केले, व सर्व देशभर निवडणुकीची मोठी वावटळ उभी केली. पण आयुबखानांची मूलभूत लोकशाहीचे नावावर उभी केलेली सत्ता एवढी भरभक्कम होती की, फातिमा जीना यांचे काही चालू शकले नाही. यावेळी आयुबखानांना ४०९१३ व फातिमा जीना यांना २१०४४

मते पडली. व आयुबखान निवडून आले, व त्यांना खाली ओढण्याचा विरोधकांचा एक जबरदस्त प्रयोग अयशस्वी झाला.

या वियजानंतर आयुबखानांचे धोरण हिंदविषयी एवढे कणखर बनत चालले की हिंदद्वेष हाच एक त्यांचे राजवटीचा मुख्य आधार बनला व तो अखेरपर्यंत कायम आहे. या पाकिस्तानचे धोरणाची कल्पना काही अभ्यासू परकियांना आता पूर्णपणे आलेली आहे. प्रोफेसर कॅलार्ड हे याविषयी लिहितात : 'ज्याला प्रातिनिधिक राज्यसत्ता म्हणता येईल अशी राज्यसत्ता आयुबखानांचे मूलगामी लोकशाहीने प्रस्थापित केलेली नाही. यामुळे पूर्व बंगालमधील हिंदी नागरिक यापुढे संख्येने कमी होत जातील, ते पाकिस्तानात श्रीमंत होऊ शकणार नाहीत, अगर त्यांच्या बुद्धिमत्तेचा नीट उपयोगही होणार नाही, या इस्लामी राज्यात जे या धर्माशी सहमत होणार नाहीत ते कमी दर्जाचे समजले जातील व या राज्याचे कायद्याने त्यांचे संरक्षण होऊ शकणार नाही.' आयुबखानांनी १ मार्च १९६२ रोजी जी घटना पाकिस्तानात अंमलात आणली त्यात पाकिस्तानचा अध्यक्ष मुसलमानच असला पाहिजे असे कलम आहे. तसेच पाकिस्तानातील कोणताही कायदा इस्लामी तत्त्वाला विरोधक होऊ नये अशी स्पष्ट तरतूद आहे. यामुळे इस्लामी–हिंद संबंधांचे संरक्षण करणारे एक मुसलमान राष्ट्र म्हणून पाकिस्तानची गणना होऊ लागली. याचा परिणाम असा झाला की, पूर्व पाकिस्तानातील मुसलमानी जनता अल्पसंख्य हिंदुजमातीवर जवळ जवळ तुटून पडली. तिची द्वेषभावना पश्चिम पाकिस्तानातील पत्रांनी एवढी चेतवून दिली की, १९६३ चे डिसेंबरात हिंदी स्त्री–पुरुष, मुलांवर अनन्वित अत्याचार खुलना, नारायणगंज व डाक्का या शहरातून झाले व हजारो हिंदी नागरिक मारले गेले.

फाळणीनंतर पश्चिमेकडे पाकिस्तानी मुलखातून बाहेर पडणाऱ्या हिंदु नागरिकांची जी स्थिती झाली तीच स्थिती पूर्व बंगालमधील या हिंदी नागरिकांची झाली. पाकिस्तानमधील अमेरिकन पीस कोअरसारख्या त्रयस्थ संस्थांना पाकिस्तानातील कार्यकर्त्यांना स्वदेशी

पाठविलेल्या अहवालात नुसत्या डाक्का शहरात यावेळी स्त्रिया व मुले हजारापर्यंत मारली गेली असावी असा अंदाज दिला आहे. तर पाकिस्तान ऑबझर्व्हर या पत्राने ठार झालेल्यांची संख्या सहा हजार व जखमींची संख्या तीन हजारावर होती असे म्हटले आहे. माल-मत्तेच्या नुकसानींची संख्या २ कोटी ५० लक्षावर होती. यावेळी पूर्व बंगालमधील काही मुसलमान कार्यकर्त्यांनी व कॉलेज तरुणांनी या हिंदी द्वेषभावनेचा पत्रके काढून निषेध केला होता. पूर्व पाकिस्तानातून परत आलेल्या मिशनरी व इतर परकियांनी वृत्तपत्रांना दिलेल्या मुलाखतीतील अल्पसंख्याकांना शिस्तवार पद्धतीने बाहेर घालविण्याची एक योजनाच पाकिस्तानात आखली गेली असल्याचे सांगितले आहे. तेथे नांगरट करणाऱ्या हिंदु शेतकऱ्यांना तुम्ही शेत पिकेपर्यंत शेतात राहणार आहात का असा सरळ प्रश्न मुसलमान शेजारी विचारतात असे ते सांगत आहेत, हे निराश्रित निर्वासित सारखे आसाम, पश्चिम बंगाल व त्रिपुरा भागात सामानसुमान घेऊन येतच असतात, त्याशिवाय चोरून हिंदहद्दीत घुसणाऱ्या मुसलमानांची संख्या एकटया आसामात या वर्षाचे अखेरीपर्यंत साडेसात लाखावर गेली असावी असा अंदाज आहे.

या हालचाली नुसत्या आसाम व पश्चिम बंगाल प्रांतापुरत्या मर्यादीत नाहीत तर राजस्थानसारख्या पूर्वेकडील प्रदेशातहि बेकायदा येणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांची संख्या सारखी वाढू लागल्या आहे. ६४० मैलाची राजस्थानी सरहद्द पाकिस्तानी सरहद्दीला भिडलेली आहे, व या सरहद्दीवरील खेडयाखेडयातून मुसलमान नागरिकांची संख्या सारखी वाटत असल्याची बातमी आहे. येवढयावरच हे प्रकथांबलेले नाही तर बेकायदा घुसणाऱ्या निर्वासितातून कित्येक पाकिस्तानी सशस्त्र हिंद हद्दीत येऊन आपपल्या शस्त्रास्त्राचे साठे आपले हस्तकाकरवी हिंद हद्दीत करीत आहेत. त्याचा एक शस्त्रास्त्रांचा सांठा नुकताच लखनौजवळ पकडला गेल्याची बातमी आहे. अशी गंभीर परिस्थिती पाकिस्तानी शेजारामुळे निर्माण झाली असून या

पा...७

शेजाऱ्यांशी हिंदने कितीही जरी सलोख्याचे प्रयत्न केले तरी कुत्र्याचे शेपटीप्रमाणे त्यांचे शेपूट दरघडीला येवढे वाकडे होऊ लागले आहे की १९६६ अखेरीपर्यंत तरी या दोन्ही देशातील सलोख्याची आशा फारशी राहिलेली नाही. यापुढे हिंदने कितीही धर्मातीत बाणा पुढे चालविला तरी पाकिस्तान त्याला मान देण्याची चिन्हे अजून तरी दिसत नाहीत.

पाकिस्तानचे नेते व अध्यक्ष आयुबखान यांनी १९६६ साली जी भाषणे केली आहेत त्यावरून ही गोष्ट स्पष्ट झाली आहे की, पाकिस्तानची उभारणी ही दोन राष्ट्राच्या मूळ तत्त्वज्ञानावर झालेली आहे. त्याचा पाया इस्लामी राष्ट्राच्या ध्येयवादावर उभारलेला आहे. ही दोन राष्ट्रे फक्त काही अटीवरच एकत्रित येऊन एक विचाराने वागणे शक्य आहे. त्या अटी म्हणजे काश्मीर प्रांत हिंदने पाकिस्तानला तोडून दिला पाहिजे. तेथील अल्पसंख्य हिंदूंना आपले प्रदेशात नेले पाहिजे. तीच योजना पूर्व बंगालसाठी हिंदने आखली पाहिजे व त्यासाठी तेथील अल्पसंख्य हिंदु हालविले गेले पाहिजेत. त्यासाठी वाटल्यास आपला काही प्रदेश वेगळा काढून त्यांच्या वसाहती कराव्या. याशिवाय जो प्रदेश पाकिस्तानचा म्हणून आम्ही मानतो तो आम्हाला देऊन आमची पाक राष्ट्राची स्वकल्पना खरी ठरावयास हिंदने मदत केली पाहिजे तरच या दोनच शेजारचे राष्ट्रात एकोपा नांदणे शक्य आहे.'

पाकिस्तानच्या या एकोप्याच्या कल्पना म्हणजे हिंदने आपले स्वहित बाजूला सारून पाकिस्तानला या राष्ट्राची मैत्री संपादण्यासाठी दाती तृण धरून शरण यावे अशीच मागणी करण्यासारखे आहे. आयुबखानांचे हे सुखस्वप्न हिंदला कधीच पुरे करता येण्यासारखे नाही.

• • •

१३ :

काश्मीरच्या लढ्याला सुरवात

कच्छच्या रणांगणावर ब्रिटिश व अमेरिकन दडपणामुळे मागे पाऊल घ्यावे लागले तरी पाकिस्तानने आपल्या काश्मीर-संबंधीच्या योजनात किंचितही फेरबदल केला नाही. ३० जून १९६५ रोजी कच्छच्या आघाडीवर गोळीबार थांबवून युद्धबंदी जारी करण्यात आली व हिंद हद्दीत जवळ जवळ २० चौरस मैलांच्या प्रदेशात आलेले कच्छच्या रणातील पाकिस्तानी सैन्य मागे घेण्यात आले ही क्रिया होऊन २० दिवस लोटतात न लोटतात तोच काश्मीरमध्ये पाकिस्तानी सैनिक प्रवेश करू लागल्याच्या बातम्या येऊ लागल्या. १३ ऑगस्ट १९६५ रोजी पार्लमेंटमध्ये केलेल्या भाषणात याची कल्पना पंतप्रधान लालबहाद्दूर शास्त्री यांनी दिली. व हे लोक साधे नागरिकांपैकी नसून लष्करापैकी असावे अशी शंका व्यक्त केली. साधारणपणे ५ ऑगस्टपासून ही गोष्ट हिंदी संरक्षक शिपायांचे व लष्कराचे लक्षात आली, व १३ ऑगस्टपर्यंत सरहद्दीवर चोरून प्रवेश करणारे १२६ साधे शिपाई व ४३ अधिकारी पकडले गेल्याचे सांगण्यात आले. या गोष्टी जाहीर करताना पंतप्रधान लालबहाद्दूर शास्त्री यानीं हे स्पष्ट केले की 'पाकिस्तानचे मनातून आमचा काही प्रदेश बळकाविण्याचा विचार असेल तर त्यांनी एकदा त्याचा पुन्हा

विचार करावा.' २४ ऑगस्ट रोजी परिस्थिती बिकट होऊ लागल्याची जाणीव देण्यात आली. बरेच पाक नागरिक काश्मीर हद्दीत शिरले असून ते घरांना आगी लावणे, लुटालूट करणे वगैरे प्रकार करीत आहेत. काश्मीरबाबत पाकिस्तानच्या डोक्यात काही विचित्र व मोठ्या योजना असाव्या असेही यावेळी सांगण्यात आले काश्मीर. सरहद्दीवरील काश्मीरच्या डोंगराळ भागातून हे सैनिक अवघड वाटांनी रानातून हद्दीत शिरताच असे सांगण्यात आले. यानंतर सातच दिवसांनी म्हणजे १ सप्टेंबर १९६५ रोजी पाकिस्तानचे अध्यक्ष आयुबखान यानी केलेल्या भाषणात 'हिंदुस्थानने आमचेवर युद्ध लादण्याची वेळ आणली आहे.सर्वच आघाड्यांवर चाललेला गोळीबार आता गंभीर स्वरूप धांरण करू लागला आहे असेही ते म्हणाले,' याच वेळी काश्मीर युद्धतहकुबीरेषेवर कित्येक ठिकाणी पाक हिंदी सेनेत लढाई सुरू झाल्याची कबुली त्यानी दिली.' हे आयुबखानांचे भाषण म्हणजे पाकिस्तानचा युद्धाचा पुकारच होता व ते आव्हान हिंदी फौजानी तावडतोब स्वीकारले. काश्मीर आघाडीवर जुलै १९४९ मध्ये युद्धतहकुबीची घोषणा झाली व त्यानंतर या तहकुबीच्या वेळच्या सर्व अटी मोडून काश्मीरच्या लढ्याला पाकिस्तानने पुन्हा सुरवात केली असाच अर्थ सर्वत्र लावला गेला. यूनोच्या निरीक्षकांनी हा गोळीबार थांबविण्यासाठी आटोकाट प्रयत्न केला पण त्यांचे प्रयत्नाना कोणतेच यश आले नाही. युद्धतहकुबी अटीचा ठिकठिकाणी भंग झाल्याचे अहवाल हे निरीक्षक सारखे यूनोकडे दरदिवशी पाठवीत होते.

आयुबखानांच्या १ सप्टेंबरच्या युद्धघोषणेनंतर ३ सप्टेंबर १९६५ रोजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी पुन्हा भाषण करून या आक्रमणाची जबाबदारी सर्वस्वी पाक राज्यकर्त्यांवर आहे असे सांगितले. ते म्हणाले, 'आमचे सैनिकांनी पुढे घुसणाऱ्या पाकफौजांना आता तोंड द्यावयास सुरुवात केली असून त्यांची कित्येक टँक्स व चिलखती गाड्यांचा नाश केला आहे. त्यांना सरहद्दीवर आम्ही यशस्वी प्रतिकार करीत असून, थोपवून धरले आहेत. जम्मू

प्रांताचे सरहद्दीजवळ छांब विभागात तर मोठी पाकफौज आपल्या यंत्रसज्ज दलासह काश्मीर हद्दीत एक सप्टेंबर रोजी घुसली. या हल्ल्यांत पाकने आपली सर्व शक्ती पणास लाविली होती. पाकचे भुरटे सैनिक काश्मीरच्या निरनिराळ्या भागांत प्रवेश करून आता सर्वत्र विखुरले होते. त्यांनी पूल उडविणे, आगी लावणे वगैरे घातपाताचे प्रकार सारखे सुरू ठेविले होते. यात सर्वात आनंदाची गोष्ट म्हणजे शस्त्रसज्ज घातपाती पाक सैनिकांना हिंदव्याप्त काश्मीर जनतेचा पाठिंबा मिळू शकला नाही. त्यामुळे ते हिंदी सैनिकांचे हाती सापडू लागले. हिंदी शिपायांचे ते ठिकठिकाणी हाती सापडत व त्यामुळे सर्व काश्मीरमध्ये युद्धाचा भडका उडवून देण्याचा पाकिस्तानी कावा साध्य होऊ शकला नाही.

यामुळेच चिडून जाऊन की काय पाकिस्तानने आपला सर्व जोर छांब आघाडीवर केंद्रित केला. या ठिकाणी कोणत्याही संयुक्त राष्ट्र परिषदेच्या आज्ञेची पर्वा न करता सरहद्दीचे सर्व नियम मोडून पाकिस्तानी फौजा हिंद हद्दीत घुसल्या. दोन यंत्रसज्ज रेजिमेन्टस् या आघाडीवर पाकने एकदम आणली, त्यांचेबरोबर शंभरावर टँक्स होती व त्यातील निदान सत्तर तरी अमेरिकेकडून घेतलेली व पाकिस्तानची मागणी मान्य करून पाकिस्तानला अमेरिकेने दिलेली ७० पॅटन टँक्स् होती. या आघाडीवर कोणतीच गोष्ट कमी पडू द्यावयाची नाही अशा हिरीरीने आपली सेबर जेट विमाने पाकसेनानींनी आघाडीवर आणली व पुढे सरकणाऱ्या सेनेचा मार्ग मोकळा करण्यासाठी ती अमर्याद बाँबफेक करू लागली. नागरी जीवनाची व शहरांची त्यांनी किंचीतही पर्वा केली नाही.

या जोराच्या हल्ल्यामागे पाकिस्तानचा फार मोठा डाव होता, पण तो साध्य होऊ शकला नाही. हिंदी सैन्याला आखनूरपर्यंत मागे रेटीत न्यावे व तेथून जम्मूवर धडक मारून काश्मीरचा हिंदी फौजांचा मार्गच तोडून काश्मीर व जम्मू फौजात पाक फौजांची भिंत उभी करावी असा हा डाव होता व त्यासाठी पाकिस्तानी सेनानींनी आपले बळ पणास लाविले. जनरल चौधरींच्या कौशल्यपूर्ण हालचालीमुळे


हा हेतु साध्य होऊ शकला नाही. या जोराच्या हल्ल्याचे हिंदवर फार अघटित परिणाम होतील अशा सूचना संयुक्त राष्ट्र परिषदेच्या आघाडीवरील निरीक्षकांनीही हिंदला दिल्या. पण पाक सेनेला तोंड देणारे जनरल चौधरी पाकचा हा कावा ओळखून होते. टॅन्क दलाच्या युद्धात आंतरराष्ट्रीय कीर्ति मिळविलेला हा सेनानी पाकिस्तानची पॅटन टॅंक्स् ठिकठिकाणी कौशल्याने हल्ले चढवून निकामी करू लागला व यावेळी हिंदी सेनानीची व सैनिकांची मर्दुमकी व कौशल्य चांगलेच पणाला लागले.

शत्रूच्या प्रदेशात आक्रमण करावयाचे नाही हा शांतताप्रिय हिंदी पुढाऱ्यांचा दंडक यावेळी बाजूला ठेवावा लागेल, हे जनरल चौधरी जाणून होते. पहिले पाच दिवस त्यांनी छांब विभागात शिरणाऱ्या पाक सैन्यांना जोराने तोंड दिले व नुसत्या प्रतिकाराने आता भागण्यासारखे नाही हे ज्यावेळी त्यांना दिसू लागले त्यावेळी त्यांनी या चढाईला तोंड देण्यासाठी व शत्रूची शक्ती विभागण्यासाठी पंजाब हद्दीतून पाक हद्दीत घुसण्याची आज्ञा आपल्या सैनिकांना दिली.

६ सप्टेंबर रोजी जनरल चौधरींची पायदळ फौज लाहोरच्या दिशेने कूच करू लागली व तिने सरहद्दीवरील पाकिस्तानी प्रतिकार मोडून काढला. यावेळी जनरल चौधरी यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत हे स्पष्ट केले की, 'पाकिस्तानने हिंदव्याप्त काश्मीरचे छांब–जोरीयन विभागात जे हल्ले चढविले आहेत त्याचा प्रतिकार करण्यासाठी लाहोरच्या दिशेने दुसरी आघाडी उघडून आम्हाला पाक सैन्याची विभागणी करणे भाग आहे. लाहोर ताब्यात घेण्याचा आमचा बिलकुल हेतू नाही.' पण यामुळे आंतरराष्ट्रीय वातावरणात फारसा फरक पडू शकला नाही. जागतिक लष्करी तज्ञानी चौधरींच्या या चढाईचे महत्व जरी कळत होते, तरी पाकिस्तान रेडिओवरून चाललेल्या प्रचारात या हल्ल्याला हिंदी आक्रमक म्हणून संबोधण्यात आले व ब्रिटिश पत्रांनी तर पाकिस्तानची री ओढून या आक्रमणाबद्दल हिंदला दोष दिला व ब्रिटन–अमेरिकेने या परिस्थितीत पाकिस्तान व हिंदची शस्त्रास्त्राची मदत एकदम थांबविली. लाहोर विभा-

गात शिरलेल्या हिंदी फौजांना ७ सप्टेंबर रोजी लाहोर व सियालकोट भागात पाकिस्तानचा एक यंत्रसज्ज विभाग व दोन पायदळ विभाग पाकिस्तानी सेनानींनी पुढे आणला व त्याचेकरवी प्रतिकारार्थ निकराची लढाई दिली.

या निकराचे लढयात लाहोर–सियालकोटचे रणांगण रंगून निघाले. पाक सैनिकांपैकी जवळ जवळ ५००० सैनिक यावेळी मारले गेले असावे. याच आघाडीवर ४७५ पाकिस्तानी टँकस् बरबाद झाले व त्यातील २३६ अमेरिकन पॅटन होते. या लढयात पॅटन टँक हे पाकिस्तानचे आघाडीवरचे प्रमुख शस्त्र होते. या एका टँकचे वजन ४४ टन असे, त्याचेवर बसविलेली मोठी तोफ ९० मिलीमीटरची होती व ती २००० यार्डापर्यंत जोराचा मारा करू शकत असे.



पाकिस्तानच्या नीतीचे – संस्कृतीचे मानचिन्ह.
परवा झालेल्या पाक–भारत महायुद्धात पाकिस्तानने नापाम बॉम्बने हॉस्पिटल–रुग्णांवर केलेला निर्घृण हल्ला !

याशिवाय ब्रावनिंग जातीची मशीनगन्स व विमानविध्वंसक तोफाही डागण्याची सोय या टँकमध्ये होती. पूर्ण आधुनिक पद्धतीचे टँक्स् हिंदनेही मागितली होती, पण अमेरिकेने हिंदची ही मागणी अमान्य करून ती पाकिस्ताला दिली. त्यावेळी 'हिंदविरुद्ध ही शस्त्रास्त्रे वापरणार नाही' असे आश्वासन पाकने अमेरिकेला दिले होते. ते मोडून पाकिस्तानने हे टँकस् आघाडीवर आणले. ताशी ४० मैलांचे वेगाने धावण्याइतकी शक्ति त्यांचेमध्ये होती. या पॅटन टँकची हाल-चाल पाकिस्तानने आपले हद्दीतील उत्तम रस्त्यावरून प्रथम केली तर हिंदला आपली सर्व युद्धसामुग्री दूरवरून आणून हा लढा द्यावा लागत होता.


एक सप्टेंबर रोजी पहाटे ४ वाजता पाकिस्तानी फौजा काश्मीर हद्दीत घुसून चढाई करू लागल्या, 'ऑपरेशन ग्रॅन्डस्लाम' हा सांकेतिक शब्द पाकिस्तानी चढाईसाठी वापरला होता. या चढाईसाठी छांब आघाडीवर १४, १६, १७, १८ ऑगस्ट रोजी चार ठिकाणी हल्ले चढवून तेथील प्रतिकार कमकुवत केल्यानंतर हा पाकिस्तानी फौजेचा लोंढा अकनूर काबीज करण्याचे इराद्याने अकनूरचे दिशेने निघाला. हिंदने आपली सर्व सेना प्रतिकारार्थ येथे आणून उभी करू नये म्हणून गुजराथचे सीमेवरही ताहूरवेधाजवळ याच वेळी पाक फौजांचे हल्ले सुरू झाले. हे हल्ले तेथील हिंदी फौजांनी मागे परतविताच पुन्हा जोराचे हल्ले या बाजूकडे सुरू झाले. छांब विभागातील हल्ले तर एवढे गंभीर स्वरूपाचे होते की हिंदी फौजांना सुरुवातीला तरी पिछेहाट करणे भाग पडले व पाक वाहतुकीची हाडे खिळखिळी करण्यासाठी आपले विमानदल आघाडीवर आणावे लागले. हिंदी विमानदल रणांगणावर आणण्याचा हा हिंदचा पहिलाच प्रसंग होता. नेफा व लडाख आघाडीवर चीनविरुद्ध लढा देणारी हिंदी फौज— पायदळ होती. पण पाकिस्तानचा हा लढा फारच निराळ्या स्वरूपाचा होता. तेथे पाकसेनेतील टँक दलाला तोंड देण्यासाठी आधुनिक टँकविरोधी आयुधे वापरावी लागली. लाहोर आघाडीवर हिंदी

टँकदल रणांगणावर उतरवावे लागले व नंतर हवाई पथकातील जवानांना आव्हान करावे लागले.

छांब आघाडीवर शत्रूचे वाढत्या सामर्थ्याला तोंड देण्यासाठी १ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता हिंदी विमानदलाच्या व्हॅम्पायर (*Vampire*) विमानांच्या तुकड्या आघाडीवर आणण्यात आल्या. त्यानी पाऊण तासाचे अवधीत २८ वेळा पाक आघाडीवर उड्डाण करून आपल्या बाँबफेकीने शत्रूची १३ पॅटन टॅन्क्स बरबाद केली व जमिनीवरील फौजांनी पाच बरबाद केली, पहिल्याच दिवशी हिंदी विमानदलाने गाजविलेला हा पराक्रम हिंदच्या वैमानिक युद्धाच्या इतिहासात महत्त्वाचा होता, जमिनीवरील हिंदी फौजा यावेळी जरी पद्धतशीर माघार घेत होत्या तरी हिंदी विमानांनी हे हल्ले चढवून त्यांना दिलेले संरक्षण येवढे मोठे होते की, पाकिस्तानला अमेरिकेने मित्र म्हणून दिलेली सेबर जेट विमाने त्याला हिंदी विमानदलाला तोंड देण्यासाठी आघाडीवर आणावी लागली. त्यांना तोंड देणारी ग्नाट (*Gnat*) जातीची विमाने यावेळी हिंदी वैमानिकांनी एवढ्या कौशल्याने त्यांचेपुढे आणली की त्यांचे समोरासमोर झालेल्या आकाशातील लढ्यात दोन सुपर जेट विमानांना दुसरे दिवशी पाकिस्तानला मुकावे लागले.

पाकिस्तानची छांब व अकनूर विभागातील चढाई या हल्ल्यामुळे थोपविणे शक्य झाले. अकनूरचे रस्त्यावरील जोरियन शहराजवळील टेकड्यावर हिंदी सेनानींनी आपली मागे घेतलेली सेना प्रतिकाराचे दृष्टीने नवे मोर्चे उभारून सज्ज केली व हा प्रतिकाराचा मोर्चा एवढा प्रभावी ठरला की त्यामुळे पाकिस्तानचा हा ' ऑपरेशन ग्रॅनस्लाम 'चा लढा थोपविता आला व पाकचा हिंदी फौजा कोंडण्याचा सर्वच मनसुबा फसला.

पहिल्या विजयामुळे पाकिस्तानी प्रचारमोहीम एवढी गर्ज लागली की तिने खऱ्या–खोट्याचे ताळतंत्रच सोडले. दुसऱ्या महायुद्धाची व जर्मन प्रचाराची पुनरावृत्ती पाक रेडिओवरून दर दिवशी होऊ लागली. हा जोरियनचा प्रतिकार जर पाक फौज ठराविक दिव-



भारत–पाक सीमा : काश्मीर ते पश्चिम पाकिस्तान

सात मोडून काढू शकली असती तर तिला अकनूर गाठून नौशेरा, राजुरी व पुंज आघाडीवरील काश्मीरमधील हिंदी फौजांची रसद तोडून त्यांना कोंडीत पकडणे शक्य झाले असते. अकनूरहून जम्मूवर चढाई करून सर्व काश्मीरमधील हिंदी फौजांचा संबंध तोडावा व लडाखमधील मार्गही बंद करून चिनी फौजांना पुढे सरकण्यास अवसर द्यावा, हा डाव याचे मागे होता. पण हिंदी फौजांची लाहोर-चढाई व जोरियनचा प्रतिकार या दोन गोष्टींमुळे पाक फौजा अडचणीत सापडल्या व त्यांना आपली कोणतीच योजना पुरी करता आली नाही.

या वेळी काश्मीर जनतेत हिंदी फौजांचा पराभव करून आपण गोंधळ उडवून देऊ व तेथे आधीच शिरलेले पाक सैनिक आपली कामगिरी करून अडकलेल्या हिंदी फौजांना नेस्तनाबूत करतील अशी पाक पुढाऱ्यांची अपेक्षा होती व त्याचेच बळावर दिल्ली सर करण्याच्या गोष्टीही पाक पुढारी बोलू लागले होते. पण ही योजना हिंदी विमानदलाच्या हल्ल्यांमुळे व हिंदी सेनानीच्या कल्पक हालचालीमुळे धुळीला मिळाली. या बावीस दिवसांच्या लढयात हिंदी फौजांनी दाखविलेला निर्धार व युद्धकौशल्यामुळेच पाकिस्तानची डाळ आमच्यापुढे शिजू शकली नाही.

या लढयात हिंदचे २२२६ सैनिक कामास आले. त्यात १६ लष्करी अधिकारी होते. व २०६५ शिपाई गडी होते व १५०० सैनिकांचा पत्ता लढाईच्या वर्षअखेरपर्यंत लागला नव्हता. जखमींची संख्या ७८७० होती व त्यात ४१२ अधिकारी व ७४५८ साधे शिपाई होते. त्यातील २५११ शिपाई युद्धकाळातच बरे होऊन पुन्हा लढयासाठी रणांगणावर आले. यावेळी रणांगणावर ठार झालेल्या पाकिस्तान सैनिकांची संख्या ५८०० होती. भरपूर युद्ध सामुग्री जवळ असतानाही एवढया सैनिकांचे बळी पाकिस्तानला या लढयात मोठया संख्येने द्यावे लागले याची कल्पना या आकडयावरून येण्यासारखी आहे.

पाकिस्तानने केलेल्या विमानदलाचे हल्ल्यामुळे मात्र हिंदच्या

नागरी जीवनावर फार क्रूर हल्ले झाले सरसहा नागरी हद्दीत वापरण्यात न येणारे ज्वालाग्राही नापाम बॉम्ब काश्मीर हद्दीत जम्मूजवळ साम्बा विभागात टाकल्याचा पुरावा मिळाला आहे. टाकलेल्या प्रत्येक बाँबचे वजन ७५० पौंड होते व त्यात ११० गॅलन ज्वालाग्राही रसायन होते, असे मिळालेल्या या अमर्याद बाँबहल्ल्यात नागरीनीतीचे कोणतेही नियम पाकिस्तानने पाळले नाहीत. या तेवीस दिवसाचे लढयात पंजाब, जम्मू काश्मीर भागात बाँबहल्ल्याने ३१६ नागरिक ठार झाले व ४०१ जखमी झाले तर ८० हजार नागरिकांची घरेदारे नाहीशी झाल्याचे निदर्शनास आले आहे. काश्मीर येथील जोरियन विभागातील एका २०० वर्षापूर्वीचे मशिदीवर ज्यावेळी बाँबहल्ला झाला त्यावेळी तेथे प्रार्थना करीत असलेल्या लोकांपैकी ४५ लोक जागचे जागी ठार झाले. इस्लामच्या कोणत्या तत्त्वानुसार ही बॉम्बफेक न्याय्य ठरते ते कळत नाही. मुस्लिम साधूपुरुष धीर बरकउल्ला याची देशबाबानानक येथील समाधी, लुधियानेचे मत्रीवारा गुरुद्वार, अम्बालाचे सेन्ट पॉल चर्च या धार्मिक इमारती या बाँब हल्ल्यात सापडल्या व त्यांची अपरिमित हानि झाली.

● ● ●

१४ : पाकिस्तानी लढ्याचे विशेष

काश्मीरचे कारण पुढे करून पाकिस्तानने सुरू केलेल्या या लढ्यामागील भूमिका अचानक तयार झाली असे म्हणता यत नाही. तर यासाठी फार मोठी तयारी पाक राज्यकर्त्यांनी केली होती याचे अनेक पुरावे लढ्याचे वेळी सापडलेल्या कागद-पत्रावरून हाती आले आहेत. पाकिस्तानी सैनिकाबरोबर हजारो मुजाहित व रझाकारांचे नागरी दल सरहद्दीवरून हिंद हद्दीत घुसविण्यासाठी पाकिस्तानी सेनानी कित्येक दिवस तयारी करीत होते. सरहद्दीवर छुप्पेहल्ले चढवून हिंदी फौजांचे जागरूकतेची चाचणी हे सैनिक घेत यांचे प्रत्यंतर १९६३ पासून येत होते. यावर्षी एकूण १५५२ हल्ले पाक सैन्याने काश्मीर हद्दीत केले तर १९६४ व १९६५ चे पहिल्या सात महिन्यात १८०० वर हा आकडा गेला होसा. हे सर्व सरहद्दी-वरील यूनो निरीक्षक पहात होते. त्याबद्दलचे आपले अंदाज आपले कचेरीला कळवीत होते, पाक राज्यकर्त्यांकडेही याबाबत तक्रारी करीत होते. काश्मीर दरीत ज्यावेळी ५ ऑगस्टचे सुमारास ५००० पाकिस्तानी सैनिकांनी प्रवेश मिळविला त्यावेळी मात्र या हालचालीची गंभीरता सर्वांचे नजरेस आली. पकडलेल्या पाकिस्तानी वैमानिकांच्या रोजनिशातून त्यांना या चढाईपूर्वी हिंदी विमानतळावरून घिरट्या

घालून येण्याचे हुकूम दिले असल्याचे आढळून आले. यात जामनगर, अदमपूर, हलवारा, अम्बाला, पालम व आग्रा व भूज विमानतळ होते, व तेथे जाऊन आल्याचे अहवाल या सैनिकांनी आपल्या कचेरीला पाठविले होते. यावरून आकाशात उंचावरून उडणारी पाकिस्तानी विमाने कोठपर्यंत येत होती व त्यांनी हद्द ओलांडून किती दूरवरचा पल्ला गाठला होता याची कल्पना येते.

काश्मीर हद्दीत शिरलेले हे मुजाहित आपले आसन बळकट करण्यापूर्वी व उरी पुंचचे ठाण्याजवळ व गुलमर्गजवळ द्वारकाशी खेड्यात महमद दीन नावाचे एका मेंढपाळाला काही माहिती विचारू लागले. त्यांनी त्यांना धान्याची सरकारी कोठारे दाखविण्यासाठी ४०० रुपये देऊ केले. पण या लांचलुचपतीला बळी न पडता त्यांनी या हालचाली पोलीस ठाण्यावर जाऊन सांगितल्या व हिंदी लष्कराच्या हालचालींना सुरुवात झाली. ठिकठिकाणी दडलेले अनेक सैनिक यावेळी अचानक हिंदी फौजांच्या ताब्यात सापडले, यामुळे आंतून विध्वंसन करण्याचा पाकिस्तानचा मोठा डाव उधळून लावण्यात आला. या काश्मीरमध्ये शिरलेल्या पाक सैनिकांना ९ ऑगस्ट रोजी श्रीनगर येथे होणाऱ्या पीर दस्तगीर साहेबांच्या उरूसानिमित्त जमणाऱ्या भाविकांत सामील होऊन धमाल उडवावयाची होती. पण तो हेतु या हिंदी फौजांचे हालचालींमुळे साध्य झाला नाही. ९ ऑगस्ट रोजी शेख अब्दुल्ला यांचे अटकेला दोन वर्षे पूर्ण होत होती.

याच वेळी श्रीनगर सारख्या राजधानीचे शहरी मोठी धमाल उडवून द्यावी व सर्व काश्मीरमध्येच गोंधळ उडवून द्या असावा मुख्य डाव या हालचालीमागे होता. याच दिवशी सार्वमत आघाडी या काश्मीर काँग्रेसला विरोध करणाऱ्या पक्षाने मोठी निदर्शनाची तयारी केली होती. या निदर्शनांच्या मागे कोणाच्या हालचाली होत्या त्या आता स्पष्ट झाले आहे. काश्मीरहद्दीत प्रवेश केलेल्या या छुप्या सैनिकांनी काश्मीरमध्ये श्रीनगर रेडिओचा ताबा त्याच दिवशी घ्यावा व काश्मीर स्वातंत्र्याच्या लढ्याचा पुकार करावा अशीही योजना यामागे असल्याचा पुरावा हाती आला आहे. मिरवणुकीत

सामील झालेल्या सैनिकांनी श्रीनगर विमानतळ व रेडिओ स्टेशन यांचा ताबा घ्यावा व श्रीनगर-कारगील रस्ता तोडून हिंदी सैनिकांची रसद तोडावी असेही हुकूम या सेनेला दिले गेले होते, पण एवढी तयारी करूनहि काश्मीर दरीत दडलेल्या पाकिस्तानींची लांडगेतोड हिंदी शिपायांनी आधीच सुरू केल्यामुळे ठरलेल्या योजनेपैकी एखादी गोष्ट यशस्वी होऊ शकली नाही. श्रीनगरमधील उरूस शांततेने पार पडला व या प्राथमिक योजनेत संपूर्ण अपयश आल्यामुळे युद्धतहकुबीरेषेवर प्रत्यक्ष हल्ले चढवून काश्मिरी प्रदेशात प्रवेश करून युद्ध सुरू करण्याव्यतिरिक्त पाकिस्तानला दुसरा मार्गच उरला नव्हता.

पाकिस्तानचा प्रत्यक्ष असा पहिला मोठा हल्ला या ९ ऑगस्टचे अपयशानंतर सात दिवसांनी १६ ऑगस्ट रोजी ३०० शिपायांनी केरानविभागात हिंदी सेनेवर चढविला, व त्याबरोबर उरी भागातही त्यांच्या तोफा धडाडू लागल्या. छांब भागात १७ व १८ ऑगस्ट रोजी, तर मेंढार भागात २१, २२, २३ व २६ ऑगस्ट रोजी म्हणजे जवळ जवळ ५०० मैलांच्या या काश्मीर आघाडीवर चार ठिकाणी हे हल्ले जोराने सुरू झाले. पण सुरवातीला हे सर्व हल्ले हिंदी फौजांनी मागे परतविले. सैन्याला येणारे हे अपयश लक्षात घेऊन पाकिस्तानने आपले विमानदल आघाडीवर आणले. हिंदी फौजांच्या डोक्यावर त्यांच्या घिरट्या सुरू झाल्या. हालचाली संबंधीचे संदेश आवाडीवर पाठविले जाऊ लागले. याच वेळी काश्मीर-हद्दीत भुरट्या हालचाली सुरू करणारे छुप्पे शिपायांची कोणतीच योजना पुरी न झाल्यामुळे त्यांनी आपले हद्दीकडे पलायन करावयास सुरुवात केली. त्यांचा परतण्याचा मार्ग अडविण्यासाठी टिटवाल भागात हिंदी फौजांनी पाकव्याप्त आझाद काश्मीरमध्ये प्रवेश केला व दोन मोर्च्यांच्या टेकड्या आपल्या ताब्यात घेतल्या.

हिंदी फौजेच्या या अचानक आक्रमणामुळे पाक फौजांना पळता भुई थोडी उरली. पीरसाहेब ही या आघाडीवरील महत्त्वाची पाक छावणी हिंदी फौजांनी काबीज केली. हीच आघाडीवरील तुकडी

११ सप्टेंबरपर्यंत पुढे विजय मिळवीत कलिंग नदीचे तीरापर्यंत पाक हद्दीत शिरल्याने मिरपूरचा पूल उडवून देऊन पाक हद्दीत पाकिस्तानी फौजांना आपल्या बचावाचा मोर्चा नदीच्या पैलतीरावर उभारावा लागला. याच वेळी पाकिस्तानी हद्दीतील हाजिपीर खिंडीचे लढचात हिंदी फौजांनी मिळविलेला विजय या लढचाचे इतिहासात एक मोठा विजय समजण्यात येतो. हाजिपीर हे सर्व काश्मिरी जनतेचे यात्रेचे महत्त्वाचे ठिकाण समजण्यात येते. पण पाक–हिंद लढचात हिंदी फौजांनी मिळविलेल्या विजयाचे मोठे प्रतीक म्हणून या युद्धबंदीरेषे-पासून पाच मैलांवर असलेल्या ठिकाणचे वैशिष्टच मोठे आहे. या ठिकाणी हल्ला चढविणाऱ्या फौजा पाकच्या अपेक्षेपेक्षा भलत्याच मार्गाने दुर्गम डोंगर चढ़न हिंदी लष्कर आल्यामुळे पाक फौजांचा नाइलाज होऊन त्यांना ती खिंड सोडावी लागली. या हाजिपीर खिंडीवर २८ ऑगस्ट रोजी सकाळी १०–३० वाजता हिंदी निशाण फडकू लागले. या ठिकाणी पुरेशी साधनसामुग्री यावयासही चांगले मार्ग नव्हते. पकडलेले पाकिस्तानी सैनिक व अधिकारी यांना आपले तुटपुंजे रेशन देऊन हिंदी फौजांनी आपला युद्धधर्म यावेळी जिवंत ठेविला.

उरी पुंजहून निघालेली दुसरी सैन्याची तुकडी १३ सप्टेंबर रोजी म्हणजे जवळजवळ १६ दिवसांनी या फौजाना येऊन मिळाली. या भागातील सर्व महत्त्वाची पाक ठाणी हिंदी फौजांचे हाती साप-डली व काश्मिरात शिरलेल्या पाकिस्तानी गनिमांचा मोठा मार्ग रोखला गेला. या हल्ल्यात हिंदी फौजांचे हाती पाकिस्तानची २५ मोठी ठिकाणे पडली व १५ लॉऱ्या भरतील येवढा पाक दारूगोळा हिंदी फौजांचे हाती सापडला. हा पराजय पाकिस्तानी सरसेनानी मेजर जनरल मलीक यांना येवढा धसका देणारा होता की, त्यांनी २९ ऑगस्ट रोजी आपल्या सेनानींना दिलेल्या गुप्त हुकुमात वाटेल ते करून हाजीपीर खिंड परत मिळवा असे हुकूम सोडले, कारण येथून पुढे सरकण्यासाठी हिंदी फौजा पाक फौजांचा आघाडीवरील रस्ता तोडण्याचा संभव होता. पण अनेक हल्ले चढवूनही पाक सेनानी या-

बाबतीत अखेरपर्यंत यश मिळवू शकले नाहीत, हिंदी फौजांचा तिरंगा हाजीपीर खिंडीचे नाक्यावर अखेरपर्यंत फडकत राहिला. या लढ्याचे इतिहासात हा प्रसंग फार मोठा समजण्यात येतो.

या हिंदी फौजांचे विजयामुळेच चिडून जाऊन की काय, जनरल मलीक यांनी आपली छांब आघाडीवरील निकराचे चढाईची योजना आखून काश्मीरमधील हिंदी फौजांचे दळणवळण कायमचे तोडण्यासाठी अखनूरचा लढा निकराने हाती घेतला व आपली सर्व शक्ती पणास लावून हिंदव्याप्त काश्मीरमध्ये पाकची मोठी फौज घुसून, समुद्राच्या लाटेसारखी पुढे सरकणारी पाक घोडदौड सायंकाळी म्हणजे जवळजवळ १२ तासात हिंदी फौजांनी प्रथम थोपवून धरली. जोरियन शहराजवळ हिंदी सेनानींनी उभारलेली आघाडी आपल्या टँकदलाचे बळावर आपण सहज उधळून लावू असा पाकिस्तानी सेनानींना जबर विश्वास वाटत होता, व ही विजयश्रीची लढाई परदेशीय पत्रातून नीट वर्णिली जावी म्हणून या आघाडीचे मागे त्यानी परदेशीय बातमीदारांना आणून उभे केले होते. पण ही आशा हिंदी सेनानींचे प्रतिकारक आघाडीने फोल ठरविली. पण अशी नुसती प्रतिकार–लढाई देऊन हिंदचे भागण्यासारखे नव्हते. पाकिस्तानने आपली सर्व शक्ती येथे पणास लावताच जनरल चौधरींनी ६ सप्टेंबर रोजी आपले सेनेला पंजाब सरहद्दीवर पाकिस्तान हद्दीत लाहोरचे दिशेने आत घुसण्याचे हुकूम दिले. व छांब-अखनूरचे दिशेने चढाई करणाऱ्या पाकिस्तानी फौजांचा अर्धा जोर एकदम कमी केला.

४ सप्टेंबर रोजी अखनूर आघाडीवरील चढाई जोरात सुरू असताना चीनचे परराष्ट्रमंत्री मार्शल चेनई यांनी कराचीला भेट दिली, व त्यांची परराष्ट्रमंत्री भुट्टो यांचेबरोबर सहा तास चर्चा होऊन या लढ्यात चीनने कसे पडावयाचे यासंबंधी काही निश्चित बोलणी झाली. या वेळेला या भेटीसंबंधी चीनचे अधिकृत वृत्तसंस्थेने दिलेल्या बातम्या काश्मीरमध्ये हिंद निर्माण करीत असलेला खळबळाट कायमचा नाहीसा करण्यासाठी पाकिस्तानने सुरू केलेली चढाई

योग्य आहे व तिला चीनचा पाठिंबा आहे हे दर्शविण्यासाठी चीनचे परराष्ट्र मंत्र्यांनी कराचीला जाऊन पाकिस्तानी परराष्ट्रमंत्री भूट्टो यांची भेट घेतली असे म्हटले आहे. १९६५ चे पाकिस्तानी आक्रमणाचेवेळी चीनने जरी पाकिस्तानला प्रत्यक्ष दुसरी आघाडी उघडून पाठिंबा दिला नसला तरी त्याची सदिच्छा यामागे कशी होती याची कल्पना या हालचालीवरून येते. याच वेळी लढा थांबवा असा यूनोतर्फे आदेश देणारे पत्र ४ सप्टेंबर रोजी यनूोचे चिटणीस ऊ थांट यांनी पाकिस्तान व हिंदला पाठविले, व सुरक्षा समितीने हीच विनंती केली. हिंद ती मान्य करावयास तयार होता. पण पाकिस्तानने याकडे लक्ष दिले नाही. पुन्हा हल्ला होणार नाही असे अभिवचन जर पाकिस्तान देणार असेल तरच आम्ही युद्ध थांबवावयास तयार आहोत असा उल्लेख सुरक्षा समितीला पाठविलेल्या पत्रात हिंदने केला होता.

पाकिस्तानी राज्यकर्ते मात्र भूट्टोचे कल्पनेने येवढे वेडे झाले होते की त्यांनी यूनोच्या विनंतीला यावेळी कोणतेच उत्तर दिले नाही, उलट पंजाब आघाडीवर चढाईसाठी हिंदी सेना तयार होताच ५ सप्टेंबर रोजी अमृतसरवर पाक विमाने घिरट्या घालू लागली.

या वेळी हिंदला तातडीने पाऊल उचलणे भाग होते. हिंदी विमानदल या वेळी लढ्यासाठी सज्ज झाले व त्यांनी पाक हद्दीत शिरून पाकिस्तानच्या लष्करी ठाण्यावर बाँबफेक केली व आपल्या सेनेच्या लाहोर चढाईला परिपोषक भूमिका तयार केली. तीस मैलांचे आघाडीवर ग्रँटट्रक रस्त्याला समांतर अशी वाघापासून डोगराईपर्यंत सैन्याचे तीन विभाग करून हिंदी फौज शिस्तीने पाक हद्दीत शिरली. बुर्की, खेमकरण व डेरानानक या तीन शहरांच्या रोखाने हिंदी सेना पुढे सरकू लागताच पाक आक्रमणाकडे एकाद्या स्थितप्रज्ञाप्रमाणे पाहणारी पाश्चिमात्य पत्रे हिंदने पाकिस्तानमध्ये आक्रमण केले असा ओरडा करू लागली. आक्रमक हिंद म्हणून पाकप्रचारयंत्रणा गर्जू लागली. ब्रिटिश पंतप्रधान विल्सन यांनीही या आक्रमणाविषयी काढलेले उद्‌गार समर्थनीय नव्हते. व कोणीही हिंदची

रास्त बाजू समजावून घ्यावयाचे मनःस्थितीत दिसेना. या आक्रमणाचा परिणाम असा झाला की पाकिस्तानी फौजांनी छांब आघाडीवर एकवटलेली आपली शक्ती कमी केली. व पुढे सरकणाऱ्या हिंदी फौजांना तोंड देण्यासाठी त्यांना प्रतिकाराची तयारी करावी लागली. अकनूरच्या दिशेकडे जाणारे रणगाडे व युद्धसाहित्य ताबडतोब मागे घेऊन पंजाबच्या आघाडीसमोर आणणे पाक सेनानींना भाग पडले. आयुबखानांनी रेडिओवर भाषण करून आम्ही हिंदशी लढा देत आहोत अशी घोषणा केली, व तासागणिक पाकिस्तानी विमाने पंजाब शहरावर घिरट्या घालू लागली. त्यांनी आपले छत्रीधारी सैनिक पठाणकोट, आदमपूर, हलवारा या भागात उतरवून हिंदी आघाडीच्या पुरवठाकेन्द्राचे विध्वंसन करण्याचा प्रयत्न केला पण ही योजना यशस्वी होऊ शकली नाही व त्यांना नागरिकांनी पकडून सैन्यांचे ताब्यांत दिले.

या सर्व लढ्यात लाहोरचा लढा सर्वात महत्त्वाचा व काहीसा भीषण होता. छांब विभागात चढाईची सूत्रे जशी पाकिस्तानी सेनेच्या हाती होती तशी लाहोर विभागात ती हिंदी फौजांचे हाती होती. सरहद्दीपासून ८ मैलावर लाहोरचे अंतर हिंदी फौजांनी हा–हा म्हणता ओलांडले व पाकिस्तानी मोर्चे भरडून काढले. परंतु पाकिस्तानचा लाहोरजवळील इछोगील कालवा म्हणजे पाकिस्तानचा लाहोर प्रतिकाराचा मोठा कणाच होता. लाहोर शहराचे वेशीजवळ रावी व सतलज नदीला जोडणारा हा कालवा १२० फूट रुंद व १५ फूट खोल होता. यावरील पूल पाकिस्तानी फौजांनी उडवून दिले होते. तसेच सियालकोट शहराभोवतीही मोठी बलवत्तर आघाडी पाक फौजांनी उभी केली होती. या दोन्ही शहराभोवतालचे मोर्चे पाहणाऱ्या कोणत्याही लष्करी तज्ञाला पाकिस्तानच्या प्रतिकाराची तयारी किती जुनी होती याची चांगली कल्पना येत होती. लाहोरचे पाकिस्तानी फौजांचे निकराचे प्रतिहल्ले सुरू होते, तर सियालकोट जवळ पाक सेनानींनी आपले यंत्रसज्ज विभागच संरक्षणार्थ उभा केला होता. जांब आघाडीच्या चढाईचा नाद सोडून या दोन्ही

शहराचे संरक्षणाचे मोर्चे प्रबल करण्याकडे पाक सेनानींचे लक्ष वेधले व जनरल चौधरींनी पाकिस्तानी शहरे मिळविण्यासाठी ही चढाई केली नव्हती तर छांब–अकनूर विभागातील पाक फौजांचा जोर कमी करण्याचे मोठे कार्य त्यांना या चढाईने साधावयाचे असल्यामुळे ते पहिल्या तीन दिवसातच पुरेपूर साध्य झाले.

९ व १० सप्टेंबर रोजी आपल्या यंत्रसज्जदलानिशी मोठे घनघोर हल्ले पाक सेनानींनी या आघाडीवर चढविले पण खंदकात मोर्चे बांधून चिवटपणे बसून राहिलेली हिंदी फौज याठिकाणी एक तसूभरही मागे हटली नाही. विशेषतः कसुरजवळ हिंदी फौजांवर मोठे निकराचे हल्ले पाक फौजांनी चढविले व तेथे काही वेळा हिंदी सेनानींना सैन्य मागे घेऊन आपली आघाडी पुन्हा बनवावी लागली.

या वेळी पाकिस्तानी फौजांचे पॅटनटॅन्कस् पुढे सरकत होती व निधड्या छातीने या ज्वालात उड्या घेऊन हिंदी शिपाई त्यांचेवर हल्ले चढवीत होते. असे हातघाईचे प्रसंग अनेक वेळा आले. हिंदी-फौजांची शरमन् टॅन्क्स् यावेळी आपली कामगिरी निष्ठेने करीत होती. या टॅन्कदलाने फिलोराचे लढयात पाकिस्तानी टॅन्कदल व पायदळ यांचेमध्ये धडक मारून याचा संबंध तोडला व एका दिवसात पाकिस्तानची ६७ टॅन्क्स् बरबाद केली. यावेळी हिंदचे अवघे ६ टॅन्क्स्ची मोडतोड झाली होती. यावरून टॅन्कदलाचे लढयात हिंदी फौजा किती निष्णात होत्या यांची कल्पना येते. इजिप्तमधील दुसऱ्या महायुद्धात जनरल रोमेल या जर्मनीचे निष्णात सेनानीनीही एका दिवसात ब्रिटिशांची ७० टॅन्क्स् वाळवंटी लढाईत बरबाद केली होती व ३० आपली टॅन्क्स् गमावली हा त्या लढयातील उच्चांक समजण्यात येत होता. पण डोंगराळ प्रदेशात पाकिस्तानचे टॅन्कदलापैकी ६७ टॅन्क बरबाद करणे हा टॅन्कदलाचे लढयातील दुसरा अधुनिक उच्चांक समजण्यात येत आहे, व तो हिंदी सेनानींनी केला. त्याचे श्रेय या वेळचे टॅन्कदलाचे सेनानी मेजर जनरल राजेंदरसिंग यांना देण्यात येत आहे. टॅन्कदलाचे एक कुशल सेनानी म्हणून जनरल चौधरी यांचा लौकिक फार जुना आहे. पण त्यांनी

आखलेल्या योजना तंतोतंत अंमलात आणण्याची कामगिरी मेजर जनरल राजेंदरसिंग यांचेकडे होती व ती त्यानी अशा तऱ्हेने यशस्वी-रित्या अंमलात आणली.

या लाहोर व सियालकोटचे लढयात हिंदी फौजांनी पाकिस्तानी हद्दीत बुर्कीजवळ पंजाब सरहद्दीपासून २० मैल आत प्रवेश केला होता. व त्यांना लाहोरचे उपनगर समोर दिसत होते. या ठिकाणचे बुर्की पुलाचा लढा हा लाहोरचे लढयाचे इतिहासात मोठा लढा होता. १० सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजता हा हल्ला सुरू झाला व प्रत्येक इंच इंच जमीन पाक सेना मोठ्या हिरीरीने लढवीत होती. त्यानी हिंदी फौजांवर या रात्री २५०० तोफांचे गोळे २५ मिनिटात टाकले तरीपण अशा माऱ्याला न जुमानता एका हिंदी कर्नलने आपली फौज पुलाकडे नेऊन उभी केली. पण त्याला मदत पोहचण्या-पूर्वी बुर्कीचा पूल पाकिस्तानी फौजांनी उडवून दिला व त्यांनी जिवा-वर उदार होऊन गाठलेली ही योजना यशस्वी होऊ शकली नाही. इच्छोगील कालव्या जवळील दुसरी मोठी लढाई म्हणजे डोग्राईचा लढा होय. या ठिकाणी हिंदी फौजांनी २१ सप्टेंबर रोजी मोठा लढा देऊन १२ मैल लांबीच्या कालव्याच्या किनाऱ्यावर ठाण मांडले. व येथे जिवावर उदार होऊन लढणारे पाकिस्तानचे बटॅलियन नामशेष केले. यावेळी पाक फौजांपैकी ७० लोक जिवंत हाती लागले त्यात एक बटॅलियन कमांडर होता.

आंतरराष्ट्रीय प्रयत्नामुळे २३ सप्टेंबर रोजी पहाटे तीन वाजता हिंद–पाक लढयात युद्धतहकुबी जाहीर झाली व लढा थांबला. पण या वेळपर्यंत १८० चौरस मैलांचा पाकिस्तान प्रदेश हिंदी फौजांचे ताब्यात होता. सियालकोटपासून अवघ्या चारशे यार्डावर हिंदी फौजेची आघाडी होती. तर लाहोरचे आसमंतात लढाई येऊन पोहचली होती. हिंदव्याप्त प्रदेशात पंजाब आघाडीवर पाकिस्तानची जवळ जवळ २४३ टॅन्क्स हिंदने नाहीशी केली. व यामुळे पाकिस्तानी यंत्र-सज्जदल नामशेष झाले होते. टॅन्क दलाला बरबाद करण्याचे बरेचसे

श्रेय आमचे हिंदी विमानदलाला दिले पाहिजे असे लष्करी तज्ज्ञांचे मत आहे.

या लढ्यात हिंदी विमानदल १ सप्टेंबर रोजी रणांगणावर प्रथम आणण्यात आले. याच दिवशी पाकिस्तानी फौजा छांब विभागात घुसताच हिंदी विामनदलाने आपल्या लढ्याला सुरवात केली व वीस दिवसात पाकिस्तानची ७३ विमाने बरबाद केली. ही संख्या प्रत्यक्ष लढ्यात बरबाद झालेल्या विमानांची आहे. प्रत्यक्ष शत्रूचे विमानतळावर जाऊन केलेल्या बॉम्बहल्ल्यात बरबाद झालेल्या विमानांचे आकडे या आकड्यात दिलेले नाहीत.

हिंदने आपली ३५ विमाने हल्ल्यात गमावली. विशेषत: विमानदलाच्या लढ्यात हिंदी वैमानिकांनी पाकिस्तानला शिकविलेला धडा मोठा गंभीर स्वरूपाचा होता व झालेली नुकसानी भरून काढण्यास त्यांना फारच कष्ट पडले. सारागोधा, अकवाल, पेशावर कोहटक, रिसलवाला, चकला वगैरे पाकिस्तानचे बहुतेक मोठे विमानतळ हिंदी विमानांनी जोराची बॉम्बफेक करून भरडून काढले, तेव्हा पाक विमाने पंजाबमधील अमृतसर, अंबाला व काश्मीर आघाडीवरील पठाणकोट, आदमपूर, हटावारा या शहरावर बेधडक बॉम्बफेक करावयास सुरवात केली. पण विमानविध्वंसक तोफांनी हिंदी विमानतळ गर्जू लागले व पाकिस्तानी विमानांपैकी १० विमाने या तोफांनी अचूक नेमबाजी करून पाडली.

या गोलंदाजांची पाक विमानावर एवढी जरब बसली की, दिवसा हल्ले करणे त्यांनी सोडून दिले. अमृतसर, क्षेत्रा या शहरांवर त्यांनी केलेले हल्ले अमानुषतेचे प्रतीक होते. त्यांनी पाकिस्तानींना यावेळी देण्यात आलेले उत्तर असे सडेतोड होते की हिंदी विमानदलाविषयी त्यांच्या असलेल्या कल्पना पूर्ण पालटल्या असतील.

या तेवीस दिवसांचे लढ्यात हिंदी फौजांनी एकूण काश्मीर व पंजाब–राजस्थान आघाडीवर पाकिस्तानचा ६९० चौरसमैलांचा प्रदेश व्यापला तर पाकिस्तानचे ताब्यात हिंदचा छांब विभागात २१० चौरसमैलांचा प्रदेश व पंजाब आघाडीवर हिंदी फौजानी २० चौरस-

मैलांचा व्यापला. राजस्थानमधील फारच थोडी हिंदी नाकी पाकच्या हाती होती. या प्रदेशांत कारगील आघाडी २० चौ. मैल, टिटवाल आघाडीवर २०० चौ. मैल, उरीपुंज आघाडीवर १८० चौ. मैल, सियालकोट आघाडीवर १४० चौ. मैल व राजस्थान आघाडीवर १५० चौ. मैल प्रदेश हिंदी फौजांचे ताब्यात होते.

या लढ्यात पाक नाविकदलाने फक्त द्वारकेवर तोफा डागल्या पण पाक नाविकदलाचा हा हल्ला फार विस्कळीत स्वरूपाचा होता. हिंदी नाविकदल त्याला तोंड देण्यास पुढे सरकताच पाक युद्ध नौकांनी कराची बंदराचा आश्रय घेतला.

● ● ●

५७ : युद्धतहकुबी कशी अंमलात आली?

हिंद–पाकचे लढयात युद्धतहकुबी घडवून आणण्यासाठी यूनो-सारख्या संघटनेने कोणते प्रयत्न केले व त्यावेळी पाकिस्तानने किती ओढून धरले याचा इतिहास पाहण्यासारखा आहे. यूनोचे सेक्रेटरी उ थांट यांनी ता. १ सप्टेंबर रोजी दोन्ही राष्ट्रांना युद्ध थांबविण्यासाठी पत्र पाठविल्यानंतर युद्ध थांबण्याऐवजी वाढत गले, तेव्हा सुरक्षा समितीतील राष्ट्रांनी हा प्रश्न आपले हाती घेतला. १४ व १५ सप्टेंबर रोजी हिंदचे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी यूनो सेक्रेटरींना लिहिलेल्या पत्रात कोणतीही अट घातल्याशिवाय यूनोचे आज्ञेनुसार हिंद युद्ध थांबवावयास तयार आहे. पण पाकिस्ताननेही हीच अट मान्य केल्याचे आम्हाला आपण प्रथम कळविले पाहिजे. ता. २३ सप्टेंबर रोजी सुरक्षा समितीकडून आलेल्या संदेशात 'तुम्ही प्रथम युद्ध थांबवा' असा संदेश होता. पण प्रत्यक्ष लढाई सुरू असताना असा एकतर्फी हुकूम अंमलात आणणे शक्य नसते, असे हिंदच्या प्रतिनिधींनी कळविताच सुरक्षा समितीची खास बैठक बोलविण्यात आली. ही बैठक पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्र्यांचे सूचनेवरून बोलविण्यात आली होती. या बैठकीत पाकिस्तानने आपले सेनानींना ता. २३ रोजी पहाटे ३–३० पासून गोळीबार थांबविण्याचा हुकूम

दिला असल्याचे घोषित करताच हिंदने घातलेली अट मान्य झाली असे समजून युद्धतहकुबी पहाटे ३–३० पासून जारी करण्यात आली व अशा रीतीने हा संपूर्ण २२ दिवसांचा लढा तात्पुरता तरी थांबला.

लढा सुरू असताना तो थांबविण्यासाठी सुरक्षा समिती ज्याप्रमाणे प्रयत्न करीत होती त्याप्रमाणे रशियाचे पंतप्रधान कोसिजिन यांनीही काही हालचाली सुरू केल्या होत्या. १८ सप्टेंबर रोजी रशियाचे पंतप्रधानांनी शास्त्रीजींना पाठविलेल्या पत्रात हिंद व पाकिस्तान या दोन्ही राष्ट्रांनी युद्ध थांबवून गुण्यागोविंदाने राहावे म्हणून आपण मध्यस्थी करावयास तयार असल्याचे कळविले. रशियासारख्या राष्ट्रानी मध्यस्थीसाठी केलेल्या पहिल्या प्रयत्नाचे हिंदने स्वागत केले व त्या दिशेने पुढे पत्रव्यवहार सुरू झाला व सुरक्षा समितीचे आज्ञेनुसार युद्ध थांबल्यानंतर हे प्रयत्न रशियाने दोन्ही राष्ट्रातील मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित करण्यासाठी जोरात सुरू ठेवले.

या युद्धाचे वर्णनात आंतरराष्ट्रीयदृष्ट्या झालेल्या दोन महत्त्वाच्या घटना म्हणजे गुजराथचे मुख्यमंत्री श्री. बलवंतराव मेहता यांचे कच्छ-आघाडीपासून दूर अंतरावर पाडलेले विमान होय. या विमानात स्वतः बलवंतराय मेहता, त्यांच्या पत्नी व त्यांचेबरोबरची मंडळी विमान कोसळून ठार झाली. महाराष्ट्र सरकारचे विमान मागवून घेऊन ते आपले प्रदेशात काही तातडीची पाहणी करण्यासाठी निघाले असता सिंधमधून विमानतळावरून आलेल्या एका पाक विमानाने हल्ला चढवून त्यांचे विमान पाडले व एक नागरी मुख्यमंत्री या नाहक हल्ल्यामुळे अनपेक्षितपणे धारातीर्थी पडला.

याच वेळी चीनची एक महत्वाची हालचाल लक्षात घेण्यासारखी आहे. सिक्कीम सरहद्दीवरील नाथुला व डोंगरचुला खिंडीजवळ हिंदी फौजांनी आपली ठाणी पुढे सरकवून चिनी हद्दीत आणल्याचा खोटाच आरोप हिंदला पाठविलेल्या एका पत्राने केला. पण तो खोटा असल्याचे हिंदने चीनला स्पष्ट शब्दात कळविले. यावेळी चिनी पुढाऱ्यांनी मोठ्या धमकीवजा शब्दात ७२ तासात ठाणी मागे घ्या, नाहीतर आम्हाला आमच्या उपाययोजना योजाव्या लागतील असाही निर्वा-

णीचा खलिता पाठविला. पण या दमबाजीचा परिणाम हिंदवर काहीच न झाल्यामुळे चीनला मूग गिळून स्वस्थ बसणे भाग पडले.

सुरक्षा समितीचे आज्ञेनुसार हिंदने आपला लढा ता. २३ रोजी पहाटे ३–३० वाजता थांबविला पण पाकिस्तानी आघाडीवरून मधून मधून पुढे १५ तास मारा सुरू होता. पण त्यानंतर मात्र तो थांबविण्यात आला तरी पण २४ सप्टेंबर रोजी लोकसभेत केलेल्या भाषणात पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी दिलेला इशारा महत्त्वाचा होता. ते म्हणाले, 'पाकिस्तान तयार नसतानाही त्याला ही युद्ध तहकुबी मान्य करावी लागली आहे. ही गोष्ट या युद्धतहकुबीनंतर अध्यक्ष आयुबखान व त्यांचे परराष्ट्र मंत्री भुट्टो यांनी ज्या धमक्या दिल्या आहेत त्या आपण लक्षात घेतल्या पाहिजेत. हिंद हद्दीत ५ ऑगस्ट नंतर शिरलेल्या छुप्या सेनेची जबाबदारी ते अंगावर घ्यावयास तयार नाहीत. अगर त्यांना मागे घेण्याची त्यांची तयारी दिसत नाही. सुरक्षा समितीचा ठराव दोन्ही राष्ट्रांना सारखाच बंधनकारक असून तो सर्व सशस्त्र सैनिकांना लागू आहे. या परिस्थितीत पाकिस्तान जर आधी घुसलेल्या सैनिकांची जबाबदारी अंगावर घेण्यास तयार नसेल तर आम्हाला त्यांचा बंदोबस्त करावा लागेल.'

यूनोच्या आज्ञेखातर हिंदने युद्धआघाडीवर गोळीबार थांबविला, पण पाकिस्तानने या तहकुबीची कलमे तंतोतंत पाळली असे म्हणता येत नाही. आघाडीवर उभी असलेली सेना जेवढा प्रदेश पुढे सरकून आपल्या घशाखाली घालता येईल तेवढा घालण्याचा प्रयत्न सारखा करीत होती. राजस्थानसारख्या विरळ लोकवस्तीच्या वालुकामय प्रदेशात त्यांचे हे प्रयत्न यशस्वी झाले, पण जेथे समोर हिंदी सेना उभी होती तेथे चोरून पुढे सरकण्याचे प्रयत्न त्यांनी केले नाहीत. छांब विभागात पुढे सरकलेली पाकिस्तानी सेना मागे घेतली गेल्याशिवाय एक तसूभरही आम्ही मागे हटणार नाही. काश्मीरमधील पूर्वीच्या युद्धतहकुबी रेषेमागे पाकिस्तानने आपले सर्व सैनिक मागे घेतले पाहिजेत तरच आमची सेना मागे घेण्याचा आम्ही विचार करू. मोर्च्यांच्या जागा आम्ही सोडणार नाही. ह्या हिंदी सेनानींनी प्रगट

केलेल्या निर्धाराला पंतप्रधान शास्त्रीजींनी उचलून धरले. ५ नोव्हेंबर रोजी लोकसभेत केलेल्या भाषणात शास्त्रीजी म्हणाले, ' सरहद्दीवरील गंभीर वातावर पूर्णपणे निवळावे असे पाकिस्तानला खरोखरच वाटत असेल तर पाकिस्तानने प्रथम युद्धतहकुबी अटी पाळल्या पाहिजेत. रोज या अटींचा आघाडीवर भंग होतो, प्रथम आमचे प्रदेशातून पाकने आपली सेना मागे घ्यावी म्हणजे आम्हीही त्यांचा प्रदेश खाली करू, पण तत्पूर्वी या युद्धतहकुबीचे काळात पाकिस्तानने नव्या सैन्यभरतीची व खंदक खणण्याची जी घाई चालविली आहे ती थांबवावी. त्यांनी आमचा अडविलेला माल व बोटी परत कराव्या व सलोख्याचे संबंध निर्माण करावे.' लाल बहाद्दूर शास्त्रींची ही विनंती पाकिस्तानने यावेळी तरी मान्य केली नाही.

पण या वातावरणाचा परिणाम रशियाने सुरू केलेल्या तडजोडीचे प्रयत्नावर झाला नाही. १८ सप्टेंबर रोजी रशियन पंतप्रधान कोसिजिन यांनी पाठविलेल्या पत्रांत या तडजोडीचे प्रयत्नांत मध्यस्थ म्हणून काम करावयास तयार असल्याचे सूचित केले होते. व शास्त्रीजींनी त्याला मान्यता दिली होती. पण आयुबखान व शास्त्रीजींचे भेटीचे रशिया करीत असलेल्या प्रयत्नाला सुरुवातीला यावे तसे यश आले नाही. ता. १६ नोव्हेंबरला आलेल्या रशियन पंतप्रधानांचे पत्रांत आयुबखान ताश्कंद येथे (रशियन प्रदेशांत) शास्त्रीजींची भेट घेण्यास तयार असल्याचे म्हटले होते, व ही गोष्ट शास्त्रीजींनी मान्य केल्यानंतर दोन्ही पंतप्रधानांना सोयीची अशी ४ जानेवारी ही भेटीची तारीख रशियाने निश्चित केली. रशियाचे या प्रयत्नाला ब्रिटन अमेरिकेसारख्या पाश्चात्य राष्ट्रांनीहि नाखुषीने का होईना, पण मान्यता दिली व यातून या दोन्ही राष्ट्रांचा सलोखा घडून आला तर आम्हालाहि आनंदच होईल अशी सदिच्छा व्यक्त केली. पण मनापासून ही तडजोडीची सूत्रे रशियाचे हाती जावी असे या दोन्ही राष्ट्रांना वाटत नव्हते व त्या दृष्टीने अंतस्थ राजनैतिक प्रयत्न या दोन्ही राष्ट्रांनी केल्याचे कळते.

तडजोडीसाठी रशियाने ताश्कंद येथे मोठी जय्यत तयारी

केली होती. दोन्ही राष्ट्रांचे नेते ता. ३ जानेवारी रोजी म्हणजे ख्रिसमसचा सण संपल्यानंतर दोन दिवसांनी ताश्कंदचे विमानतळावर उतरले. शहरापासून हा विमानतळ साडेचौदा मैलावर आहे पण विमानतळावरून शहराकडे जाणाऱ्या रस्त्यावर या दोन्ही देशांचे नेत्यांना पाहण्यासाठी ताश्कंदचे नागरिकांनी एकच गर्दी केली होती. सुरुवातीचे भाषणात शास्त्रीजी व आयुबखानांना शक्तीसामर्थ्याचे बळावर प्रदेश जिंकण्याची कोणाचीच इच्छा नसल्याचे सांगितले पण या भाषणांत मात्र तडजोडीच्या अटी कोणत्या असाव्या यांचा निर्देश मात्र कोणीच केला नाही. रशियन पंतप्रधान कोसिजिन यांचे सूचनेवरून हा निर्देश दोन्ही पंतप्रधानांनी गाळला होता असे म्हणतात. कोसिजिन यांनी आपल्या भाषणात हिंद व पाकिस्तान हे आमचे दक्षिणेकडील शेजारी आहेत व त्यांचेमध्ये शांतता नांदावी अशीच आमची इच्छा असल्याचे सांगितले. या दोन्ही राष्ट्रांत लढा सुरू रहावा असे फक्त त्यांच्या शत्रूंना वाटते असाही आरोप त्यांनी यावेळीं आपले भाषणात केला होता.

हिंदचे परराष्ट्रमंत्री स्वर्णसिंग व पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री भुट्टो हे आपल्या परराष्ट्र खात्याचे सहकाऱ्यांसह आले होते. शास्त्रीजींबरोबर नवे संरक्षणमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण हेही होते. या परराष्ट्रमंत्र्यांचे चर्चेत भुट्टोच्या विशिष्ट धोरणामुळे काश्मीर प्रश्नावर सर्व चर्चा पुढे सुरू होईना. काश्मीरचा हिंदव्याप्त भाग हा हिंदचा अविभाज्य भाग असल्यामुळे त्याबाबत कोणतीही चर्चा करावयास स्वर्णसिंगांनी नकार दिला. यावेळी पुन्हा लढा सुरू होऊ नये म्हणून कोणते उपाय योजावे हा आपलेपुढील प्रश्न आहे, ही गोष्ट हिंदी शिष्टमंडळाने प्रथम भुट्टोंचे नजरेस आणली पण पहिले दोन्ही दिवस चर्चा पुढे सरकेना. व शास्त्रीजी व आयुबखानांचे चर्चेसाठी कार्यक्रमपत्रिकाच तयार होईना. शेवटी कार्यक्रमपत्रिकेशिवायच कोसिजिन यांचे सूचनेनुसार दोन्ही पुढाऱ्यांचे चर्चेस सुरवात झाली. दोन्ही देशात युद्धबंदीचा करार करावयास आयुबखान तयार नव्हते; पण १९६३ साली स्वर्णसिंग व भुट्टो यांची चर्चा ज्या गोष्टीमुळे फिसकटली त्याच

मुद्द्यांवर पुन्हा पुन्हा आयुबखान बोलणी करण्याची तयारी दर्शवू लागले पण त्यामुळे बोलणी फिसकटतात किंवा काय अशी परिस्थिती निर्माण झाली. काश्मीरचा प्रश्न कसातरी सोडविला पाहिजे याच प्रश्नावर ते पुन्हा पुन्हा येऊ लागले. शेवटी चर्चेला काहीतरी वळण लागावे म्हणून कोसिजिन यांनी युद्धबंदीचे नव्या मसुद्याची तयारी केली. हिंदने तयार केलेला मसुदा पाकिस्तानचे नेते मान्य करीनात. पाकिस्तानी प्रवक्त्याने या मसुद्याला एक कागदाचा तुकडा म्हणून संबोधून त्याचे महत्त्व कमी केले. यावेळी पाकिस्तानने आपला युद्ध-बंदीचा करार पाळावा म्हणून पाकिस्तानला हिंदने विनंती केली. पण पाकिस्तानने या प्रश्नाची सोडवणूक काश्मीरचा प्रश्न सुटल्याशिवाय होणार नाही असे उत्तर दिले.

या वेळी ही बोलणी फिसकटणार असे निश्चित वाटू लागले. तेव्हा कोसिजिन या दोन्ही पुढाऱ्यांना एकत्रित बोलवून ही ताश्कंदची बोलणी अयशस्वी होऊ देऊ नका अशी कळकळीची विनंती केली, व यशाचे आशेने दोन्ही राष्ट्रांची समान भूमिका लक्षात घेऊन एक मसुदा तयार करण्याची तयारी दर्शविली व पंतप्रधान कोसिजिन परराष्ट्रमंत्री ग्रोमिको, श्री. लालबहादूर शास्त्री व आयुबखान यांची पुन्हा चर्चा सुरू झाली. ही चर्चा मध्यरात्रीपर्यंत चालून कितीतरी प्रश्नांवर एकमत होईल असे वाटू लागले पण काश्मीर हद्दीतील सैन्य मागे घेण्याचे प्रश्नावर पुन्हा घोडे अडून पडले. हिंद पाकिस्तानी प्रदेशातून आपली सेना ५ ऑगस्ट पूर्वीचे ठिकाणी घ्यावयास केव्हाही तयार होता. पण हिंदहद्दीत बेकायदेशीररित्या पाकने घुसविलेले सैनिक मागे घ्यावे असा हिंदचा आग्रह होता. पुन्हा दोन्ही राष्ट्रामधील कूट प्रश्न तसेच कायम राहिले, शेवटी रशियन पंतप्रधान कोसिजिन यांच्या आग्रहावरून ताबडतोब काश्मीर प्रश्न सोडविण्याची मागणी पाकिस्तानने मागे घेतली व हा प्रश्न सोडविण्यासाठी एक यंत्रणा तयार करावी अशा अर्थाची सूचना पुढे आली व ती मान्य करण्यात आली व दोन्ही राष्ट्रांत फिसकटणारी हीं तडजोड रशियन पंतप्रधान कोसिजिन

यांचे प्रयत्नामुळेच यशस्वी होऊ शकली व दोन्ही राष्ट्रांतील ९ कलमी करार तयार झाला. या करारात खालील अटी होत्या.

(१) दोन्ही पंतप्रधानांनी आपापल्या राष्ट्रातर्फे संयुक्त राष्ट्र परिषदेच्या जाहीरनाम्यानुसार शेजारधर्म पाळून शांतता पाळण्याचे आटोकाट प्रयत्न करावे. दोन्ही देशात सतत खळबळाटाचे वातावरण निर्माण करून शांतता प्रस्थापित करणे कठीण आहे. व यासाठी जम्मू–काश्मीर प्रश्नावर दोन्ही पंतप्रधानांनी चर्चा केली व आपल्या बाजू मांडल्या.

२) दोन्ही राष्ट्रांनी २५ फेब्रुवारी १९६६ पूर्वी आपल्या सेना पूर्वीच्या युद्धतहकुबी रेषेच्या मागे घ्याव्या व ५ ऑगस्ट १९६६ पूर्वी जी परिस्थिती होती ती निर्माण करावी.

(३) एकमेकांच्या देशांतील अंतस्थ प्रश्नावर दोन्ही राष्ट्रांनी कोणतीही ढवळाढवळ करावयाची नाही हे धोरण कायम ठेवावे.

(४) एकमेकांचे देशाविरुद्ध प्रचार करण्याचे दोन्ही राष्ट्रांनी टाळावे.

(५) दोन्ही राष्ट्रांचे हायकमिशनर एकमेकांचे देशात पुन्हा आपआपले जागी येतील व दोन्ही देशामधील राजनैतिक संबंध पुन्हा प्रस्थापित केले जातील.

(६) आर्थिक, व्यापारी व वाहतुकीबाबतचे संबंध व करार पाळून पूर्ववत् परिस्थिति निर्माण करावी.

(७) एकमेकांचे युद्धकैदी परत करावे व तसे हुकूम आपापले, अधिकाऱ्यांना ताबडतोब सोडावे.

(८) दोन्ही देशातील निर्वासित, घालवून दिलेले नागरिक व बेकायदेशीर प्रवेश केलेल्या नागरिकांच्या प्रश्नाबाबत दोन्ही देशातील अधिकाऱ्यांनी चर्चा सुरू करून हे प्रश्न सलोख्याने सोडवावे.

(९) दोन्ही देशातील अधिकारी, मंत्री यांनी आपापले प्रश्न तडजोडीने सोडविण्यासाठी वेळोवेळी चर्चा करावी. यासाठी दोन्ही राष्ट्रांनी संयुक्त मंडळे स्थापून पुढे कोणत्या उपाययोजना योजाव्या याबाबत दोन्ही राष्ट्रांचे नेत्यांना सल्ला द्यावा.

या नऊ कलमी करारावर समारंभपूर्वक रशियन नेत्यांसमोर आयुबखान व शास्त्रीजींनी सह्या केल्यानंतर हा ताश्कंद करार जगभर घोषित करण्यात आला.

पण हे मिळविलेले यश प्रत्यक्ष अमलात कसे येते हे पहावयास हिंदचे पंतप्रधान हिंदमध्ये राहिले नाहीत. युद्धबंदी करारासंबंधात झालेल्या या परिश्रमामुळे शास्त्रीजी ता. १० जानेवारी १९६९ रोजी पहाटे १ वाजून ३५ मिनिटांनी हृदयविकाराचा झटका आला व त्यातच त्यांचे निधन झाले. ताश्कंद करार झाला व सरहद्दीवरील युद्ध थांबले ही आनंदाची बातमी हिंदमध्ये जाहीर होऊन पुरते चोवीस तास उलटतात ना उलटतात तोच शास्त्रीजींचे निधनाची बातमी आली व हिंदी नागरिकांना दुःखाचा जबरदस्त तडाखा सहन करावा लागला.

ताश्कंद करार झाला पण हिंदचा पंतप्रधान गेला अशाच उद्गाराने हिंदी जनतेने या झाल्या घटनेचे स्वागत केले.

Sunday, 7th Jan 1966 to Wed. 10th Jan 1966.

• • •

१६ : ताश्कंद करारानंतर

नव्या वर्षाच्या सुरवातीला ताश्कंद करार ता. १० जानेवारी रोजी झाला व त्याचे सर्व जगात स्वागत झाले व रशियाचे मध्यस्थीला यश येऊन काही काळ का होईना, हिंद-पाक युद्धाची भीति नाहीशी झाली, ही एकच गोष्ट सर्वत्र एवढी समाधानकारक वाटत होती की, या कराराचे पूर्ततेसाठी कोणत्या गोष्टी केल्या जातात, कोणते राष्ट्र त्या कितपत अंमलात आणते या गोष्टीकडे जबाबदार राष्ट्रांनी फारसे लक्ष दिलेले दिसत नाही. शास्त्रीजींचे निधनानंतर हिंदच्या पंतप्रधान म्हणून पं. नेहरूंच्या कन्या श्रीमती इंदिरा गांधी यांचे हाती हिंदची सूत्रे गेली. पण शास्त्रींच्या वेळी परराष्ट्रखात्याचे मंत्री म्हणून काम करणारे स्वर्णसिंग या परराष्ट्र-संबंधाकडे पहिले दहा महिने पहात होते. त्यांनी कराराच्या शर्ती तंतोतंत पाळण्यासाठी जेवढे प्रयत्न करणे आवश्यक होते तेवढे केले, व त्यानंतर आलेले परराष्ट्रमंत्री छगला यांनीहि शास्त्रीजींचे करारा-संबंधीचे अभिवचन मूर्त स्वरूपात आणण्यास कोणताही अडथळा केलेला नाही. पण पाकिस्तानचे बाजूने या दृष्टीने झालेल्या हालचाली प्रथमपासूनच निराशाजनक होत्या. कराराच्या शर्तीतील एकच अट पूर्णपणे पाळली गेली ती म्हणजे २५ फेब्रुवारी १९६५ पर्यंत एक-

मेकांच्या प्रदेशातील सैन्य मागे घेणे ही होय. या कराराबाबत झालेली काहीं टीकाही यावेळी विचारात घेणे आवश्यक आहे ती म्हणजे काश्मीरमध्ये ५ ऑगस्टनंतर शिरलेल्या पाकिस्तानींना मागे घेण्याचा प्रश्न कधीच स्पष्ट झाला नाही. ही सेना मागे घेतल्याशिवाय आम्ही आपले सैन्य मागे घेणार नाही, हा तर हिंदचा पूर्वीपासूनचा निर्धार होता. याबाबत पुन्हा अशा चोरट्या मार्गाने शिरलेल्या सैनिकांची हालचाल न करण्याचे आश्वासन पाकिस्तानने दिले असावे व त्यामुळे हा आग्रह शास्त्रीजींनी सोडला असावा अशी समजूत सर्वांची आहे. हिंदच्या ताब्यात असलेल्या काश्मिरी प्रदेशाविषयी कोणतीही चर्चा होऊ शकणार नाही हा शास्त्रीजींचा आग्रह मात्र अखेरपर्यंत कायम राहिला व तो अजूनही कायम असल्यामुळे ताश्कंद कराराची फलश्रुती काय झाली हे सांगणे कठीण आहे. काश्मीरसंबंधीचे चर्चेचे कलम करारात घातले गेले. काश्मीरचे भावी प्रश्न तांतडीने सोडवावयाचे ही गोष्ट आयुबखानांनी करारावर सही करताना मान्य केली, पण ती बारा महिने उलटून गेले तरी अंमलात येऊ शकली नाही.

पाकिस्तानचे अध्यक्ष आयुबखान यांनी ताश्कंद करार करून समझोता केला खरा, परंतु ही गोष्ट पाकिस्तानी राज्यकर्त्यांना व जनतेने तेवढीशी मान्य केली असावी असे वाटत नाही. कारण आपल्याला न मिळालेल्या विजयाच्या अनेक तुताऱ्या पाकिस्तानी जनतेसमोर खोट्या बातम्या देऊन वाजविल्या जात असल्यामुळे हाती विजय आला असतांना पाकिस्तान ताश्कंद करारास का सज्ज झाला हेच गूढ पाकिस्तानी जनतेस पडले होते. त्यामुळे आयुबखानांची तडजोडीची भूमिका कोणाला नीट समजूच शकली नाही; त्याचा परिणाम सर्वांवर झालेला आढळला. छांब विभागातून पाक फौज मागे घेतली जात असतांना त्यांनी कित्येक खेडी एकदी बेचिराख करून टाकली, की आपले पुढाऱ्यावरील राग हे सैनिक गरीब जनतेवर काढीत होते कीं काय, अशी शंका सर्वांना येत होती. यात भर घालणारी अनेक प्रक्षोभक विधाने पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री

श्री. भुट्टो हे करीत होते. ताश्कंदहून परतल्यानंतरहि, आपल्या नेत्यांनी केलेल्या करारानुसार ताश्कंद करार पाळण्यास आपण बांधलेले आहोत असे त्यानी कधीच दिग्दर्शित केले नाही.

ताश्कंद कराराबाबत बोलताना आयुबखानानी यातील कठीण समस्या सोडवावयास थोडा विलंब लागेल असे सांगितले तर त्यांचे परराष्ट्रमंत्री भुट्टो यांनी यूनोचे जाहीरनाम्यातील ५१ कलमा अन्वये काश्मीरसाठी केव्हाही लढा देण्याचा हक्क आम्ही कायम ठेविलेला आहे, असे सांगावयास आपले भाषणातून सुरवात केली. पाकिस्तानने काश्मीर लढ्यात जो पैशाचा व सैन्याचा चुराडा उडविला तो भरून काढण्याला अजूनही आम्ही समर्थ आहोत हेच सांगण्याचा हेतु भुट्टोच्या या उद्‌गारामागे होता. ताश्कंद कराराने पाकिस्तानातील युद्धपिपासू सेनानींची जी निराशा झाली त्यांचे सांत्वन ते या मार्गाने करीत होते. या सर्व गोष्टीचा अर्थ सर्व समजुतदार राष्ट्रात असा लावला जात होता की गेल्या १८ वर्षाचे काळात पाकिस्तानने तीन वेळा हिंदवर स्वारीचे प्रयत्न केले.

१) १९४७ चा काश्मीर लढा २) कच्छचे १९६५ चे आक्रमण ३) सप्टेंबरचा काश्मीर लढा) पण तिन्ही वेळा या प्रयत्नात पाकिस्तानला अपयश येऊन जबर नुकसानी सोसावी लागली. सहा कोटी मुसलमान प्रजा अजूनही हिंदमध्ये सुखासमाधानाने राहू शकते. शांततामय सहजीवन कंठण्यासाठी हिंदला ताश्कंद करार हवा ही गोष्ट यावेळी रशियन पत्रांनी मान्य केली व पाकिस्तानला तो करार प्रत्यक्षात उतरविण्यासाठी प्रयत्न करावे असा इशाराही दिला. पाकिस्तानच्या एकंदर धोरणावरून हिंदी सेना पाकिस्तानातून मागे घेतली जाऊन त्यांनी बांधलेले मोर्चे सोडून त्यांनी हिंदमध्ये जावे ही एकच गोष्ट पाकिस्तानला हवी होती व तेवढी साध्य झाल्यानंतर ताश्कंद कराराच्या इतर बाकीकडे पाकिस्तानने १९६६ अखेरीपर्यंत तरी बिलकुल लक्ष दिलेले नाही.

सरहद्दीवरील सैन्य मागे घेऊन पंधरा दिवस लोटतात न लोटतात तोच आयुबखान यांनी आठ मार्च रोजी डाक्का येथे केलेल्या

भाषणात ' काश्मीरप्रश्न सुटल्याशिवाय हिंदशी चिरस्थायी शांतता प्रस्थापित होणे शक्य नाही ' असे उद्गार काढले. रावळपिंडी येथे २३ मार्च रोजी केलेल्या भाषणात ते म्हणतात, ' हिंद व पाकिस्तान-मध्ये पुन्हा लढा होऊ नये असे वाटत असेल तर दोन्ही देशातील वादग्रस्त प्रश्न शांततेने सोडविले पाहिजेत. हे जर झाले नाही तर दोन्ही देशांची शस्त्रास्त्रे मिळवून लढ्याची तयारी करण्याची चढा-ओढ अशीच सुरू राहणार. ती कोणीही थोपवू शकणार नाही. १५ मार्च रोजी डाक्का येथे भाषण करताना भुट्टो म्हणाले, ' पाकिस्तान व हिंदमध्ये ज्या कटकटी निर्माण झाल्या आहेत, त्या सोडविण्याचा मार्ग ताश्कंद करारात आहे असे मला वाटत नाही. ' या सर्व घोष-णांचा अर्थ हिंदमध्ये असा लावला जात होता की, ताश्कंदकरार पाळण्यास पाकिस्तान तयार नाही व तो यानंतर नऊ महिन्यात पाकिस्तानने केलेल्या अनेक घडामोडींवरून स्पष्ट होत आला आहे.

मार्चनंतरच्या काळातही पाकिस्तानने या ताश्कंद कराराला कसा हरताळ फासला व चीन हा करार उधळून लावण्यासाठी पाकि-स्तानला कसा सारखा पाठिंबा देत होता याचा इतिहासही पाहण्या-सारखा आहे. हिंदने आपली सेना पाकिस्तानी मुलुखातून मागे घेतल्यानंतर परस्परांच्या वकिलातींचे कारभाराला सुरुवात झाली. हिंदने पाकिस्तानी व्यापारावर घातलेले निर्बंध दूर केले व परस्परांत व्यापार सुरू केला. पाकिस्तानचा युद्धकाळात अडविलेला माल, आपण होऊन हिंदने परत केला, पण पाकिस्तानने या मालातील तीनचतुर्थांश माल स्वतःचे उपयोगासाठी वापरला व बाकीचा माल परत करण्यास अनेक महिने लाविले व बोटी परत करण्याचा प्रश्न तर अनेक बोलणी झाल्यानंतर नोव्हेंबर महिन्यात निकालात निघून एकमेकांच्या बोटी परत करण्यात आल्या. यात पूर्व बंगाल सीमेवर पकडलेले मालाचे पडाव आले नाहीत.

ताश्कंद करारानुसार या पुढील चर्चेसाठी २८ जानेवारी १९६६ रोजी हिंदने पाकिस्तानला खलिता पाठवून बोलणी सुरू करण्याची सूचना दिली पण पाकिस्तानने उत्तर म्हणून पाठविलेल्या खलित्यात

चर्चेचे सहा महत्त्वाचे मुद्दे असलेले एक पत्र पाठविले, त्यात हिंदव्याप्त काश्मीरचे प्रश्नाबाबत चर्चा करण्याचा मुद्दा पहिला होता. अर्थात् हिंदला ही गोष्ट मान्य करणे कधीही शक्य नव्हते. यावेळी ताश्कंद कराराचा आधार काश्मीर प्रश्न हा असल्यामुळे त्यावरच प्रथम चर्चा झाली पाहिजे हा पाकिस्तानचा आग्रह एवढा प्रामुख्याने मांडला जात होता की, ताश्कंद करारानुसार कोणतीही चर्चा डिसेंबर अखेरपर्यंत तरी होऊ शकली नाही. रशियाचे आग्रहाखातर आपण ताश्कंद करार केला, त्यानुसार हिंदवर दडपण आणून या काश्मीरसंबंधीचे चर्चेस रशियाने हिंदला भाग पाडावे असेही प्रयत्न आयुबखान यांनी यावेळी केले. पण या प्रयत्नालाही यावे तसे यश आले नाही.

पाकिस्तानचा दुसरा मित्र चीन यांनी मात्र त्यांचे परराष्ट्र-मंत्री भुट्टो यांची तळी येवढी उचलून धरली कीं ताश्कंदसारख्या कराराने काश्मीर प्रश्न सुटण्यासारखा नाही असाच प्रचार त्यांनी सुरू केला. चीनशी मित्रत्व साधावयास सरसावलेल्या भुट्टोंनी आयुब-खानांना भरीस पाडून लडाखचा काही प्रदेश त्यांच्या पदरांत टाकला व आपला सरहद्दीचा प्रश्न चीनशी तडजोड करून आम्ही शांततेने सोडवू शकलो अशी ग्वाही देत व हिंदची निंदा करीत ते बोलू लागले. रावळपिंडीला चिनी पुढाऱ्यांच्या भेटी सारख्या सुरू झाल्या व पाकिस्तानची शस्त्रास्त्रांची मागणी चीन पुरी करू लागला. यावेळी पिंडी–पेकिंग सलोखा येवढा वाढला कीं चीनची मिग विमाने पाकिस्तानला झराझर मिळू लागली व पुढील सहा महिन्यांत पाक–हिंद युद्धांत नाहीशी झालेली विमाने पाकिस्तान चीनचे मैत्रीचे बळावर चीनकडून मिळवू शकला. खर्ची पडलेले सैन्यबळ वाढवि-ण्यासाठी चिनी शस्त्रास्त्रे सारखी विमानाने पाकिस्तानी बंदरांत येऊ लागली व चिनी सेनानी गनिमी काव्याचे शिक्षण पाकिस्तानी सैनिकांना देऊ लागले. त्याचा परिणाम असा झाला की, पाकिस्तान चीनशी एकरूप होऊनच नव्या कारवाईच्या हालचाली सुरू करील किंवा काय अशी भीति उत्पन्न झाली. पाकिस्तानी प्रचारकांनी या चीनच्या पाठिंब्याचे बळावर हिंदद्वेषाची मोहीम येवढ्या जोरांत

सुरू केली कीं ताश्कंद कराराने काश्मीरांत स्वयंनिर्णयाचा हक्क प्रस्थापित होतो, असाच प्रचार सुरू झाला.

पाकिस्तानचे हे धोरण ब्रिटन, अमेरिकेलाही तेवढेसे आवडलेले नव्हते, तरी पाकिस्तानला उघडपणे प्रत्यक्ष विरोध करण्याचे धैर्य या दोन्ही राष्ट्रात असावे असे दिसले नाही. हिंद–पाक युद्धापासून अमेरिकेने हिंद व पाकला युद्धसामुग्री पाठविणे बंद केले होते, हे जरी उघडपणे झाले नसले तरी पाकिस्तानने आपल्या अमेरिका व ब्रिटनशी पूर्वी केलेल्या कराराचे आधारावर इराण, तुर्कस्तान यासारखे नवे मित्र जोडले होते. त्यांचा उपयोग यावेळी पाकिस्तानने भरपूर करून घेतला. ताश्कंद करारानंतर इराण व तुर्कस्तान यांचे मदतीचे बळावर या दोन्ही देशात आलेली बरीचशी युद्धसामुग्री पाकिस्तानचे दारी येऊन पडू लागली.

हे सर्व अमेरिकेला कळत होते व ब्रिटनला दिसत होते. पण या सर्व गोष्टीकडे ही दोन्ही राष्ट्रे दुर्लक्ष करीत होती. उलट पाकिस्तानने रशियाकडून भरपूर शस्त्रास्त्रे मिळवून हिंद आपली शक्ती वाढवीत आहे असाच प्रचार पाकिस्तान सारखा करून अमेरिकेकडून शस्त्रास्त्रे मिळविण्याचा प्रयत्न करीत होता. पण पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री श्री. भुट्टो यांची होणारी भाषणे व त्यांचा पाकिस्तानला चीनकडे ओढण्याचा कल यामुळे अमेरिका कोणत्याही परिस्थितीत पाकिस्तानवर विश्वास ठेवावयास तयार होईना. विशेषतः अमेरिकेने दिलेल्या पॅटन टॅन्क्स व सेबरजेट विमानांचा हिंदविरोधी लढ्यांत पाकिस्तानने केलेला सर्रास उपयोग हा पाकिस्तानचा विश्वास उडविणारा ठरल्यामुळे आंतरराष्ट्रीय दृष्ट्या तरी अमेरिकेला पाकिस्तानला उघड मदत पाठविणे १९६६ अखेरपर्यंत तरी शक्य झाले नाही, पाकिस्तानला तर स्वतःचे शस्त्रास्त्रनिर्मितेचे दौर्बल्य लक्षात घेऊन या मदतीची अत्यंत गरज होती. पण ती मदत मिळणे, आपली चीनशी वाढत चाललेली मैत्री ध्यानात घेऊन अमेरिका करणे शक्य नव्हते.

याच वेळी पाकचे परराष्ट्रमंत्री भुट्टो हे चीनचे राजकारणाचे

येवढे गोडवे गाऊ लागले व त्यांचा कम्युनिस्टांशी वाढलेला घनिष्ट संबंध पाक–अमेरिकेच्या संबंधात वितुष्ट उत्पन्न करणार अशी भीति आंतरराष्ट्रीय पत्रातून प्रदर्शित केली जाऊ लागली. त्यामुळे पर-राष्ट्रमंत्र्याचे जागेवरून भुट्टोना दूर करावे लागले. त्यांनी इंडोनेशि-याचे कम्युनिस्ट गटाशी साधलेले सहकार्य व त्यांचेकडून पाकिस्तान-साठी मिळविलेली पाणबुडी शिक्षणासाठी पाकिस्तानी सैनिक वाप-रीत होते. तर चीनच्या काही पाणबुड्या पाकिस्तानी नाविकदलाचे मदतीसाठी येत होत्या व त्या बंगालचे उपसागरात अंदमान–निको-बारचे आसपास दिसल्याच्या बातम्या नोव्हेंबर महिन्याचे सुरवातीला आल्या होत्या अशीही बातमी आहे. नोव्हेंबर महिन्याचे अखेरीला आलेल्या बातम्यात ऑगस्ट–सप्टेंबरच्या लढचात पाकचे सैन्याची झालेली नुकसानी यांनी ठिकठिकाणची मदत मिळवून भरून काढली अशी माहिती बाहेर आली आहे. तीन सैन्यविभाग त्यांनी संपूर्णपणे नवीन बनविले असून एक विभाग सेना संपूर्ण यंत्रसज्जदल पाकिस्तान जवळ आहे. कॅनडाकडून पश्चिम जर्मनीला आलेली काही सेबरजेट विमाने प. जर्मनीने इराणला विकली व त्याने ती पाकिस्तानला दिल्याची बातमी प्रसिद्ध होताच मध्यंतरी बराच खळबळाट उडाला व शेवटी पाकिस्तानला ही विमाने परत करावी लागली. उघडकीस आलेले हे एकच प्रकरण तरी सर्वांचे डोळ्यासमोर असले तरी चीनने पाकिस्तानला काय दिले याची निश्चित कल्पना कोणालाच नाही. मालवाहतूक करणारी काही विमाने त्यांनी ब्रिटनकडून मिळविली तर कित्येक टॅन्क्सचे भाग त्यांनी मिळेल तेथून विकत घेऊन आपले टॅन्कदलही सुसज्ज केल्याची बातमी आहे. युद्धसाहित्य मिळविण्या-साठी कोणकोणत्या युक्त्या पाकिस्तान योजीत होता व त्यासाठी प्रत्येक राष्ट्राचे दाराशी पाकिस्तानची माणसे धरणे धरून बसत असत याची कल्पना सर्वांना नोव्हेंबर महिन्यातील बातम्यावरून आलेली आहे.

पाकिस्तानचे परराष्ट्रीय धोरण ही एक तारेवरची कसरत आहे, ही गोष्ट आतापर्यंत वीस वर्षात स्पष्ट झालेली आहे. काश्मीर

नर एकीकडे स्वारी करून तो प्रदेश मिळविण्याचा प्रयत्न करणारा पाकिस्तान, झाफरुल्ला अगर भुट्टोंच्या तोंडून यूनोच्या दरबारी काश्मीरची कहाणी सांगतांना काश्मिरी जनतेच्या हक्काची घोषणा करून सभा गाजविण्याचे प्रकार अनेक वेळा झाले. एकीकडे चीनला गोंजारून ब्रिटन–अमेरिका व चीनविरोधी इतर युरोपियन राष्ट्रांची मैत्री कायम टिकविण्यासाठी सारखा आटापिटा आयुबखानांनी चालविला आहे. चीनशी मैत्री अमेरिकेचे मदतीचे आड येणार असे दिसू लागताच त्यांनी भुट्टोंना दूर करून पिरजादा यांना परराष्ट्रमंत्र्याच्या गादीवर आणून अमेरिकेला आपल्या मैत्रीची ग्वाही दिली. तर चीनचे मनात भुट्टो गेल्यामुळे काहीं किल्मिष उत्पन्न होऊ नये म्हणून पिरजादा यांना चीनला पाठवून त्यांचेकरवीं चीनची समजूत काढण्याचा प्रयत्न आयुबखानांनी केला. या सर्वात ब्रिटनची मैत्री टिकविण्यासाठी त्यांनी केलेली मोठी धडपड म्हणजे आयुबखानांनी इंग्लंड–फ्रान्सची नोव्हेंबरमध्ये केलेली वारी होय. या भेटीत त्यांनी हिंदुस्थान-विषयीं जेवढा अनिष्ट प्रचार करता येईल तेवढा करून घेतला.

हिंदचे हिंदुत्व व त्यामुळे पाकिस्तानकडे विकृत दृष्टीने तेथील राज्यकर्ते पाहतात असा आरोपही करावयास त्याने मागेपुढे पाहिलेले नाही. आता या प्रचाराचा किती परिणाम ब्रिटनचे पत्रांवर झाला हे सांगणे कठीण आहे. परंतु प्रथमपासूनच दुहीचे राजकारण खेळणाऱ्या ब्रिटिश राज्यकर्त्यांनी आयुबखानांचा उपयोग पुरेपूर करून घेतला. आंतरराष्ट्रीय राजकारणात आशियातील या दोन मोठ्या राष्ट्रामधील दुहीमुळे ब्रिटनला फारसे दुःख झाले असेल असे मात्र वाटत नाही. उलट याचा उपयोग पूर्वेकडील आपले हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी कसा करता येईल याचा ते विचार करीत असावे. यासाठी आयुबखानांची ब्रिटन भेट व तेथे त्यांनी ब्रिटिश पंतप्रधानांशी केलेल्या चर्चेकडे पाहणे आवश्यक आहे. या सर्व पाकिस्तानी राजकारणाचे मुळाशी एकच गोष्ट स्पष्ट आहे. ती म्हणजे हिंदद्वेषावर या सर्व धोरणाची उभारणी झालेली आहे व त्यासाठी हिंदुस्थानी धोरणाची जेथे निंदा–नालस्ती करणे शक्य आहे, ते करण्याचे प्रयत्न पाकिस्तान-कडून प्रामुख्यानें झाले आहेत.

याचे उदाहरण म्हणून मध्यपूर्वेकडील पाकिस्तानी हालचालीचा प्रश्न पाहण्यासारखा आहे. प्रथमपासूनच इस्लाम राष्ट्रात एक गट करून इस्लामी राष्ट्रांना जागतिक महत्त्व आणून देण्याची योजना प्रथम पाकिस्तान निर्माण झाल्याबरोबर पुढे आली. त्या कल्पनेची डाळ अरब राष्ट्रात फारशी शिजली नाही. कारण इजिप्तचे नासर यांचेसारखे आर्थिक प्रश्नावर देशाची उन्नती अवलंबून आहे. हे मानणारे पुढारी या संघटनेत आहेत. परंतु इराण, तुर्कस्तान यांचेसारखी राष्ट्रे या नव्या फेडरेशनचे कल्पनेने काहीशी भारावली व हिंदचे लढ्याचे संकटाचे वेळी पाकिस्तानला आपला इस्लामी भाईबंद म्हणून त्यांना मदत केली. परंतु अरब फेडरेशनचे नासर व हिंद व युगोस्लाव्हियाचे टिटो यांची मैत्री दृढ होत चाललेली पाहून मध्यपूर्वेकडील सौदी अरेबियाचे राजेसाहेबांचा एक नवा गट पाकिस्तानला जवळचा वाटू लागला व त्याचेशी अंतस्थ संबंध ठेवून अरब राष्ट्रांच्या ऐक्याला सुरुंग लावण्याचे जे प्रयत्न मध्यपूर्वेकडे सुरू आहेत, त्याला हातभार लावण्याचा प्रयत्न पाकिस्तानकडून होत असल्याच्या बातम्या आता येत आहेत. हिंदद्वेषाची एकत्र भावना मनात सदैव प्रज्वलित ठेवून आयुबखानांसारखे पाकिस्तानी राज्यकर्ते त्याला अजूनही कसे पाणी घालीत आहेत, व त्यांना यापुढे ताश्कंद कराराची कशी बिलकुल पर्वा नाही याची कल्पना पाकिस्तानी पत्रे व पुढारी यांच्या काही उद्गारावरून देता येण्यासारखी आहे. २० जून १९६५ रोजी केलेल्या एका भाषणात अध्यक्ष आयुबखान म्हणतात, 'आम्ही हिंदपेक्षा क्षेत्रफळाने व शक्तीने लहान असू पण पुन्हा लढाईची वेळ आली तर आम्ही हिंदची एवढी नुकसानी करू की ती भरून काढणे हिंदला कठीण जाईल.'

पुढाऱ्यांची ही घोषणा ऐकून आयुबखानांच्या छत्राखाली चाललेले 'डॉन' या पत्रांच्या ११ जुलैच्या अग्रलेखात खालील घोषणा करण्यात आली आहे.

'आता हिंदशी लढाईची वेळ आली तर नुसते काश्मीर व्यापून आम्ही थांबणार नाही तर आमची सेना दिल्लीपर्यंत जाईल व पाकिस्तानचा ध्वज लाल किल्ल्यावर फडकलेला दिसेल.'

१४ जुलै १९६५ रोजी केलेल्या भाषणात त्यावेळचे पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री झेड. ए. भुट्टो म्हणतात :

' आफ्रिकन प्रदेशाला ' दक्षिण आफ्रिका ' हा जसा एक डाग आहे त्याप्रमाणे आशियात आम्हाला हिंदुस्थान हा वाटतो. मध्यपूर्वेकडे अरबांना इस्रायल जसा वाटतो तसा आम्ही हिंदुस्थान मानतो.'

हिंदच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांचेविषयी लिहिताना कराचीचे हुरीयन हे उर्दू पत्र ऑगस्ट १३, १९६५ चे अंकात लिहिते, ' पंडित नेहरूंच्या कन्येने हे लक्षात ठेवावे की त्यांच्या वडिलांनी पेटविलेली ही आग आता सर्वत्र भडकू लागली आहे आणि तुमच्या गंगा–यमुना सारख्या नद्यांचे सर्व पाणी जरी यावर ओतलेत तरी ती आता विझणारी नाही.'

पंतप्रधान लालबहाद्दुर शास्त्री यांचेविषयीं लिहितांना डॉन पत्राने २७ ऑगस्ट १९६५ रोजी प्रसिद्ध केलेल्या अग्रलेखांत म्हटले आहे की ' आज शास्त्रीजी बोलत आहेत त्यावरून हे स्पष्ट होत आहे की, त्यांना पाकिस्तानशी चक्क लढाई करावयाची आहे. हा ठेंगू मनुष्य सर्व आशिया खंडाचा बादशहा असल्याप्रमाणे आता बोलू लागला आहे. त्यांना लढाई पाहिजेच असेल तर त्यालाहि आमची तयारी आहे. '

जानेवारीचे १० तारखेस ज्या ताश्कंद करारावर सही करून एकमेकाविरुद्ध खळबळाटाचे वातावरण निर्माण होऊ नये म्हणून पाकिस्तानचे अध्यक्ष आयुबखान यांनी परस्परासंबंधीची प्रचार मोहीम बंद करण्याचे अभिवचन दिले त्याच पाकिस्तानमधील वृत्तपत्रे व जबाबदार पुढारी त्यानंतर कसे वागले व काय बोलले याची कल्पना यावी म्हणून वरील उतारे मुद्दाम दिले आहेत. यावरून पाकिस्तानने ताश्कंद करार केव्हाच झुगारून दिला असून हिंदद्वेषाची मोहीम तो सुरू ठेवीत आहे हे स्पष्ट होत आहे. यावरच त्यांचे परराष्ट्रीय धोरण आधारलेले असल्यामुळे त्याची पुढील पावले कशी पडतील हे सांगणे कठीण आहे. ताश्कंदकराराने युद्ध थांबले पण आमचे शेजाऱ्याशी समझोता झाला असे म्हणता येत नाही.

● ● ●

१७ : वीस वर्षांतील प्रगति

पाकिस्तानचे जन्माला १५ ऑगस्ट १९६६ रोजी १९ वर्षे पूर्ण होऊन २० वे वर्षात हे तरुण राष्ट्र पदार्पण करीत आहे. या १९ वर्षांतील कालावधीतील या राष्ट्राच्या परिस्थितीचा विचार करावयाचे म्हटले तर तेथील सर्वसाधारण नागरिकांचे जीवन स्थिरावलेले आहे, असे म्हणता येत नाही. मानवी हक्क व सुसह्य जीवनमान या दोन्ही गोष्टी डोळ्यापुढे ठेवून बोलायचे म्हटले तर लोकशाहीप्रधान देशाला आवश्यक असलेली परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न या देशात योग्य दिशेने होत आहेत असे वाटत नाही. सुप्रसिद्ध ब्रिटिश लेखक कॅम्बेल जॉन्सन हे पाकिस्तानचे परिस्थितीविषयी लिहितात, ' हिंदुस्तानाविषयी पाकिस्तानचे निर्माते बॅ. जीना यांनी जोपासलेली संशयाची व द्वेषाची भावना अजूनहि पाकिस्तानी राज्यकर्त्यात जीव धरून आहे ही गोष्ट अत्यंत दुर्दैवाची आहे. ' याच भावनेने पाकिस्तानचे गेले २० वर्षांचे राजकारण सुरू असल्यामुळे तेथे शांतता कधीच नांदू शकली नाही व खळबळाटामुळे निर्माण होणारे अस्थिर जीवन नागरिक कंठीत होते.

पूर्व व पश्चिम पाकिस्तानच्या आजच्या सीमारेषेत ३६५९२९ चौरस मैलांचा प्रदेश (९४६७२० चौरस किलोमीटर) पसरलेला

आहे. १९६१ चे अधिकृत खानेसुमारीनुसार पाहता ९३७२०६१७ स्त्री-पुरुष या प्रदेशात रहात आहेत. त्यात ४९३०८४४५ पुरुष अजून ४४४११९६८ स्त्रिया आहेत. विभागानुसार या लोकसंख्येची वाटणी करावयाचे म्हटले तर पूर्व पाकिस्तानातील ५५२१६ चौरस मैलांचे प्रदेशात ५०८४०३३५ लोक राहतात तर पश्चिम पाकिस्तानातील ३१०४०३ चौरसमैलाचे प्रदेशात ४२८८०३७८ लोक राहतात. या लोकसंख्येत ८८ टक्के मुसलमान, ६ टक्के हिंदु एक टक्का ख्रिश्चन व ५ टक्के बुद्धधर्मीय नागरिक आहेत. वरील वर्गवारीवरून या प्रदेशातील नागरिकांच्या धार्मिक परिस्थितीची कल्पना येण्यासारखी आहे. आज ५० कोटी हिंदुस्थानचे लोकसंख्येत अजून ६ कोटी मुसलमान म्हणजे १२ टक्के मुसलमान गुण्यागोविंदाने रहात आहेत व ही संख्या पाकिस्तानातून येणाऱ्या मुसलमानांमुळे वाढत आहे. तर पाकिस्तानातील अवघ्या सहा टक्के हिंदूंना आपणाला या देशात सुखासमाधानाने कसे राहता येईल याची काळजी वाटते व त्यांचे जीविताला स्थैर्य येऊ शकत नाही. याचे कारण पाकिस्तानचे जन्मापासून राज्यकर्त्यांनी निर्माण केलेली हिंदविषयीची संशयास्पद भावना होय.

जगातील पाकिस्तान हे राष्ट्र एक वैशिष्टयपूर्ण राष्ट्र आहे. कारण कोणत्याही राष्ट्राचे दोन विभाग असे हजार मैलांपेक्षा जास्त अंतराने एकमेकापासून अलग झालेले नाहीत. या दोन्ही विभागातील भिन्न परिस्थिती कोणाच्याही लक्षात येण्यासारखी एकमेकात महद अंतर असलेली आहे. या दोन भागात राहणाऱ्या नागरिकांचा धर्म फक्त एक आहे पण राहणी मात्र एकमेकापासून भिन्न आहे. व याचाच परिणाम असा झाला आहे की या दोन्ही विभागात अनैसर्गिक मैत्री मुद्दाम जोडून आणल्यासारखी वाटते. नुसत्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करावयाचा तर पूर्व पाकिस्तानच्या भूमीला ब्रह्मपुत्रा व गंगा या दोन मोठाल्या नद्यांनी सुपीक केले आहे. या विभागातील नऊदशांश भाग सपाट व शेतीला योग्य असा असून, शंभरशंभर मैलांची शेती व त्यातून मधून मधून दिसणारी छोटी मोठी खेडी ह्या

प्रदेशाचे वैशिष्टय आहे. डाक्क्यासारख्या ठिकाणी पावसाचे प्रमाण ६५ इंचावर जाते तर सिल्हेटला ते १५० इंचापर्यंत आहे. म्हणजे पावसाचा वरदहस्त या प्रदेशावर भरपूर आहे. दाट लोकसंख्येने हा प्रदेश व्यापलेला असून दर चौरसमैल लोकवस्तीचे प्रमाण ९२२ आहे. आंबे, फणस, व सागवानाची झाडे विपुलतेने सर्वत्र दिसतात तर किनाऱ्याजवळील प्रदेशात भरपूर नारळाचे उत्पन्न आहे. जगातील या दाट लोकवस्तीचे प्रदेशात सर्वसाधारण माणसाची स्थिती मात्र चांगली नाही. सुपीक प्रदेशातील निर्धन शेतकरी–कामगारांनी बराच प्रदेश अजूनही व्यापलेला असल्यामुळे या लोकांना राज्यकर्त्यांनी आपलेसाठी काही केले असे त्यांना बिलकूल वाटत नाही. व त्यामुळे विरोधकांचे प्रचाराला येथे भरपूर वाव मिळतो.

पश्चिम पाकिस्तानची स्थिती मात्र यापेक्षा फार निराळी आहे. या प्रदेशात लोकसंख्येचे प्रमाण फार तर चौरसमैलामागे १३८ पडते. या प्रदेशाची आर्थिक सुबत्ता सर्वस्वी सिंधु नदीचे खोऱ्यावर अवलंबून आहे. पाच मोठ्या नद्यांबरोबर अनेक छोटया–मोठ्या नद्यांचे फाटे या प्रदेशात पसरले आहेत. हिमालयातील बर्फाच्छादित प्रदेशातून त्या येत असल्यामुळे त्यांना फारशी पाण्याची टंचाई नाही. त्यामुळे कालव्याच्या पाण्यावरच येथील शेती पिकविली जाते. हिंदी प्रदेशातून या नद्या येत असल्यामुळे त्यांचे पाण्याबाबत भांडणे पाकिस्तानने आतापर्यंत हिंदशी केली आहेत. पाणी अडवण्याचा प्रयत्न हिंदकडून सतत होतो, असा एक पाकिस्तानचा सततचा दावा असतो. पावसाचे प्रमाण वर्षाकाठी १० ते २० इंच जरी या प्रदेशाला लाभले असले तरी नद्यांनी आणलेल्या समृद्धतेमुळे पूर्व पाकिस्तानपेक्षाही हा प्रदेश समृद्ध आहे. सरहद्द प्रांतापासून कराचीपर्यंत सर्वच प्रदेशातील लोक पूर्व पाक नागरिकांपेक्षा काहीसे उंच, धडधाकट व गोरे आहेत. त्यांची आर्थिक स्थिती जरी सर्वसाधारणपणे चांगली असली तरी साक्षरतेचे प्रमाण साडेअकरा टक्क्यावर नाही. उलट पूर्व पाकिस्तानात हे प्रमाण १७॥ टक्के आहे. व दोन्ही प्रदेश एकत्रित करून बोलावयाचे तर सर्व पाकिस्तानात हे प्रमाण

१५ टक्क्यावर नाही. ही परिस्थिती जरी असली तरी पाकिस्तानची राजसत्ता सर्वस्वी पश्चिम पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांच्या हाती असल्यामुळे १२०० मैलांवरून हे पंजाबी व पठाण आपणाला एकाद्या गुलामाप्रमाणे वागवितात अशी कल्पना पूर्व पाकिस्तानातील सर्वसाधारण नागरिकांची आहे.

पूर्व बंगालचा सर्वसाधारण नागरिक एक लुंगी व त्यावर अर्धा शर्ट यावर दिवस काढतो. गवताच्या झोपड्यातूनच हा शेतकरी राहतो. बांबूचे कूड त्या झोपडीच्या भिंती असतात. त्याला वर्षातले काही दिवसच कसेबसे दोन वेळा जेवण मिळते व काही दिवस तर उपासमारीतच घालवावे लागतात. पश्चिम पाकिस्तानचे अधिकारी व नोकरवर्ग त्यांचेवर राज्यकारभार करतांना आम्ही जातीय दृष्ट्या त्याचेपेक्षा वरिष्ठ दर्जाचे आहोत असे त्यांना सतत भासवीत असतात. यामुळे नागरिक व राज्यकर्ते यांचे या भागांत कधीच पटत नाही. दोघांमधील मतभेद दिवसेदिवस वाढत आहेत. पाकिस्तानी सैन्यांत त्यांना फारसा प्रवेश नाही. लढावयास अयोग्य म्हणूनच त्यांना नाकारण्यात येते. पूर्व पाकिस्तानातील चहा, ताग, कापूस यावर पश्चिम पाकिस्तानपेक्षा कितीतरी जास्त परदेशी चलन पाकिस्तानी राज्यकर्ते मिळवितात पण त्या पैशाचा मोठा हिस्सा पश्चिम पाकिस्तानांत मोठमोठ्या सुधारणा करण्यात खर्ची पडतो. या दोन्ही प्रदेशाची तुलना करतांना किंग्स्ले मार्टिन हा गाजलेला ब्रिटिश बातमीदार स्टेटस्मन पत्रांत (फेब्रुवारी १६, १९६३) लिहितो ' पूर्व पाकिस्तानातील रावळपिंडीच्या राज्यकर्त्याविषयींची द्वेषभावना पंजाबी व पठाणी राज्यकर्त्यांच्या धोरणामुळे फार खोलवर गेलेली आहे. जगातील दाट लोकवस्तीच्या या मोठ्या प्रदेशांत पुरेसे खावयासही मिळत नसल्यामुळे फार काळ सामाजिक क्रांतीशिवाय हा प्रदेश राहील असे मला वाटत नाही. येथील शिक्षित नागरिक तर उघडपणे राज्यकर्त्यांना विरोध करतांना मला दिसले.'

' एकॉनमिस्ट लंडन ' या पत्रात लिहिलेल्या दुसऱ्या पत्रात हा बातमीदार लिहितो, ' पश्चिम पाकिस्तानमधील नागरिकांचे उत्पन्नाचे

मानाने पाहता या प्रदेशातील नागरिकांचे उत्पन्न ६० टक्क्याने खाली आहे. पाकिस्तानातील ९० टक्के सरकारी नोकर पश्चिम पाकिस्तानानचे आहेत. यामुळेच मौलाना भाषाणीसारखे पूर्व पाकिस्तातील समंजस पुढारी आता प्रांतिक स्वायत्ततेची मागणी करू लागले आहेत. संरक्षण, परराष्ट्रीय चलन व इतर चलन ही फक्त मध्यवर्ती सत्तेच्या हाती राहावी हा त्यांचा उघड उघड दावा ७ जानेवारी १९६४ साली केलेल्या भाषणात त्यांनी स्पष्ट केला आहे. पूर्व पाकिस्तानचा या ज्वालामुखीत लाव्हा रस आता धुमसू लागला आहे. तो केव्हा उतू जाईल ते सांगवत नाही.'

डाक्का येथील संगबाद हे बंगाली पत्र हे राज्यकर्त्यांचे धोरणाचे विवेचन करताना लिहिते, 'पूर्व पाकिस्तानच्या पुढाऱ्यांनी सांस्कृतिक, राजकीय अगर आर्थिक क्षेत्रात कोणतीही मागणी जरी केली की ताबडतोब त्यांचे डोक्यावर दडपशाहीचा वरवंटा फिरविला जातो व त्यांना तुरुंगात डांबले जाते, अगर देशद्रोही ठरविले जाते.'

हेच पत्र दोन्ही विभागातील आर्थिक परिस्थितीविषयी लिहिते की, 'पूर्व व पश्चिम पाकिस्तानातील आर्थिक परिस्थितीत येवढी विषमता आहे की पूर्व पाकिस्तानला पश्चिम पाकिस्तानचे बरोबर आणावयाचे म्हणजे पश्चिम पाकिस्तानची सर्व कामे थांबवून पूर्व पाकिस्तानला सर्व मदत द्यावी लागेल.'

पश्चिम पाकिस्तानची परिस्थिती अशी आहे की फाळणीनंतर झालेल्या भयंकर हत्त्येमुळे पश्चिम पाकिस्तानातील अल्पसंख्य वर्ग जवळ जवळ नाहीसा झाला आहे. पण पूर्व बंगालमध्ये एक कोटीपर्यंत हिंदू नागरिक आपले उद्योगधंदे व मालमत्ता यांचे संरक्षण करून राहिले आहेत. यातील बहुसंख्याकांची मातृभाषा बंगाली आहे. व यामुळे बंगाली व उर्दू या दोन राजभाषा तेथे कायम ठेवणे भाग पडले आहे. या लोकांचे अस्तित्वच नष्ट व्हावे व त्यांनी पुरतेपणी पाकिस्तानी वातावरणात एकरूप व्हावे, आपली मातृभाषा विसरावी असे आयुबखानांना पदोपदी वाटते. १ मार्च १९६६ रोजी केलेल्या एका भाषणात आयुबखान म्हणाले, 'कलकत्त्याचे पूर्व बंगालवरील

दडपण कमी व्हावे असे वाटत असेल तर मी असे सुचवीन की तेथील बंगाली लिपीच प्रथम नाहीशी केली पाहिजे.'

भाषा व धर्मद्वेषाची चढती कमान पाकिस्तानमध्ये १९५१ मधे लियाकत अल्लीखान यांचे खुनानंतर सारखी वाढू लागलेली दिसते. ख्वाजा नाझिमुद्दीन महंमदअल्ली, चौधरी महंमदअल्ली, एच्. एस्. सुऱ्हावर्दी, आय्. आय्. चुंद्रीगर व सर फेरोजखान नून हे मध्यंतरीचे पंतप्रधान एकापेक्षा एक हिंदद्वेष्टे निघाले व हिंदु–मुसलमान ऐक्य साधून पूर्व पाकिस्तानसारख्या अल्पसंख्यांकांचे हितसंबंधांशी निगडित झालेल्या प्रदेशात या दुहीच्या ज्वाला सारख्या पसरत गेल्या. जनरल आयुबखान या लष्करी सेनानीचे हाती सत्ता आल्यापासून या परिस्थितीत काही विशेष फेरबदल झाला आहे, असे बिलकुल वाटत नाही. आयुबखान यांनी सत्ता हाती घेण्यापूर्वी १९५१पासून ५८ पर्यंतचे काळात देशाची परिस्थिती कशी होती याचे वर्णन त्यावेळचे पाकिस्तानचे अध्यक्ष इस्कंदर मिर्झा यांनी खालील शब्दात केली आहे. ते म्हणाले, 'यावेळी सत्तांध पुढारी सत्तेसाठी एवढे झगडू लागले की, लाचलुचपत वाढली व सर्वसाधारण जनतेची ठिकठिकाणी पिळवणूक झाली. राष्ट्रप्रेमी व उद्योगप्रेमी नागरिकांना जीव नकोसा झाला व इस्लामच्या पवित्र तत्त्वांचे मोठेपण नाहीसे होऊन बाजारबसवी पद्धतीने त्याचा वापर झाला व त्यांचे बळावर आपले राजकीय हेतु साध्य करण्याचे प्रयत्न होऊ लागले.'

अध्यक्ष मिर्झा पुढे म्हणाले, 'या परिस्थितीत हिंदुस्थानशी लढा देण्याची भाषा पुढारीमंडळी बोलत होती. परंतु माझी अशी खात्री आहे की, आम्ही हिंदआघाडीला तोंड देऊ शकणार नाही. बहुसंख्यांकांचा राज्यसत्तेवरील विश्वासच उडाल्यामुळे मला राष्ट्राची सत्ता लष्कराचे हाती द्यावी लागत आहे.'

२३ मार्च १९५६ रोजी मध्यवर्ती मंत्रिमंडळ, पार्लमेन्ट व दोन्ही असेंब्ली बरखास्त करण्यात आल्या व पाकिस्तानचे सेनाप्रमुख जनरल महंमद आयुबखान यांनी सर्व सत्ता हाती घेतली व सुरुवातीला आपले लष्करी सहकाऱ्यांचे साहाय्याने मिशनरीवृत्तीने देशाची सुधा-

रणा हाती घेतली. निर्वासित बनलेल्या दीड लाख शेतकऱ्यांना २० लक्ष एकर जमिनीत प्रथम राहावयास नेऊन त्यांना लष्करी प्रमुखांनी कामाला लावले. हजारो लाचलुचपतखोर अधिकारी काढून टाकण्यात आले, व काळाबाजार करणाऱ्यांचा पाठपुरावा एवढ्या त्वरेने करण्यात आला की त्यापैकी कित्येकांना तुरुंगात डांबण्यात आले. त्यांनी दडपलेली संपत्ती या लष्करी प्रमुखांनी जप्त करून ताब्यात घेतली. ही सुरुवातीची हालचाल एवढ्या एकतंत्रीपणाने आयुबखानांनी केली की अॅव्हरील हॅरिमन यांचेसारख्या जबाबदार अधिकाऱ्यांनी आयुबखानांविषयी लिहिताना 'पाकिस्तानचा हा उत्साही नेता, पूर्ण माहितगार आहे, त्यांनी आपले आयुष्य पाकिस्तानी सर्वसाधारण जनतेचे आयुष्य सुधारण्यासाठी खर्ची घातले आहे.' पाकिस्तानात हुकुमशाही सुरू झाली या टीकेला उत्तर आयुबखानांनी यावेळी आपले भाषणातून दिले. ते म्हणाले, 'आज आमचेपुढे हुकुमशाही का लोकशाही हा प्रश्न नाही; तर आमचे राष्ट्रांनी यापुढे स्वतंत्रपणे कसे जगावयाचे हा प्रश्न आहे व त्यासाठी माझी खटपट आहे.'

सर्व घातक प्रवृत्तींचा नाश केल्यानंतर आयुबखानांनी हळूहळू परकीय सत्तांची मैत्री संपादण्यासाठी विविध उपाय योजावयास सुरवात केली. अमेरिकेसारख्या राष्ट्राचा विश्वास त्यांना रशियापासून जगाला संरक्षण मिळावे म्हणून काही विमानतळ देऊन केला. त्या तळावरून रशियात उड्डाण करणारी यू टू जातीची विमाने हा आंतरराष्ट्रीय खळबळाटाचा प्रश्न होता. पण या सहकार्याचे बळावर अमेरिकेकडून फार मोठी युद्धसामुग्री, विमाने, व हिंदपेक्षा केवढे तरी मोठे साहित्य आयुबखान मिळवू शकले. सेन्टो व सियाटोसारख्या लष्करी करारात त्यांनी सामील व्हावयाची तयारी दर्शवून पाश्चिमात्यांचा विश्वास संपादन केला, व त्याचा परिणाम पाकिस्तानचे परराष्ट्रीय संबंध आपले पायावर प्रस्थापित झाले.

अलिप्त राष्ट्र म्हणून पाकिस्तानने कधीही फारसा गाजावाजा केला नाही. लष्करी साहित्य आपण जोपर्यंत मिळवू शकत नाही तोपर्यंत इतर राष्ट्रांशी मैत्री संपादन करून व त्यांचे अधिक जवळ

जाऊन आपण ते मिळविले पाहिजे, त्यांची आपले सामर्थ्य वाढविण्यास अत्यंत आवश्यकता आहे, ही गोष्ट आयुबखानासारख्या लष्करी सेनानींनी पूर्ण ओळखली होती व त्यामुळेच सामर्थ्याचे दृष्टीने जेवढे आपल्या राष्ट्राला प्रभावी बनविता येईल तेवढे बनविण्याचा आटोकाट प्रयत्न आयुबखानांनी केला व त्याला भरपूर यश आले, हे मान्य केले पाहिजे. याचा परिणाम असा झाला की पाकिस्तानमधील गोंधळाची परिस्थिती आटोक्यात आली व इतर राष्ट्रांचा आयुबखानांचे राजवटीवर विश्वास बसू लागला.

आयुबखानांनी पाकिस्तानचे राजवटीला दिलेले हे वळण स्थानिक नागरिकांना सुरुवातीला चांगले वाटले. एका व्यक्तीचे कर्तृत्वावर विकास पावणाऱ्या या राज्यकारभाराविषयी त्यांचे मनात एक प्रकारचा दबदबा उत्पन्न झाला. हिंदप्रमाणे सुधारणासाठी पंचवार्षिक योजना पाकिस्तानात आखण्यांत आल्या. दुसरी पंचवार्षिक योजना २३०० कोटी रुपयाची होती व ती १९६० साली सुरू झाली. व त्यासाठी ४८ टक्के मदत म्हणजे जबळजवळ १०९५ कोटीची मदत परदेशांतून झाली होती, यावरून पाकिस्तानचे आंतरराष्ट्रीय वजन आयुबखानांनी कसे वाढविले याची कल्पना येते. १९६५ पासून १९७० पर्यंत आखण्यांत आलेल्या तिसऱ्या पंचवार्षिक योजना ४३५० कोटी रुपयांची असून त्यातील २८५० कोटी रुपये खाजगी उद्योगधंदे व १५०० कोटी रुपये सरकारी उद्योगधंद्यासाठी खर्ची पडणार आहेत. यामुळे राष्ट्रीय उत्पन्न ३० टक्क्यांनी वाढेल असा अंदाज व्यक्त करण्यांत आला आहे.

पाकिस्तानची शेती व उद्योगधंदे याची झालेली वाढ कोणत्याही दृष्टीने कमी आहे असे मानता येत नाही. नागरी जीवन अस्थिर असूनही ही प्रगती चांगली झाली असे कोणाही अर्थशास्त्रज्ञाला कबूल करावे लागेल. फाळणी झालेल्या पाकिस्तानात औद्योगिक पाया असा जवळ जवळ नव्हताच. १९५०–५१ साली राष्ट्रीय उत्पन्नात पाकिस्तानचे औद्योगिक उत्पन्न दीड टक्क्याचे वर नव्हते.

(हिंदचे उत्पन्न यावेळी ६२ टक्के होते) पण १९६० साली पाकिस्तानात ते पाच टक्क्यावर गेले व आता ते राष्ट्रीय उत्पन्नाचे साडेसात टक्के आहे.

निरनिराळ्या उद्योगधंद्यांची वाढ पाकिस्तानने या काळात चांगली केली. उदाहरणार्थ गिरणीचे कापड पाकिस्तानात १९५० साली वर्षाकाठी १० कोटी यार्ड निघत असे ते १९६० सालापर्यंत ६० कोटी यार्डावर गेले व १९६५ अखेरपर्यंत ७५ कोटी यार्डावर ते नेण्यात आले. हा पुरवठा पाकिस्तानचा दर माणशी पुरवठा लक्षात घेता ७ ते ७॥ यार्डांवर नाही, (हिंदमध्ये माणशी १० ते १६ यार्ड कापड पैदास होते.) तरी पण दरवर्षी या धंद्यात होणारी प्रगती चांगली आहे. १९५६ चे प्रत्येक धंद्याचे उत्पन्न १०० धरून विचार करावयाचा म्हटले तर १९६५ अखेर कापड १६३ टक्के, ताग १२५ टक्के, साखर १६३ टक्के तर चहाचे पुरवठ्यात १२१ टक्क्यांनी वाढ झाली. सर्वच उद्योगधंद्याची एकूण वाढ १८४ टक्क्यांपर्यंत आहे, असे १९६६ साली प्रसिद्ध झालेल्या ताज्या आकड्यांवरून वाटते.

शेती उत्पादनाचे वाढीचे बाबतीत मात्र पाकिस्तानची स्थिती हिंदसारखीच आहे व तेथे नियोजकांचे अंदाज पूर्ण होऊ शकले नाहीत. गुलाममहंमद व गिडु ही दोन मोठाली धरणे कालव्याचे जाळे पसरविण्यासाठी पाकिस्तानने बांधली पण त्यांचा उपयोग किती झाला याचा नक्की अंदाज घेणे कठीण आहे. आयातनिर्यातीचे बाबतीत मात्र पाकिस्तानने मोठीशी आशादायक परिस्थिती निर्माण केली आहे असे म्हणता येत नाही. १९५९–६० साली पाकिस्तानची परदेशातील आयात १८४ कोटींपर्यंत होती, पण १९६५ अखेरीस ती ५३६ कोटींवर गेली म्हणजे १२० टक्क्यांनी यात वाढ झाली. तर निर्यातवाढ अवघी ३० टक्क्यांनी झाली आहे. यावरून परदेशातून वाढणाऱ्या आयातीवर पाकिस्तानने फारसे निर्बंध न ठेवल्यामुळे देशाचा कर्जबाजारीपणा वाढण्याचा संभव अधिक उत्पन्न झाला असून त्यातच हिंदशी युद्धाच्या अनेक घोषणा करून पाकिस्तान आपले संरक्षणावरील खर्च वाढवीत आहे व या कर्जबाजारीपणात अधिक भर टाकीत

आहे. १९६०–६१ साली पाकिस्तानचे उत्पन्न १९७० कोटी व खर्च १७४० कोटी होता. तो १९६४–६५ साली उत्पन्न २९७३ कोटींवर व खर्च २९८५ कोटींवर गेला म्हणजे पाकिस्तानचे राज्यकर्त्यांना तुटीचे अंदाजपत्रक करूनच आज खर्चाची तोंडमिळवणी करावी लागत आहे.

१९६६ अखेरपर्यंतचा पाकिस्तानचा राज्यकारभार अशा स्वरूपाचा आहे. अजूनही पाकिस्तानने अमेरिकेचे दरबारी आपले वजन कायम ठेवले आहे व धान्यतुटवड्याचा प्रश्न निर्माण झाला तर पाकिस्तानचे मदतीस जेवढ्या तातडीने अमेरिका धावत येते, तेवढ्या तातडीने हिंदच्या मदतीस येत नाही. ही गोष्ट १९६६ चे अखेरीस अमेरिकेने केलेल्या धान्याचे पुरवठ्यावरून स्पष्ट झाली आहे. एकीकडे पाकचे मदतीस चीन उभा आहे, तर ब्रिटन–अमेरिकेला हे बोटचेपे राष्ट्र आपले हाताशी हवे आहे. ही गोष्ट आजपर्यंतच्या घटनांवरून स्पष्ट झाली आहे.

• • •

परिशिष्ट

(हिंद व पाकिस्तानचे संबंधात करण्यात आलेले छोटे–मोठे करारनामे पुष्कळ आहेत. यातील काही एकमेकांच्या प्रदेशातील स्थानिक अधिकाऱ्यांनी केलेले असून त्यांचे महत्त्व तात्पुरते व त्या त्या प्रदेशांपुरते आहे, पण ज्याचे संबंध दोन्ही देशाचे भवितव्याशी निगडित आहेत, असे काही करारनामे खाली दिले आहेत.)

हिंदी स्वातंत्र्याचा १९४७ चा कायदा

(गव्हर्मेंट ऑफ् इंडिया ॲक्ट १९३५ या कायद्यात बदल करून नवा तयार करण्यात आलेला हिंदी स्वातंत्र्याचा १९४७ चा कायदा १८ जुलै १९४७ रोजी ब्रिटिश पार्लमेंटने पास केला व त्या-अन्वये हिंदुस्थान व पाकिस्तान ही दोन स्वतंत्र राष्ट्रे १५ ऑगस्ट १९४७ पासून प्रस्थापित झाल्याचे जाहीर करण्यात आले.

२) या कायद्याचे २ रे कलमात पाकिस्तानमध्ये कोणता प्रदेश राहील याची कल्पना देण्यात आली असून त्यात जुन्या पंजाब प्रांताचे पश्चिम पंजाब व बंगाल प्रांताचे पूर्व बंगाल असे दोन भाग पाडण्यात आले आहेत. हा भाग पाकिस्तानला देण्यात व त्यात सिंध व ब्रिटिश बलुचिस्तानचा चीफ कमिनरचे नेतृत्वाखाली येणारा प्रदेश

यांचा समावेश करण्यात आला आहे. याशिवाय ब्रिटिश हिंदुस्थानातील वायव्य सरहद्दीवरील प्रांताचा समावेश यात आहे.

३) पाकिस्तानचे हद्दीत येणाऱ्या पश्चिम पंजाबमध्ये १) लाहोर २) गुजरातवाला ३) गुरदासपूर ४) शेखपुरा ५) सियालकोट हे जिल्हे व रावळपिंडी विभागातील अटक, गुजरात, झेलम, मियानवल्ली, रावळपिंडी व शहापूर हे जिल्हे व मुलतान विभागातील देरागाझीखान, झांग, लैलापूर, मॉन्टगोमेरी, मुलतान व मुझफरगड हे भाग राहतील.

४) पूर्व बंगालचे पाकिस्तान विभागात चितगांग भागात १) चितगाँग २) नोहाखली ३) तिपेरा हे जिल्हे डाक्का विभागात १) बकरगंज २) डाक्का ३) फरीदपूर ४) मैमनसिंग व प्रेसिडेन्सी विभागातील १) जेसोर २) मुर्शिदाबाद ३) नादिया जिल्हे राजशाही विभागातील १) बोग्रा २) दिवाणपूर ३) माल्डा ४) पाबना ५) राजशाही ६) रंगपूर येवढे जिल्हे येतील.

या कायद्यान्वये ब्रिटिश हिंदुस्थानातील वरील प्रदेश पाकिस्तानचा व इतर प्रदेश हिंदुस्थानचा ठरविण्यात आला.

दुसरा महत्त्वाचा करार

या दोन्ही देशातील दुसरा महत्त्वाचा करार नवी दिल्ली येथे ८ एप्रिल १९५० रोजी हिंदचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू व पाकिस्तानचे पंतप्रधान लियाकत अल्लीखान यांचेमध्ये झाला. दोन्ही देशाचे निर्मितीमुळे उभयतांचे अल्पसंख्यांकाबद्दल ज्या काहीं तक्रारी ऐकू येत होत्या, त्याबाबत हा करार असून त्यामुळे दोन्ही पंतप्रधानांनी अल्पसंख्यांकांचे प्रश्नाबाबत एक स्वतंत्र करार केला. तोच नेहरू–लियाकत अल्लीखान करार म्हणून प्रसिद्ध आहे.

(१) दोन्ही पंतप्रधानांनी या करारा अन्वये आपापल्या देशातील अल्पसंख्यांक जमातींना नागरिकत्वाचे हक्क, धर्म लक्षात न घेता, उपभोगू देण्याचे कबूल केले आहे. त्यांचे जीवित, वित्त संस्कृती, वैयक्तिक मानमरातब, व्यक्तिस्वातंत्र्य, व्यवसायस्वातंत्र्य वाचा–स्वातंत्र्य, व

पूजास्वातंत्र्य, याला देशाचे कायद्यानुसार व नैतिक तत्त्वानुसार संपूर्ण मुभा दिली जाईल, व या हक्कांचे संरक्षण करण्यात येईल.

(२) अल्पसंख्यांकाना बहुसंख्यांकांचे बरोबरीने सार्वजनिक आयुष्यात पुढे येण्यासाठी समतेचे तत्त्व पाळून संधि दिली जाईल. व सैन्यात व नागरी आयुष्यात जागा देताना समता पाळली जाईल.

(३) दोन्ही राष्ट्रांचे पंतप्रधानांनी हे अल्पसंख्यांकांचे हक्क हे मूलभूत हक्क असून त्यांची अंमलबजावणी प्रभावीरित्या करण्यात येईल अशी ग्वाही या करारात दिली आहे.

(४) दोन्ही देशातील अल्पसंख्यांकांचे गटाला विश्वास वाटावा म्हणून पूर्व बंगाल, पश्चिम बंगाल, आसाम या प्रांतांचे मंत्रिमंडळात अल्पसंख्यांकांचा एक मंत्री रहावा. तसेच अल्पसंख्यांकांमध्ये बहुसंख्यांकाविषयी विश्वास उत्पन्न व्हावा म्हणून दोन्ही राष्ट्रांनी आपला एकएक मंत्री दंगल उडालेल्या प्रदेशात खळबळीचे वातावरण असेपर्यंत ठेवावा व दोन्ही जमातीचे मनात विश्वास उत्पन्न करावा.

५) याशिवाय अल्पसंख्यांकांचे हितसंबधांचे संरक्षणासाठी पूर्व बंगाल, पश्चिम बंगाल व आसाम यांचेमध्ये एक एक समिति नेमावी, या समितीमध्ये त्या त्या प्रांतातील अल्पसंख्य व बहुसंख्य जमातीचा एक एक प्रतिनिधि राहील. प्रांताचे एक मंत्री त्यांचे अध्यक्ष राहतील व ही समिति सर्व प्रश्नावर निर्णय घेईल, व ती करारातील शर्ती पाळल्या जातात किंवा नाही हे पाहील.

रॅडक्लिफ अॅवार्ड :

पाकिस्तान व हिंद या दोन्ही देशात विभागणी होण्यापूर्वी ३० जून १९४७ रोजी या दोन्ही देशांचे सरहद्दीची नवी आखणी करण्यासाठी त्यावेळचे गव्हर्नर जनरल यांनी मि. सैरील रॅडक्लिफ यांचे अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमले होते त्यात १) जस्टिस महमंद मुनीर, जस्टिस मेहरचंद महाजन, जस्टिस तेजासिंग हे हायकोर्ट जज्ज सभासद होते.

या समितीच्या हाती पंजाब प्रांतातील दोन्ही जमातीच्या लोकसंख्येचा विचार करून प्रदेशांची वाटणी करून पाकिस्तान व हिंदची सरहद्द ठरविण्याचा प्रश्न दिला होता. या समितीने पाणी पाठबंधारे ठिकठिकाणच्या प्रदेशाचे हितसंबंध याचा विचार करून आपला निर्णय १२ ऑगस्ट १९४७ रोजी जाहीर केला व त्यानुसार १५ ऑगस्ट रोजी पाकिस्तानची हद्द ठरविण्यात आली.

हिंद–पाकिस्तान करार १० सप्टेंबर १९५८ :

पूर्व बंगाल व पश्चिम बंगाल सरहद्दीबाबत असेच नवनवीन वादग्रस्त प्रश्न निर्माण होऊ लागल्यामुळे दोन्ही प्रांतांचे सेक्रेटरींनी विचारविनिमय करून हिंद व पाकिस्तान यांचेमध्ये या सरहद्दीसंबंधी एक नवा करार केला. या परिषदेपुढे दहा ठिकाणचे वादग्रस्त प्रदेश ठेवण्यात आले होते व त्यासंबंधीचे या बैठकीतील निर्णय या करारात समाविष्ट करण्यात आले.

या करारात वरुबारी युनियनमधील अर्धा भाग पाकिस्तानला द्यावयाचे ठरले व अर्धा भाग हिंदकडे राहिला. याशिवाय सरहद्दीजवळील कुंजबिहार, २४ परगणा, खुलना जोसोर भागातील प्रदेशांची वाटणी दोन्ही देशाचे हद्दीत लोकसंख्येनुसार करण्यात आली.

हिंद–पाकिस्तानचा दुसरा करार २३ ऑक्टोबर १९५९ :

१ सप्टेंबर १९५९ रोजी सरहद्दीवर चाललेल्या कटकटी मिटविण्यासाठी पाकिस्तानचे अध्यक्ष आयुबखान व हिंदचे पंतप्रधान पं. नेहरू यांनी हिंद–पूर्व पाकिस्तान प्रश्नाचा पुन्हा विचार करण्यासाठी दोन्ही शिष्टमंडळाच्या बैठकी १५ ऑक्टोबर १९५९ दिल्लीत, १८ ते २० ऑक्टोबर डाक्का येथे व २२ ऑक्टोबर १९५९ दिल्ली येथे घेतल्या. सरहद्दीवर खळबळाटाचे प्रकार होऊ नयेत म्हणून दोन्ही देशात शांततेसाठी एक विशिष्ट योजना आखण्याचे ठरले व स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन सरहद्दीची क्षेत्रमर्यादा ठरवावी असे ठरविण्यात आले.. या कराराने दोन्ही राष्ट्रात बेबनावाचे प्रश्न उपस्थित झाल्यास ते कसे मिटवावे याचीही पद्धती ठरविण्यात आली.

हिंद–पाकिस्तान करार १९६० :

४ जानेवारी १९६० रोजी पश्चिम पाकिस्तानचा सरहद्दप्रश्न सोडविण्यासाठी पुन्हा हिंदचे मंत्री स्वर्णसिंग व पाकिस्तानचे लेफ्टनंट कर्नल के. एम्. शेख यांची बैठक दिल्ली येथे ४ ते ११ जानेवारी १९६० रोजी झाली. त्यावेळी पश्चिम पाकिस्तान सरहद्दीवरील व कच्छ–सिंध प्रश्न चर्चिले गेले. यावेळी पंजाबसरहद्दीवरील चाकलटेके या खेड्यांवरील हक्क पाकिस्तानने सोडला व तेहरारजा, भारजा व पठाणके या खेड्यांवरील हक्क हिंदने सोडून दिला. हुसेनवाला विभागाची सरहद्दही ठरविण्यात आली व कच्छ–सिंध सरहद्दीचा प्रश्न मागाहून विचारात घेण्याचे ठरले.

यानंतर झालेले दोन करार म्हणजे (१) कच्छ युद्धबंदीकरार १९६५ व तेहरान करारानुसार दोन्हीकडील सेनानीमध्ये झालेला सैन्य मागे घेण्याचा करार होय. या दोन्ही करारांची माहिती त्या संबंधीचे वृत्तांतात आली आहे.

गेल्या एकोणीस वर्षांचे अवधीत झालेल्या या कराराची अंमल-बजावणी पाकिस्तानने कधीच नीटपणे केलेली नाही व पश्चिम व पूर्व पाकिस्तानी सरहद्दीवरील कटकटी पूर्वीप्रमाणेच १९६६ अखेरपर्यंत सुरू होत्या.

● ● ●

